Prof. Dr. Yasmeen K. Aowte
Gogate Jogalekar College (Autonomous) Ratnagiri.

❋❋❋❋❋❋❋

24 July 2025

Visit to the Institute to coordinate development of infrastructure. Very motivated and ANO. Keep up the good work. Best Wishes.

(Col. Satyasheel Baber)

❋❋❋❋❋❋❋

आज दि. ०८/१०/२०२५ रोजी 'अभिजात मराठी भाषा सप्ताह' दिनानिमित्ताने आयोजित सांस्कृतिक कार्यक्रमासाठी उपस्थित राहण्याची संधी मिळाली. 'अभिजात मराठी आणि ग्रामीण कोकणाचे योगदान' या विषयावर व्याख्यान देण्याची संधी मला मिळाली. या विषयाचे सविस्तर मार्गदर्शन केले. व व्याख्यानाच्या शेवटी मालवणी बोली भाषेतील 'झिला वाइच भेटत जा' या कवितेचे वाचन केले. कार्यक्रमावेळी सुमारे १५० ते २०० विद्यार्थी उपस्थित होते. सप्ताहाच्या अनुषंगाने यानिमित्त सुंदर कार्यक्रमाचे आयोजन केले. सर्व विद्यार्थी अतिशय आनंदी होते. त्यांनी चांगला प्रतिसाद दिला. कार्यक्रमाचे नियोजन व आयोजन अतिशय सुंदर झाले. या कार्यक्रमास मराठी भाषा सप्ताह दिनानिमित्त मन:पूर्वक शुभेच्छा !

श्री. बाबू घाडीगावकर

❋❋❋❋❋❋❋

दि. २८/११/२०२५ रोजी रिगल कॉलेज, श्रृंगालतळी तर्फे इयत्ता १२ वीच्या विद्यार्थ्यांना 'करिअर मार्गदर्शन' अंतर्गत नर्सिंग, हॉटेल मॅनेजमेंट, फॅशन डिझाईन, DMLT, BCA, B. Com. Financial Management या कोर्सची माहिती प्राचार्या रेश्मा मोरे यांनी दिली. त्याप्रमाणे हॉटेल मॅनेजमेंटच्या विद्यार्थिनी कु. समृद्धी मालकर हिने Mocktail आणि कु. राज गोसावी याने हॉटेल आर्टस् प्रात्यक्षिक दाखविले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. डी. कऱ्हाड यांनी चांगल्या प्रकारे मदत केली. त्याबद्दल त्यांचे आभार.

श्रीमती तृप्ती दाणकर

❋❋❋❋❋❋❋

आज दि. ०३/१२/२०२५ रोजी या महाविद्यालयाच्या कॉमर्स व अर्थशास्त्र विभागामार्फत आयोजित केलेल्या सुंदर कार्यक्रमामध्ये बँक मर्जर-राष्ट्रीयकृत बँका फक्त चारच राहणार ? या विषयावरती विद्यार्थ्यांशी संवाद साधण्याची संधी मिळाली. महाविद्यालयाने आयोजित केलेला हा उपक्रम नक्कीच खूप स्तूत्य आणि विद्यार्थ्यांच्या बँकींग संदर्भातील ज्ञानात भर टाकणारा आहे. त्याबद्दल प्राचार्य डॉ. भारत कऱ्हाड सर, अध्यक्ष श्री. धनंजय यादव साहेब व सर्व शिक्षक वर्गाचे अभिनंदन आणि आभार ! या निमित्ताने विद्यार्थ्यांसाठी बँकींग विषयातील प्रश्नमंजुषेचे आयोजन केले व त्यामध्ये योग्य उत्तर देणाऱ्या विद्यार्थी आणि विद्यार्थिनी यांचे आभार व त्यांना खूप खूप शुभेच्छा !

डॉ. जयवंत जालगांवकर,
अध्यक्ष, दापोली अर्बन बँक लि., दापोली.

❋❋❋❋❋❋❋

आज दि. १५/१२/२०२५ रोजी न. का. वराडकर महाविद्यालयाच्या 'शिशिर युवा महोत्सव २०२५' रोजी उपस्थित राहण्याचा योग आला. खूप आनंद झाला. महाविद्यालयाच्या यशाचा प्रगतिचा आलेख असाच चढता राहो. या महाविद्यालयातून अनेक खेळाडू, कलावंत घडत राहोत.

धन्यवाद.

श्री. सुनील पांडुरंग कदम
मु. पो. अडखल (कदमवाडी)

❋❋❋❋❋❋❋

आज दि. ०९/१/२०२६ रोजी **'मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा'** केंद्रस्तरीय मुल्यांकनातर्गत शालेय मूल्यमापन समिती मार्फत प्रशाळेला भेट दिली. मूल्यांकनासाठी आवश्यक सर्व अभिलेख्यांची पडताळणी केली. आवश्यक अभिलेखे ठेवण्यात आले आहेत. मूल्यमापनासाठी सहकार्य चांगले लाभले.

शैक्षणिक नियोजन व कामकाज चांगले आहे. पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा. सोबत मूल्यमापन समिति सदस्य उपस्थित होते.

सौ. थोरात एस. एस.
केंद्र टेटवली





महाविद्यालयाचे माजी प्राध्यापक स्वर्गीय हरिप्रसाद लढ्ढा यांना महाविद्यालयामध्ये श्रद्धांजली अर्पित करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. भारत कन्हाड



कनिष्ठ महाविद्यालय तपासणी पथक समवेत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. भारत कन्हाड आणि पर्यवेक्षक श्री. एल. पी. पाटील



घरडा केमिकल्स यांच्या सीएसआर मधून महाविद्यालयाच्या इमारतीवरील पत्राशेड कामपुर्ती हस्तांतरण प्रसंगी उपस्थित मान्यवर



एनसीसी आयोजीत हर घर तिरंगा रॅलीमध्ये एनसीसी कॅडेट आणि डॉ. एल. एस. सितापुले आणि शिक्षण विस्तार अधिकारी श्री. बी. टी. राठोड



महात्मा गांधी व लाल बहाद्दूर शास्त्री जयंतीनिमित्त भित्तीपत्रक प्रकाशन करताना प्राचार्य, प्राध्यापक व विद्यार्थिनी



डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त भित्तीपत्रक प्रकाशन करताना प्राचार्य, प्राध्यापक व विद्यार्थिनी चारूता भुवड



सन २०२५-२६ वरिष्ठ महाविद्यालय विद्यार्थी मंडळ



एन.एस.एस. २०२५-२६ विशेष निवासी शिबीर, करंजाणी येथे विचार व्यक्त करताना सभापती मा. धनंजय यादव



राष्ट्रीय सेवा योजना विशेष निवासी शिबीर, करंजाणी येथे बंधारा बांधताना प्रकल्पाधिकारी व स्वंयसेवक



एन.एस.एस. (कनिष्ठ विभाग) बंधारा बांधताना विद्यार्थी



एन. एस. एस. (कनिष्ठ विभाग) – वृक्ष लागवड करताना शिक्षण विस्तार अधिकारी मा. रामचंद्र सांगडे, पर्यवेक्षक, शिक्षक व विद्यार्थी



शिशिर युवा महोत्सव २०२५-२६ मा. महेश तोरसकर, मा. धनंजय यादव, प्राचार्य, शिक्षक व विद्यार्थी



शिशिर युवा महोत्सव २०२५-२६ प्रमुख पाहुणे मा. सचिन तोडणकर, संस्था पदाधिकारी, प्राचार्य, पर्यवेक्षक इ.



महाविद्यालयीन क्रीडा स्पर्धा २०२५-२६ उद्घाटनप्रसंगी मा. श्री. मंगेश मोरे, प्राचार्य आणि विद्यार्थी



महाविद्यालयीन क्रीडा स्पर्धा २०२५-२६ उद्घाटनप्रसंगी मा. श्री. मंगेश मोरे, प्राचार्य आणि विद्यार्थी



शिशिर महोत्सव २०२५-२६ मध्ये कलाविष्कार सादर करताना महाविद्यालयाची विद्यार्थिनी



शिशिर महोत्सव २०२५-२६ मधील
नृत्याविष्कार एक अविस्मरणीय क्षण



शिशिर महोत्सवानिमित्त पाककला स्पर्धेत
सहभागी स्पर्धक



आजीवन अध्ययन आणि विस्तार विभाग व
राष्ट्रीय सेवा योजना संयुक्त विद्यमाने
पर्यावरण जनजागृती फेरीचे आयोजन



IQAC, कॉमर्स व अर्थशास्त्र विभाग आयोजित
''बँक मर्जर'' या विषयावरील व्याख्यान देताना
मा. डॉ. जयवंत जालगांवकर,
सभापती मा. धनंजय यादव, प्राचार्य व प्राध्यापक



मराठी भाषा दिन कार्यक्रमप्रसंगी
प्रा. दीपक गडकर आणि विद्यार्थी



महिला विकास कक्ष – WeRMore चे
मा. श्री. राहुल कदम, प्रा. जुईली शिर्के,
प्रा. नगमा जिलानी व विद्यार्थिनी



बी.एस.सी. आय.टी.– करिअर गाईडन्स करताना
मा. श्री. ठसाले सर, प्रा. मयुरी वेदक व विद्यार्थी



भूगोल दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात स्वागत
करताना डॉ. स्कंधा खेडेकर,
प्राचार्य, प्राध्यापक व शिक्षक



महाविद्यालय ग्रंथ प्रदर्शनाचे उद्घाटनप्रसंगी प्राचार्य, प्राध्यापक, ग्रंथपाल आणि विद्यार्थी



महाविद्यालयात ग्रंथ प्रदर्शनात विविध पुस्तकांची पाहणी करताना ग्रंथपाल, प्राध्यापक आणि विद्यार्थी



वाणिज्य विभाग आयोजित मानसिक आरोग्य कार्यशाळेनिमित्त मा. सौ. रेणूका वारे, डॉ. सुरेश निंबाळकर व डॉ. जयश्री गव्हाणे



कॉमर्स विभागातर्फे आयोजित कार्यक्रमात मार्गदर्शन करताना डॉ. सुरेश निंबाळकर, प्राध्यापक व विद्यार्थिनी



वार्षिक पारितोषिक वितरण कार्यक्रमात पारितोषिक प्रदान करताना दापोलीचे प्रांताधिकारी डॉ. विजयकुमार सुर्यवंशी



वार्षिक पारितोषिक वितरण कार्यक्रमात पारितोषिक प्रदान करताना संस्था सचिव डॉ. दशरथ भोसले



वार्षिक पारितोषिक वितरण कार्यक्रमात पारितोषिक प्रदान करताना कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे दापोलीचे प्रांताधिकारी मा. डॉ. विजयकुमार सुर्यवंशी



वार्षिक पारितोषिक समारंभात अध्यक्षीय समारोप करताना संस्थेचे सभापती मा. धनंजय यादव

तरुणाईची आणि मराठी भाषा

- वैष्णवी विनोद शेलार
...✍ T. Y. B. A.

तरुणाई आणि मराठी भाषा यांचा संबंध अतुट आहे; मराठी भाषा तरुणाईची सांस्कृतिक ओळख, संस्कार आणि भावनांचा आधार आहे. पण आधुनिक तंत्रज्ञान, इंग्रजीचा प्रभाव आणि सोशल मीडियामुळे तिचा वापर कमी होत आहे; तरुणांनी मराठीचा अभिमान बाळगून दैनंदिन व्यवहारात, शिक्षणात आणि मनोरंजनात तिचा वापर वाढवणे, तसेच भाषेची समृद्धी जपण्यासाठी प्रयत्न करणे ही काळजी तरुणांनी घेतली पाहिजे.

मराठी भाषेचा उगम उत्तरेकडे झाला. मराठी भाषा मूळ आर्यांची भाषा आहे. जवळजवळ १५०० वर्षांचा इतिहास जपणारी भाषा आहे. प्रामुख्याने भारताच्या दक्षिण भागात मराठी भाषेचा विकास झाला. पेशवे काळात मराठी भाषेवर संस्कृतचे वर्चस्व प्रस्थापित झालेले दिसते. या कालखंडात संस्कृत काव्याचे अनुकरण करणारी पंडिती कविता लिहिल्या गेल्या भक्तीपासून ते श्रृंगारापर्यंत अनेक अनुभव खास मराठमोळ्या शैलीत साकार करणाऱ्या शाहिरांच्या कविता हे मराठी कवितेचे एक भूषण आहे. याचे एक उत्तम उदाहरण म्हणजे पोवाडा हा प्रकार होय.

मराठी भाषा केवळ संवाद साधण्याचे माध्यम नसून ती महाराष्ट्राची संस्कृती, इतिहास आणि अस्मितेचा अविभाज्य भाग आहे. तरुणाई हा समाजाचा कणा असतो आणि त्यांच्या हातात भाषेचे भविष्य आहे; म्हणून तरुणांनी मराठी भाषेची महत्त्वे, प्रचार-प्रसार करणे महत्त्वाचे आहे. मराठी भाषेचा वापर कमी होण्यामागील कारणांचा सखोल अभ्यास करणे.

हिंदी चित्रपट, टेलिव्हिजन आणि सोशल मिडियाच्या प्रभावामुळे तरुण पिढी हिंदी भाषेकडे अधिक आकर्षित होत आहे. यामुळे मराठी बोलीभाषा आणि वाक्प्रचारांचा वापर कमी होत आहे. सोशल मीडियाच्या युगात मराठी भाषेचा वापर डिजिटल व्यासपीठांवर मर्यादित आहे. इंटरनेट, स्मार्टफोन आणि सोशल मिडिया पोस्ट इंग्रजी आणि हिंदी भाषेचे प्राबल्य आहे. यामुळे तरुण पिढी मराठीतून डिजिटल संवाद साधण्यापेक्षा इंग्रजी किंवा हिंदीचा वापर करते. Google Translate सारख्या साधनांचा वापर मराठी भाषेच्या प्रसारासाठी होऊ शकतो. परंतु त्याचा वापरही मर्यादित आहे. मराठी भाषेतील डिजिटल सामग्री वाढवण्यासाठी प्रयत्नांची गरज आहे, ज्यामुळे मराठी भाषेचा वापर वाढू शकेल.

मराठी भाषिकांमध्ये, विशेषत : शहरी भागात, मराठी भाषेबद्दल एक प्रकारचा न्यनगंड दिसून येतो. इंग्रजी बोलणे हे ''प्रतिष्ठेचे'' लक्षण मानले जाते, तर मराठी भाषा बोलणे हे ''ग्रामीण'' किंवा ''कमी दर्जाचे'' समजले जाते. यामुळे तरुण पिढी मराठीचा वापर कमी करते आणि इंग्रजी किंवा हिंदीला प्राधान्य देते. एका एक्स पोस्टमध्ये असे नमूद आहे की, ''मराठी शिकणं कमी झालं कि वापर कमी होईल आणि याचा परिणाम मराठी साहित्य, नाटक आणि रोजगारावर होईल.''

आजच्या स्पर्धात्मक युगात नोकरी आणि करिअरच्या संधी इंग्रजी भाषेशी जोडल्या गेल्या आहेत. माहिती तंत्रज्ञान, बँकिंग आणि कॉर्पोरेट क्षेत्रात इंग्रजीचा वापर अनिवार्य आहे. ज्यामुळे मराठी भाषेचा वापर मर्यादित राहतो. यामुळे तरुण पिढी मराठीला 'उपयुक्त' मानत नाही. इंग्रजी किंवा हिंदीला प्राधान्य देते.

पूर्वी घरामध्ये सर्व व्यवहार मराठीतून होत. पण शहरी भागातल पालक मुलांशी इंग्रजीत संवाद साधण्याचा प्रयत्न करतात. कारण त्यांना वाटते की इंग्रजीतून बोलल्याने मुलांना भविष्यात संधी मिळता. त्यामुळे मराठी ही मागासलेली भाषा म्हणून दुर्मिळ समजले जाते.

मराठी भाषा ही महाराष्ट्राच्या सांस्कृतिक ओळखीचा पाया आहे. तिच्या वापरातील घट मराठी संस्कृती आणि परंपरांना धोका निर्माण करणे. तरुण पिढीचे दुरावणे, तरुण पिढी मराठी साहित्य, नाटक आणि चित्रपटांपासून दुरावत आहे, ज्यामुळे मराठी भाषेचा वापर कमी झाल्यामुळे मराठीच्या वैविध्याचा आणि समृद्धीचा लोप होत आहे.

मराठी बोलणाऱ्यांना अनेक वेळा कमी समजलं जातं. भाषा केवळ संवादाचे माध्यम नसून ती प्रतिष्ठेची बाब बनते. अशा वातावरणात तरुण हा मराठी भाषेचा वापर कमी करतो, कारण त्यांना इंग्रजीत बोलणं अधिक स्टायलिश आणि आधुनिक वाटतं. अनेक तरुण वर्ग Instagam, You Tube, Netflix, Twitter यांसारख्या प्लॅटफॉर्मवर इंग्रजीत किंवा हिंदीत कंटेंट पाहतात. त्यामुळे तरुणांचा कल हिंदीकडे जास्त होतो.

ग्रामीण भागातील तरुण अजूनही मराठीत संवाद साधतात. मराठी भाषा ही फक्त व्याकरण व पाठ्यपुस्तक यांपुरतीच मर्यादित असते. त्यामुळे मराठी भाषा मराठी मागे पडत चालली आहे. शैक्षणिक स्पर्धा, इंटरव्ह्यू, उच्च शिक्षण सगळीकडे इंग्रजीचे वर्चस्व आहे. सरकारी धोरणांमध्ये इंग्रजी शिक्षणावर अधिक भर दिला जातो. शिक्षण धोरणांमध्ये मातृभाषेला दुय्यम स्थानं दिलं जात, तरुण पिढीला मराठी भाषेच्या महत्त्वाविषयी जागरुत करावे.

मराठी महाराष्ट्र प्रदेशात बोलली जाणारी भाषा असली तरी त्यातल्या वेगवेगळ्या प्रांतामध्ये, जिल्ह्यांमध्ये ती वेगवेगळ्या प्रकारे बोलली जाते. पश्चिम महाराष्ट्रात बोलली जाणारी घाटी, नागपूरात बोलली जाणारी वऱ्हाडी, गोव्यातली कोकणी, मालवणी, कोळी असे अनेक वेगवेगळे चेहरे दिसतात. महाराष्ट्रातील आदिवासी आणि ग्रामीण भागात मराठी भाषेचा वापर तुलनेने जास्त आहे. परंतु या भागात शिक्षण आणि प्रशासनात मराठीचा प्रभावी वापर होत नाही. आदिवासी समाजाच्या विशेष भाषा आणि सांस्कृतिक ओळखीकडे दुर्लक्ष केले जाते. ज्यामुळे मराठीचा वापरही मर्यादित राहतो.

तरुण पिढी कांदबऱ्या, कविता, लघुनिबंध वाचत नाही. त्यामुळे भाषिक अभिव्यक्तीची गोडी निर्माण होत नाही. डिजिटल युगात मराठी सर्जनशील साहित्याच्या प्रचारासाठी प्रयत्न अपुरे ठरतात. मराठी भाषेला जपल पाहिजे.

''हृदयाला हृदयासवें डोलावस वाटत,
विचार आणि भावनांना खुलवास वाटत,
खुलण्यासाठी हृदयाचा सुसंवाद होतो,
त्यातून तर भाषेचा जन्म होतो''

अशीच हृदयाकडे नेणारी भाषा म्हणजे, माझी मराठी भाषा. मराठी भाषा दिवस अशाच समृद्ध मराठीचं अस्तित्व साजरा करतो. २७ फेब्रुवारी १९१२ हा दिवस श्रेष्ठ कवी, नाटककार व कांदबरीकार वि. वा. शिरवाडकर (कुसुमाग्रज) यांचा जन्मदिवस ''मराठी भाषा दिवस'' म्हणून साजरा केला जातो.

मराठी भाषेचा वापर तरुणांमध्ये कमी होण्यामागे अनेक परस्पर संबंधीत कारणं आहेत – घरातील वातावरण, शैक्षणिक धोरणं, सामाजिक प्रतिष्ठा, जागतिकीकरणाचा प्रभाव आणि डिजिटल माध्यमांचा इंग्रजीकडे झुकणारा कल मात्र ही परिस्थिती बदलता येऊ शकते. जर समाज, शासन, पालक, शिक्षक आणि तरुण स्वत: यामध्ये भाषिक जाणीव निर्माण झाली आणि कृतीशील कार्यक्रम हाती घेतले. मराठी भाषा महाराष्ट्राची मातृभाषा असून तिचा हजारो वर्षाचा इतिहास आहे. संत, साहित्य, नाटक, काव्य आणि सामाजिक चळवळीमध्ये मराठीचे योगदान मोठे आहे. अलीकडील काळात विशेषत: शहरी भाषातील तरुण पिढीमध्ये मराठीचे वापर कमी होत चालले आहे. तरुणांनाही मराठी भाषेकडे दुर्लक्ष केले आहे.

आजकाल मुंबई-पुण्यात बोलली जाणारी तरुण वर्गातील भाषा अनेक भाषांमधल्या शब्दांची सरमिसळ झालेली खिचडी. असं म्हणतात मैलामैलांवर मराठी भाषा बदलते.

तिचा हेल, तिचे शब्द, उच्चार बदलत जातात. ग्रामीण भागात शुद्ध मराठी बोलली जात नाही. पण तिचा गोडवा कायम राहतो. मराठी ही एक भाषा नाही तर एक वृत्ती आहे. अशी संपन्न मराठी भाषा जिच्यात अनेक रुप, अंग आहेत. मराठी भाषा जशी वळवाल तशी वळते असे सुद्धा म्हटले जाते.

मराठी भाषा जिच्यात सह्याद्रीचा कणखरपणा, मावळ्यांचा रांगडेपणा, गोदावरी, कृष्णा, कोयना ह्या नद्यांचा निर्मळपणा, ज्ञानेश्वर माऊली, संत तुकाराम, संत रामदास यांच्या भक्तीचा सुगंध आहे. शेवटी हे म्हणणंच सार्थ ठरेल.

''लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी,
जाहलो खरेच धन्य ऐकतो मराठी,
धर्म, पंत, जात एक मानतो मराठी
एवढ्या जगात माय मानतो मराठी''

तरुणाईने आपल्या कृतीतून मराठी भाषेला नवी दिशा देणे आवश्यक आहे. भाषेचे सामर्थ्य तिच्या वापरातून वाढते. जर तरुणांनी मराठी भाषेचा अभिमान बाळगून तिचा योग्य वापर केला, तर मराठी भाषा अधिक समृद्ध होईल आणि आपली सांस्कृतिक ओळख टिकून ठेवेल.

आज सामाजिक शास्त्रे, तत्त्वज्ञान, चित्रकला, साहित्य, नाटक यासारख्या कलांचे समीक्षाविचार मराठीत मूळ धरु लागले आहेत. तर एकीकडे इंग्रजीच्या वाढत्या वापरामुळे मूळ मराठी भाषा बदलत आहे. दैनंदिन बोलीभाषेतून मराठीचे संवर्धन करणे, मराठीचे सौंदर्य खानदानीपणा टिकवून ठेवणे हे प्रत्येक मराठी भाषकाचे कर्तव्य आहे.

मग काय आजपासून जपणार ना मराठी...!



बंधन



तुझ्या विना नाही कोणी माझा दुसरा जिवलग हक्काचा,
भाऊ तुच आहेस आधार माझ्या या जीवनाचा.

नातं तुझ आणि माझं जणू गोड मैत्रित रुजलेल.
बंधन एक वेगळंच जणू बहि-भावाच्यानावाने जन्मलेलं

तुच माझा सखा आणि तुच माझा भाऊ,
दादा सांग बरं तुझ्याविना मी कशी राहु.

तुझी आपुलकी आणि प्रेम पाहुन वाटलं व्हावी तुझी सखी,
आणि खूप वेळा हिम्मत देते मला तुझ्या हातातली राखी
तुझ्या हातानी बांधलेला तो एक धागा घट्ट करी आपल्या नात्याला,
तोच धागा आठवण करुन देतो आपल्या नात्याची प्रत्येक क्षणाला.

रक्षाबंधन जवळ आलं की तुझ्यासाठी राखी घेण्याची घाई
लहान असूनही आशीर्वादाचं बोल मात्र तुझे
'खूप मोठी हो ताई !'

असू देत असेच आशीर्वाद दादा नेहमी सोबत माझ्या,
खूप साथ असेल माझी, लाडक्या प्रत्येक क्षणाला तुझ्या !!

- रिद्धी शिगवण
T. Y. B. Com.

संदीप खरे : तरुणाईच्या भावनांना शब्द देणारा कवी

- Gauresh Dhananjay Shrawanpatil
... F. Y. B. A.

मराठी साहित्यातील आधुनिक काळातील एक महत्वाचे नाव म्हणजे संदीप खरे. कवी, गीतकार, गायक आणि लेखक म्हणून त्यांनी मराठी संस्कृतीत एक वेगळी ओळख निर्माण केली आहे. आपल्या साध्या पण मनाला भिडणाऱ्या शब्दांनी त्यांनी लाखो तरुणांच्या भावनांना आवाज दिला आहे. त्यांच्या कविताआणि गाणी ही केवळ मनोरंजनाचे साधन नसून जीवनातील वास्तवाचे प्रतिबिंब आहेत.

संदीप खरे यांचा जन्म 13 मे 1973 रोजी Pune येथे झाला. त्यांनी दूरसंचार अभियांत्रिकीचे शिक्षण घेतले. इंजिनिअरिंगचे शिक्षण घेत असतानाच त्यांना लेखन आणि संगीताची आवड निर्माण झाली. हळूहळू ही आवड त्यांच्या आयुष्याचा एक अविभाज्य भाग बनली. त्यांनी आपल्या काव्यलेखनातून समाजातील विविध पैलूंना स्पर्श केला आहे.

त्यांच्या कविता या साध्या सोप्या आणि प्रत्येकाच्या आयुष्यातील अनुभवांशी संबंधित असतात. प्रेम, नाती, संघर्ष, आशा, निराशा आणि जीवनातील छोटे-छोटे आनंद यांना त्यांनी आपल्या शब्दांतून जिवंत केले आहे. त्यामुळेच त्यांच्या कविता ऐकताना प्रत्येक व्यक्तीला स्वत:चे आयुष्य त्यात दिसते.

संदीप खरे यांना खरी लोकप्रियता मिळाली ती त्याच्या आणि Salil Kulkarni यांच्या "Ayushyavar Bolu Kahi" या काव्य-संगीत कार्यक्रमामुळे. या कार्यक्रमाने महाराष्ट्रातील तरुणांमध्ये एक नवीन सांस्कृतिक चळवळ निर्माण केली. या कार्यक्रमातील कविता आणि गाणी ही जीवनातील वास्तव दर्शविणारी असल्यामुळे प्रेक्षकांच्या मनाला भिडली.

त्यांच्या ''दमलेल्या बाबची कहाणी'' या कवितेने अनेकांच्या डोळ्यात पाणी आणले आहे. एका कष्टकरी वडिलांच्या आयुष्याचे वास्तव या कवितेतून अत्यंत प्रभाविपणे मांडण्यात आले आहे. त्याचप्रमाणे ''मी मोर्चा नेला नाही'', ''आता विसाव्याचे क्षण'' यांसारख्या कविताही खूप लोकप्रिय ठरल्या आहेत.

संदीप खरे यांच्या लेखनाचे वैशिष्ट्य म्हणजे त्यातील प्रामाणिक आणि वास्तववादी दृष्टिकोन. त्यांनी कधीही अवास्तव किंवा अतिशयोक्तीपूर्ण शब्दांचा वापर केलेला नाही. त्यांच्या कविता या प्रत्येक सामान्य माणसाच्या आयुष्याशी संबंधित आहेत. त्यामुळेच त्यांच्या लेखनाला मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळतो.

आजच्या धावपळीच्या जीवनात माणूस अनेकदा स्वत:च्या भावनांकडे दुर्लक्ष करतो. अशा वेळी संदीप खरे यांच्या कविता मनाला दिलासा देतात आणि जीवनाकडे सकारात्मक दृष्टिकोनातून पाहण्याची प्रेरणा देतात. त्यांच्या लेखनामुळे अनेकांना जीवनातील छोट्या क्षणांचे महत्व समजते.

मराठी साहित्य आणि संगीत क्षेत्रात संदीप खरे यांचे योगदान अत्यंत मोलाचे आहे. त्यांनी आपल्या शब्दांच्या माध्यमातून समाजातील विविध भावनांना व्यक्त करण्याचे काम केले आहे. त्यांच्या कविता आणि गाणी ही आजच्या पिढीसाठी प्रेरणादायी ठरते आहे.

एकदंरीत संदीप खरे हे केवळ कवी नसून तरुणाईच्या भावनांना शब्द देणारे एक संवेदनशील व्यक्तिमत्व आहेत. त्यांच्या साहित्य संपदेने मराठी संस्कृती अधिक समृद्ध केली आहे. भविष्यातही त्यांच्या लेखनातून अशीच प्रेरणा मिळत राहील, अशी अपेक्षा आहे.

मला त्यांची सगळी गाणी आवडतात पण एक गाण मला भरपूर आवडते. ''Ayushyavar Bolu Kahi''.

*****

स्वंवाद प्रेमाचा मानवी स्वभावाचा !

- लतिका श्रावण पाटील
...✍ F. Y. B. A.

'माणूस' हा एक असा प्राणी आहे, ज्याला एकट किंवा एकांतात राहायला, जीवन जगायला आवडत नाही. तर त्याला सतत कोण ना कोणाचा सहवास हवा असतो. कायम **स्वंवाद** करायला आवडतो. परंतु मला पडलेला हा एक मोठा प्रश्न आहे. मानवाला स्वंवाद करण्यासाठी नेमकी कती आणि कोण-कोणत्या भाषाची गरज भासते ? 1, 2, 3, की अनेक. तुम्हाला काय वाटत ?

कारण आपल्याला जी भाषा येते ती सर्वांनाच येईल अस नाही. मला नव-नवीन भाषा शिकायला फार आवडतात. कारण माझ्या समोर येणाऱ्या प्रत्येक माणसाशी मी स्वंवाद साधू शकेन.

आज मी मला येणाऱ्या सर्व भाषांची एकत्रित सांगड करुन एक कविता तयार केली आहे. जी मानवी जीवनातील सुंदर भावना स्पष्ट करते. त्या ओळीचा अर्थ फार साधा सरळ असा भासतो परंतु तो तसा नाही, फार काही तरी समजवून सांगणार आहे.

चिडे **इश्क** च कमले
ना दे सब रंग रंगले,
ना दे मिटिया निराता
नाले दिन भी वाकरे ।
गल्ला **इश्क** च केह के
दु:ख जिंदडी दी सेह के,
मन्ने लबीया नी रब न्
लुकी राब दी ई रहे गये ।।

कमळ चिखलात उगवून सुद्धा सुंदर आणि तेजस्वी असत. प्रेमातला प्रत्येक दिवस हा आनंद देणारा असतो. ते दिवसच काही वेगळे असतात.

मग ते प्रेम ईश्वरा करिता असो किंवा आई-वडिलांवरच असो किंवा आपल्या जीवन साथीदारासोबत प्रेम फक्त म्हणण्यापुरता किंवा सांगण्यापुरता नसतं तर जीवनातील दु:खद अनुभव सहज सहन करण्यासाठी असतं.

मनातलं सारं काही देवाकडे सांगण्याची गरज नसते कारण आपल्या आयुष्याचा जीवनपट हा त्यांनी आधीच लिहून ठेवलेला असतो आणि तोच आपण जगत असतो.

प्रेम हे कधीच कोणाला
शब्दात व्यक्त करता आल नाही.
कारण प्रेमाला शब्दांची नाही
तर भावनांची गरज असते.

****

अकाउंटिंगचा प्रवास

रोजची जर्नल एन्ट्री, रोजची धावपळ
लेजरच्या पानांवर गणितांची ही मळमळ.

कधी डेबिट भारी तर कधी क्रेडिट चा जोर,
हिशोबाच्या जगात अकाउंटंटच असतो थोर

खर्चाची पावती आणि उत्पन्नाचा साठा
चूक शोधताना येतो नाकी नऊ मोठा

पण जेव्हा ट्रायल बॅलन्स होतो एकदम फिट
तेव्हाच समजते मेहनतीचे गुपित

घसारा मोजून संपत्तीची किंमत ठरते
तरतूद भविष्याची संकटावर मात करते
हिशोब असा असावा की आरसा दिसावा स्वच्छ
व्यापाराच्या गणितात अकाउंट्सच आहे सर्वोच्च

- अनामिका अशोक चव्हाण
T. Y. B. Com.

कॉलेजचा प्रवास - ११वी ते १५ वी

- निकिता अजय बगे
...✍ T. Y. B. A.

११ वी ते १५ डिग्री कॉलेजचा प्रवास म्हणजे निरागसतेकडून जबाबदारीकडे नवीन मित्र मैत्रीणी कट्ट्यावरच्या गप्पा परीक्षाचा ताण आणि स्वप्नांच्या दिशेने टाकलेली पावले अन् कॉलेजला येण्यासाठी केलेला बसचा प्रवास आणि बसची वाट बघत स्टँडला केलेला टाईमपास अन मनाला घरी जाण्यासाठी लागलेली आस ते दिवस खरंच खूप वेगळेच होते. कॉलेज मधून लेक्चर बुडऊन जाण्याची मजा खूप वेगळीच होती हा प्रवास आठवणींचा एक सुंदर खजिना बनतो, जो आयुष्यभर सोबत राहतो.

कसं बोलू आणि काय बोलू
सूचत नाही मला
बोलण्यासाठी खूप आहे.
पण कविता मला रुचत नाही
इतक्या ढिगभर कॉलेजच्या आठवणी शब्दांत
थोडक्या बोलणे हे मला रुचत नाही

शाळेचे दप्तर ठेवले बाजूला
अकरावीत पाऊल टाकताच
नवीन चेहऱ्यांचा गराडा
स्वप्नांना नवे पंख फुटतात

कट्ट्यावरच्या गप्पा कॅन्टीगचा चहा आणि वडापाव
अभ्यासापेक्षा मस्तीच भारी
१२ वीच ताण परीक्षेची भीती
मैत्रीची साथ मात्र खूपच खरी
डिग्रीच्या वाटेवर १३ वी १४ वी
परिचय झाला स्वत:च्या जबाबदारीशी
कॅन्टीनमधील हसणे प्रोजेक्टसचे टेन्शन
१५ ऑगस्ट आणि २६ जानेवारी दिनासाठी
एकत्र ध्वज गीत गाण्यासाठी केलेली प्रॅक्टिस
पहिली स्वप्ने मोठी होण्याशी
अंतिम वर्षाच्या १५ व्या पदवी वर
निघालो आता आयुष्याच्या वाटेवर
मैत्रीणीची साथ कॉलेजच्या आठवणी
राहतील स्मरणात या सोन्यासारख्या क्षणांवर !

कॉलेजचे ते सोनेरी दिवस

कट्ट्यावरुन गप्पा आणि चहाची ती टपरी
कॉलेजच्या दिवसाची मज्जाच असते न्यारी
लेक्चरला मारलेली दांडी आणि कॅन्टीनचा नाश्ता
अभ्यासापेक्षा मैत्रिचाच होता जास्त राबता

असाईमेंटची घाई आणि शेवटची ती रात्र
कॉपी करण्यासाठी मित्राची शोधलेली गात्रं
प्रॅक्टीकलच्या वेळी झालेली ती धांदल
अन रिझल्टच्या दिवशी उडालेला तो गांधळ

मित्रासोबतचे ते जोक्स अन ती ओढवलेली खेच
कॉलेजच्या आठवणींची मनावर असते एक वेगळी पेच.
कधी भांडलो, कधी रडलो, पण एकत्रच वाढलो.
कॉलेज संपल तरी मैत्रिच नात मात्र जपत राहीलो.

- प्राची मनोहर भदिरके
T. Y. B. Com.

पर्यावरण आणि मानवी जीवन

- तनुजा खोत
...✍ T. Y. B. Com.

''यावत् भूमंडलात धत्ते, सशैलवनकाननम् ।
तावत् तिष्ठान्ति मेदिन्यां, संतति, पुत्र पौतृकी ।।''

हा संस्कृत श्लोक मानवी जीवन आणि पर्यावरणाचा किती खोलवर संबंध आहे, हे अगदी थोडक्यात पण प्रभावीपणे सांगतो. याचा अर्थ असा की, जो पर्यंत पृथ्वी आपले डोंगर, वनराई, नद्या, सरोवरे जपून ठेवले, तोपर्यंतच या भूमीवर मानवाच्या पिढ्यानपिढ्या सुखाने नांदतील. हा श्लोक आजच्या काळातही खूप महत्वाचा वाटतो कारण आपण पर्यावरणाची काळजी घेणे किती आवश्यक आहे, हे आता जाणवत आहे.

पर्यावरण म्हणजे आपल्या आजूबाजूला असलेली जमीन, हवा, पाणी, झाडं, प्राणी, पक्षी आणि सूर्यप्रकाशदेखील. या सगळ्या घटकांमुळेच पृथ्वीवर जीवन शक्य झाले आहे. मानवी जीवनाचा प्रत्येक श्वास या पर्यावरणावर अवलंबून आहे. निसर्ग आपल्या सगळ्या गरजा पूर्ण करतो आणि आपल्याला निरोगी आयुष्य देतो.

पण दुर्दैवाने गेल्या काही वर्षांपासून पर्यावरणाचा होत असलेला ऱ्हास व वाढते प्रदूषण हे संकट मानवाने आपल्या बेजबाबदारपणाने ओढवून घेतले आहे. विकासाच्या नावाखाली होत असलेली जंगलतोड, वाढती शहरे आणि औद्योगिकीकरण या सगळ्याचा नकारात्मक परिणाम निसर्गावर होतो आहे. यामुळे अनेक नैसर्गिक आपत्ती जसे की अतिवृष्टी, दुष्काळ, भूस्खलन अशा घटना वाढल्या आहेत. या सगळ्याचा थेट परिणाम मानवी जीवनावर होत आहे. लोकांना अनेक आजार जडत आहेत, शेतीच्या आणि पिण्याच्या पाण्याच्या समस्या वाढत आहेत.

मुंगीपासून गरुडापर्यंत सर्वजण धरतीची प्रकृती सांभाळण्याचा आटोकाट प्रयत्न करतात; पण माणूस मात्र आपल्या बुद्धिमत्तेने आणि कार्यशक्तीने पर्यावरणाचा तोल बिघडवून टाकतो आहे. मानवाचे बेजबाबदार जिणे एक दिवस जग निर्मनुष्य करुन सोडले, असा धोका वाटत आहे. वाढती वृक्षतोड मानवाच्या अस्तित्वावरच आघात करत आहे.

वसुंधरा – विद्रोह करणाऱ्या या अविचारी माणसाला जागे करण्यासाठी साऱ्या जगाने ''२२ एप्रिल'' हा दिवस 'वसुंधरा दिन' म्हणून पाळायला सुरुवात केली आहे. अफाट वाढणाऱ्या लोकसंख्येसोबत मानवनिर्मित कचरा तर, हिमालयापासून हिंदी महासागरापर्यंत पसरला आहे. अशा प्रकारे आपणच विशुद्ध पर्यावरणाचे शत्रू झालो आहोत. आजकाल पर्यावरण जपण्याची जाणीव निर्माण झाली आहे. त्यासाठी कायदे, नियम केले गेले आहेत; पण ते आचरणात येत नाहीत. वृक्षसंवर्धन, विज्ञानसुविधांचा अतिरिक्त उपयोग टाळणे, लोकसंख्येला आळा घालणे, गरजा कमी करणे, प्लास्टिकचा कमी वापर, ओला व सुका कचरा विभागणी अशा लहानसहान पण फार महत्वाच्या गोष्टी करुन पर्यावरण टिकवणे ही आजची गरज आहे. उपलब्ध साधनसंपत्तीचा योग्य वापर करुन पर्यावरणाचे जतन करणे ही आपली जबाबदारी आहे.

''निसर्ग रक्षतु, स एव रक्षति ।''

आपण निसर्गाचे रक्षण केले तर निसर्गही आपले रक्षण करेल. शेवटी मानवी जीवन आणि पर्यावरण हे एकमेकांपासून वेगळे करता येत नाहीत. जर आपण पर्यावरणाचा आदर केला, त्याची काळजी घेतली, तरच आपलं जीवन सुरक्षित आणि आनंदी राहील. म्हणून, आपण सर्वांनी निसर्गाशी सलोखा राखण्याचा संकल्प केला पाहिजे. पर्यावरणाचे रक्षण करणे हे आपले कर्तव्य आहे. म्हणूनच –

मानवाने वाया घालवू नये क्षण,
मानवाने वाया घालवू नये कण,
हा जीवनमंत्र स्विकारु या,
आपले पर्यावरण वाचवू या,
जीवनसृष्टीला जगवूया,
आपण आपल्याला वाचवू या....

****

गुरु शिष्य परंपरा

- तनुजा खोत
...✍ T. Y. B. Com.

आपल्या भारत भूमीत शिष्य परंपरा फार प्राचीन काळापासून चालत आलेली आहे. शिष्य अध्ययनाकरिता गुरुकडे येतो आणि गुरु हातचे न राखता शिष्याला अध्ययना सोबत जीवनाच्या वाटचालीतले दर्शन घडवून शिष्याला घडवतो. एक कुंभार ज्याप्रमाणे सुबक रीतीने मातीचे मडके घडवतो अगदी त्याच तऱ्हेने गुरु चांगल्या वाईट गोष्टींची पारख घडवून अत्यंत परिश्रमाने शिष्याला घडवतो. या गुरुला काही अंशी उतराई होण्याची संधी शिष्याला मिळावी त्याकरिता गुरुपौर्णिमा दिवस निर्मिलेली आहे.

गुरुपौर्णिमेला व्यासपूजा करण्याची पद्धत आहे. महर्षी व्यासांनी महाभारतासारख्या अलौकिक आणि सर्वात श्रेष्ठ असा ग्रंथ लिहिला. महाभारत हा ग्रंथ सामान्य माणसाला धर्मशास्त्र, नीतिशास्त्र, व्यवहार शास्त्र आणि मानसशास्त्राची देखील ओळख करुन देतो. अशा महान आणि श्रेष्ठ ग्रंथाची निर्मिती करणारे महर्षी व्यास यांच्या एवढा महान गुरु अद्याप झाला नाही. त्यांच्या श्रेष्ठत्वाची पूजा करण्याचा हा गुरुपौर्णिमेचा दिवस व्यासपौर्णिमा म्हणून देखील ओळखला जातो. भारतीय संस्कृतीचे मुलाधार आणि शिल्पकार महर्षि म्हणून व्यासांना ओळखले जाते. ज्ञानेश्वर महाराजांनी देखील ज्यावेळी ज्ञानेश्वरी लिहिण्यास सुरुवात केली त्यावेळी सुरुवातीलाच, 'व्यासांचा मागवा घेतू' असा उल्लेख करुन व्यासांच्या श्रेष्ठत्वाप्रती कृतज्ञता व्यक्त केलेली आपल्याला पाहायला मिळते. गुरु हा ज्ञानासा सागर आहे शिष्याने विनम्र भाव अंगी बाणवल्याशिवाय या गुरुरुपी सागरातील जल त्याला प्राप्त करता येणार नाही. जीवन जगत असताना प्रत्येक वळणावर आपल्याला नवनवीन माणसे भेटतात त्यांच्याकडून आपल्याला नवीन काहीतरी शिकायला मिळते ज्यांच्याकडून चांगले काहीतरी आपल्याला शिकायला मिळते म्हणजे ते आपले गुरुच आहेत. आयुष्य जगत असताना आपल्याला गुरुने शिकवलेले सदाचार कायम आपण लक्षात ठेवावयास हवे आणि पुढच्या पिढीकडे संस्कारातून हस्तांतरित करायला हवे हीच आपल्या गुरुचरणी आपली खरी गुरुदक्षिणा ठरेल.



शिकवतं आयुष्य

पुस्तकांनी दिलं अक्षरज्ञान,
पण अर्थ आयुष्याने सांगितला...
गुरुंनी दिला मार्ग चालायला,
पण पायांनीच रस्ता शोधला...

गुणांनी नाही माणूस मोठा,
हे वेळेनेच पटवून दिलं,
पडलो तेव्हा कळलं मला –
उभं राहणं खरं शिकणं होतं...

शिक्षण डोकं उजळतं,
अनुभव मन घडवतं,
दोन्ही साथ दिली जेव्हा,
माणूस खऱ्या अर्थाने बनतं...

- सानिका सुनिल पाटील
T. Y. B. Com.

बेरोजगारी

- प्रणव ह. पवार
F. Y. B. A.

आज आजूबाजूला पाहिल तर प्रत्येक गावात भागात तरुण मुले मुली रोजगारा शिवाय आहेत. शिक्षण तर घेतलेले आहे. काम करण्याची इच्छासुद्धा आहे. तरी पण नोकरीपासून वंचित कसे ? याचा थोडक्यात आढावा आपण घेणार आहोत.

गावातील जन्म घेणारा प्रत्येक तरुण हा मध्यमवर्गीय किंवा गरिब असतो. त्यामुळे तो आपले प्राथमिक शिक्षण हे आपल्या गावातील प्राथमिक शाळेत पूर्ण करतो. ग्रामीण भागामध्ये इंग्रजी मिडीयम शाळा नसल्यामुळे आणि एकादी इंग्रजी शाळा असली तरी पण आर्थिक बाबीमुळे शिकता येत नाही. त्यामुळे प्राथमिक माध्यमिक शिक्षण हे मराठी माध्यमातूनच करावे लागते. याउलट शहरातील मुलांना अगदी लहानापासूनच इंग्रजी भाषेचे शिक्षण मिळते. त्यामुळे त्यांना आजच्या या तंत्रज्ञानावर चालनाऱ्या उद्योगात नोकऱ्या मिळत नाहीत.

महत्वाचे म्हणजे ग्रामीण भागातील मुले दहावी शिक्षण पूर्ण झाले यानंतर पुढे काय करावे याचे मार्गदर्शन त्यांना मिळत नाही. मग बरीच मुले दोन वर्ष कॉलेज करतात. काही मुले तर आपला मित्र ज्या कॉलेजला जाईल त्या कॉलेजला प्रवेश घेतात. मित्र ज्या शाखेत शिक्षण घेतोय त्या शाखेत शिक्षण घेतात आणि मग पुन्हा बारावीचा निकाल लागला की तोच प्रश्न त्यांच्यासमोर उपस्थित राहतो. पूढे काय करायचे ? परिस्थितीमुळे मग काही मुले शिक्षण थांबवून काम करतात.

आपले ध्येय आपले भविष्य न ठरविल्यामुळे ठरावीक वेळेनंतर त्यांना शिक्षणाचे मोल कळते. पण तेव्हा वेळ निघून गेलेली असते. या उलट ग्रॅज्युएट झालेली मुले सुद्धा शिक्षण घेउनही घरी असतात. या शिकण्यासाठी घरच्यांचा दबाव किंवा शिक्षण घेताना कॉलेजच्या नावावर वेळ घालवितात.

बेरोजगारी एक महत्वाचे कारण म्हणजे आपल्या भारत देशामध्ये झपाट्याने वाढत जाणारी लोकसंख्या आहे. नोकऱ्याची संख्या ठरावीक तर तरुणांची संख्या जास्त यामुळे बेरोजगारीचे प्रमाण वाढते. वय आणि वाढता ताणतणाव यासोबतच डोक्यात येणारे असंख्य विचार यामुळे काही तरुण आपले मानसिक संतुलन गमावतात. तरुण मुले दिवसेंदिवस रोजगार मिळण्यासाठी संघर्ष करीत आहेत. पण सरकार यावर पावले उचलत नाही. यामुळे नोकरी न मिळाल्याने बरेच तरुण व्यसनाधिनतेकडे वळतात. बेरोजगारी आणि व्यसन यामुळे अनेक तरुण अविवाहीत राहतात.

बेरोजगारी देशातील एक भीषण समस्या आहे. देशातील बेरोजगारी दूर करण्यासाठी वाढत्या लोकसंख्येवर नियंत्रण करणे आणि देशातील लोकसंख्येला अनुकूल नोकऱ्या उपलब्ध करणे सरकारची जबाबदारी आहे. आज तरुण वर्गाने बेरोजगारी दूर करण्यासाठी स्वत: हालचाल करुन रोजगार निर्मिती करणे गरजेचे आहे.



दापोली तालुक्यातील शिर्दे गावातील 'श्री भोमेश्वर मंदिर'

- कु. श्रावणी दिलीप शिगवण
F. Y. B. A.

रत्नागिरी जिल्ह्यातील दापोली तालुक्यापासून ७ कि.मी. अंतरावर एक छोट 'शिर्दे' गाव आहे. हे गाव काहीसे जंगल व डोंगरी भागात वसलेले आहे. गावातून 'सुर्यनदी' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या नदीचा उगम होतो. या सूर्यनदीच्या काठावर भगवान शिवशंकरांचे 'श्री भोमेश्वर मंदिर' वसलेले आहे. त्या मंदिरातले वारुळ हे तिथले भव्य व आकर्षण आहे. वारुळ म्हणजे भोम. म्हणून या मंदिराला भोमेश्वर मंदिर या नावाने ओळखले जाते. हे मंदिर जवळपास १५० वर्षे जूने असून हे एक स्वयंभू मंदिर आहे. शांतता आणि निसर्ग सौंदर्यासाठी प्रसिद्ध आहे. जिथे खळखळ वाहणारी सूर्यनदी आणि देवराई मनाला भुरळ घालते.

सध्याच्या जागी पूर्वी घनदाट जंगल होते. या जंगलात त्यावेळच्या ग्रामस्थांना स्वयंभू शंकराची पिंडी आढळली. कालांतराने तेथे पूजाअर्चा होऊ लागली. बाळ व बेहरे आडनाव असलेल्या ब्राह्मण घराण्यांनी तेथे मंदिर बांधले. मंदिर अगदी साधेसुधे आणि झोपडीत होते. एक दिवस मंदिरात वलय म्हणजेच जमिनीचे सपाटीकरण आणि सारवण करत असताना पिंडीशेजारी एक मोठे भोम (वारुळ) तयार झालेले दिसले. हे वारुळ काढून माती मंदिराबाहेर फेखून दिली. दुसऱ्या दिवशी सकाळी जमिनीला चोप देण्यासाठी आलेल्या माणसांना मंदिराबाहेर टाकलेली माती तेथे नसून पुन्हा मंदिरामध्ये होते- तसे वारुळ तयार झालेले दिसले व त्यात वलय करण्यासाठी ठेवलेली साधने देखील वारुळाच्या आत लुप्त झाली. त्यामुळे पुढे हे मंदिर 'श्री भोमेश्वर मंदिर' या नावाने ओळखले जाऊ लागले. आजही हे मंदिर स्वयंभू आहे. आजही ती साधने भोमामध्येच आहेत असे सांगितले जाते. वारुळ जमिनीपासून साधारणत: ५ ते ६ फूट इतके उंच आहे. पूर्वी हे मंदिर कौलारु स्वरुपाचे होते. ह्या मंदिराच्या परिसरात अजून काही लहान-लहान देवळांचे चौथरे दिसून येतात. या मंदिरात सध्या शिवपिंड बरोबरच देवळात ग्रामदैवत झोलाई, काळकाई, कोटेश्वरी, गावपांढर इत्यादी देवी-देवतांच्या मूर्ती आहेत. या मंदिरात महाशिवरात्री, नवरात्री व शिमग्याच्या वेळेस मोठ्या प्रमाणात उत्सव साजरे केले जातात. सन १९७८-७९ ला बाळ व बेहरे यांनी मंदिराच्या गोलाकार घुमटाचे काम पूर्ण करुन प्रथम जिर्णोद्धार केला. त्यानंतर १९८०-८५ या कालावधीत ग्रामस्थांनी मंदिराचे उर्वरित काम करुन पुन्हा जिर्णोद्धार केला. सूर्यनदीमुळे परिसराची नैसर्गिक सुंदरता आणि आध्यात्मिक वातावरण अधिक अनुभवायला मिळते. 'श्री भोमेश्वर मंदिर' हे गावातील श्रद्धास्थान आहे. शिर्दे गावातील सर्व माणसं, लहान मुले महाशिवरात्री, शिमगा, गोकुळ अष्टमी आणि नवरात्र उत्सव इत्यादी सणांची आतुरतेने वाट पाहत असतात. श्रावण महिना ही मोठ्या प्रमाणात साजरा केला जातो. महाशिवरात्रीच्या दिवशी मंदिरात मोठ्या प्रमाणात गर्दी दिसून येते. या दिवशी भजन, कीर्तन, भारुड इत्यादी कला सादर केल्या जातात. तसेच शिमग्यात गावभेटीला आलेला देव परत मंदिरात जातो आणि वर्षभराची आस पुन्हा लावतो असं म्हटलं जातं. तसेच दसरा असो किंवा इतर सण मोठ्या प्रमाणात साजरे करण्याचा ग्रामस्थ प्रयत्न करतात आणि अगदी या सणांची आतुरतेने वाट पाहत असतात.



ग्रामीण भागातील स्त्री जीवन

- अनुजा किसन मळेकर
...✍ F. Y. B. A.

ग्रामीण भागातील स्त्री ही कुटुंबाचा आधार स्तंभ आणि समाजाच्या प्रगतीची मुख्य शक्ती मानली जाते. तिचे जीवन कष्टमय असले तरी त्यात त्याग, प्रेम, जिद्द आणि सहनशीलतेचे अद्वितीय दर्शन घडते. पहाटेच्या कोंबड्याच्या आरवण्यापूर्वीच तिचा दिवस सुरु होतो आणि तिच्यावर प्रमुख जबाबदाऱ्या येतात. घर सांभाळणे. पाणी भरणे, स्वयंपाक करणे, घर स्वच्छ ठेवणे, मुलांची व वृद्धांची काळजी घेणे ही कामे ती नियमितपणे करते. या शिवाय ती शेतीकामातही पुरुषांबरोबर खांद्याला खांदा लावून काम करते. नांगरणी, पेरणी, कापणी, जनावरांची देखभाल अशी अनेक कामे ती पार पाडते.

शिक्षणाच्या बाबतीत पूर्वी ग्रामीण भागातील मुलींना फारशी संधी मिळत नव्हती. लवकर लग्न, गरिबी आणि समाजातील रुढी यांमुळे अनेक मुलींचे शिक्षण अर्धवट राहायचे परंतु आज परिस्थिती हळूहळू बदलत आहे. शासनाच्या योजना, मोफत शिक्षण, शिष्यवृत्ती यांमुळे मुली शिक्षणाकडे वळत आहे आणि त्या विविध क्षेत्रात यश मिळवत आहेत. आर्थिक दृष्ट्या देखील ग्रामीण स्त्रिया स्वावलंबी होत आहेत. बचत गटांच्या माध्यमातून त्या लघुउद्योग सुरु करतात. हस्तकला, दुग्ध व्यवसाय, शेती पूरक उद्योग, यांत सहभाग घेतात. त्यामुळे कुटुंबाच्या उत्पन्नात वाढ होते आणि त्यांचे समाजातील स्थान उंचावते.

तरीही ग्रामीण स्त्रीसमोर अनेक आव्हाने आहेत. आरोग्य सुविधांचा अभाव, कुपोषण, अज्ञान, घरगुती हिंसा अशा समस्या आजही काही प्रमाणात दिसून येतात. या समस्यांवर मात करण्यासाठी समाजाची मानसिकता बदलणे आवश्यक आहे. स्त्री-पुरुष समानतेची जाणीव निर्माण झाली तरच खऱ्या अर्थाने ग्रामीण विकास साध्य होईल.

आजची ग्रामीण स्त्री बदल स्वीकारत आहे. ती शिक्षण, राजकारण, क्रीडा, व्यवसाय अशा विविध क्षेत्रात पुढे येत आहे. पण अजून ही काही अडचणी आहेत. लवकर लग्न, गरिबी, आरोग्याच्या समस्या आणि काही जुन्या परंपरा यांमुळे तिच्या प्रगतीला अडथळे येतात. समाजाने आपली मानसिकता बदलून स्त्रीला समान संधी दिल्या तरच खऱ्या अर्थाने विकास होईल.

माझ्या मते ग्रामीण स्त्री ही जिद्दी, सहनशील आणि मेहनती असते. तिच्या योगदानामुळेच कुटुंब आणि समाजाची प्रगती होते. तिच्या शिक्षणासाठी आणि सक्षमीकरणासाठी सर्वांनी प्रयत्न करणे आवश्यक आहे. ग्रामीण स्त्री ही केवळ कुटुंबाची जबाबदारी सांभाळणारी नसून ती संस्कृती व परंपरेची जपणूक करणारी आहे. सण-उत्सव, धार्मिक कार्यक्रम, लोक परंपरा या मध्ये तिचा मोठा सहभाग असतो.

ग्रामीण भागातील मुलींच्या आयुष्यातही हळूहळू सकारात्मक बदल दिसत आहे. क्रीडा, शिक्षण आणि कला क्षेत्रात त्या प्रगती करत आहेत. शासकीय शिष्यवृत्ती, सायकल योजना, मोफत शिक्षण अशा उपक्रमांमुळे त्यांना पुढे जाण्याची संधी मिळत आहे.

तसेच डिजिटल युगाचा प्रभाव ग्रामीण स्त्रियांच्या जीवनावर पडू लागला आहे. मोबाईल फोन आणि इंटरनेटमुळे त्यांना बाजारभाव, शासकीय योजना आणि आरोग्यविषयक माहिती सहज उपलब्ध होत आहे. काही महिला ऑनलाईन व्यवसाय किंवा घरगुती उत्पादनांची विक्री करुन अतिरिक्त उत्पन्नही मिळवत आहेत.

ग्रामीण भागातील स्त्री ही कुटुंबातील मुलांच्या संस्कारांची पहिली शाळा असते. तिच्या विचारांचा आणि वर्तनाचा प्रभाव पुढील पिढीवर पडतो. ती मुलांमध्ये प्रामाणिकपणा, कष्टाची सवय आणि सहकार्याची भावना निर्माण करते.

ग्रामीण स्त्रीच्या आयुष्यात कष्टांसोबत आशा आणि जिद्दही तितकीच महत्त्वाची आहे. ती परिस्थितीनुसार स्वत:ला घडवत रहाते आणि आपल्या कुटुंबाच्या उज्ज्वल भविष्यासाठी सतत प्रयत्नशील असते.

*****

माझे महाविद्यालय आणि ग्रंथालय : ज्ञान, संस्कार आणि प्रेरणेचा प्रवास

- गणेश रायका वसावे
तृतीय वर्ष कला

मी गणेश वसावे, टी.वाय.बी.ए.चा विद्यार्थी, न. का. वराडकर कला आणि रा. वि. बेलोसे वाणिज्य महाविद्यालय या प्रतिष्ठित महाविद्यालयाचा एक कृतज्ञ आणि अभिमानी विद्यार्थी आहे. २०२५-२०२६ या शैक्षणिक वर्षात मला ''ग्रंथालयाचा आदर्श विद्यार्थी वाचक पुरस्कार'' प्राप्त झाला. हा क्षण माझ्या आयुष्यातील अत्यंत भावनिक आणि अविस्मरणीय ठरला. पुरस्कार जाहीर झाल्याचा क्षण आजही माझ्या डोळ्यांसमोर ताजा आहे. त्या क्षणी मला माझ्या सातत्यपूर्ण परिश्रमांची जाणीव झाली; पण त्याहून अधिक महत्त्वाची जाणीव झाली ती म्हणजे माझ्या महाविद्यालयाने दिलेल्या संस्कारांची.

नंदुरबार ते दापोली

मी मूळचा सल्लीबार या आदिवासी गावातील. नंदुरबार जिल्ह्यातील अक्कलकुवा तालुक्यातील त्या छोट्याशा गावातून मी शिक्षणासाठी दापोली येथे आलो. सुरुवातीला सर्व काही नवीन होते भाषा, वातावरण, लोक आणि जीवनशैली. परंतु आज दापोलीने मला आपलेसे केले आहे.

महाविद्यालयातील मित्र-मैत्रिणी, एन.सी.सी. चे सर्व सहकारी यांनी मला समजून घेतले, आपुलकीने वागविले. त्यांच्या प्रेमळ स्वभावामुळे दापोली हे माझे गाव कधी होऊन गेले, हे मला कळलेच नाही. या शहराने मला ओळख दिली, आत्मविश्वास दिला आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे माणुसकीचे प्रेम दिले. हे मी आयुष्यभर लक्षात ठेवीन.

महाविद्यालय-आयुष्याची दिशा ठरवणारे केंद्र

न. का. वराडकर कला आणि रा. वि. बेलोसे वाणिज्य महाविद्यालय हे केवळ शिक्षण देणारी संस्था नाही, तर विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाला आकार देणारे संस्कार केंद्र आहे. येथे मिळणारे शिक्षण पुस्तकी मर्यादेत न राहता जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात उपयोगी पडणारे आहे.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. भारत कऱ्हाड सर यांचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांसाठी दीपस्तंभासारखे आहे. त्यांच्या प्रेरणादायी विचारांमुळे आम्हाला मोठी स्वप्ने पाहण्याची आणि ती पूर्ण करण्यासाठी सातत्याने प्रयत्न करण्याची प्रेरणा मिळते. त्यांनी नेहमीच विद्यार्थ्यांना आत्मविश्वास आणि सकारात्मक दृष्टीकोन दिला आहे.

महाविद्यालयातील प्रत्येक उपक्रम विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी असतो. शैक्षणिक गुणवत्तेसोबत नैतिक मूल्ये, सामाजिक जाणीव आणि जबाबदारीची भावना येथे रुजवली जाते. या वातावरणामुळेच माझ्या व्यक्तिमत्त्वात सकारात्मक बदल घडत गेले.

ग्रंथालय-शांततेत घडणारी क्रांती

महाविद्यालयाचे ग्रंथालय म्हणजे माझ्यासाठी एक वेगळेच विश्व आहे. शांत, प्रसन्न आणि अभ्यासपूर्ण वातावरणात बसून पुस्तकांच्या सहवासात घालवलेले तास हे माझ्या आयुष्यातील सर्वात मौल्यवान क्षण आहेत.

ग्रंथपाल तेजस रेवाळे सर यांनी माझ्या वाचन प्रवासात अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावली. सुरुवातीला मी केवळ अभ्यासक्रमापुरते वाचन करत होतो. परंतु त्यांनी मला सांगितले - ''फक्त परीक्षेसाठी नाही, तर आयुष्यासाठी वाचा.'' हे वाक्य माझ्या मनात कोरले गेले.

त्यांच्या मार्गदर्शनामुळे माझ्या हातात प्रथम आलेले पुस्तक म्हणजे श्यामची आई. साने गुरुजी यांच्या लेखणीतून उभे राहिलेले मातृप्रेम आणि संस्कारांचे चित्रण वाचताना माझे मन भारावून गेले. त्या पुस्तकाने मला जीवनातील साधेपणा आणि कृतज्ञता शिकवली.

यानंतर मी मन मे है विश्वास हे पुस्तक वाचले. संघर्षातून यशाकडे वाटचाल करणाऱ्या एका अधिकाऱ्याचा प्रेरणादायी प्रवास माझ्या मनाला उभारी देऊन गेला.

तसेच गरुडझेप-एक ध्येयवेडा प्रवास हे पुस्तक माझ्यासाठी

विशेष ठरले. एका गरीब कुटुंबातील मुलाने कठोर परिश्रम आणि जिद्दीच्या बळावर अधिकारी होण्यापर्यंत केलेला संघर्ष या पुस्तकातून स्पष्टपणे दिसतो. हे पुस्तक स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्यांसाठी मार्गदर्शक दीपस्तंभ आहे. योग्य वेळी योग्य साहित्य मिळाल्यामुळे माझ्या विचारविश्वाला नवी दिशा मिळाली.

एन. सी. सी. – शिस्त आणि राष्ट्रभक्तीची शिकवण

महाविद्यालयातील एन. सी. सी. विभागाचे प्रमुख सिताफुले सर यांचे मार्गदर्शन मला लाभले. एन. सी. सी. मुळे माझ्या शिस्त, वेळेचे नियोजन, नेतृत्वगुण आणि राष्ट्रप्रेमाची भावना अधिक दृढ झाली. सकाळच्या परेडपासून ते विविध शिबिरांपर्यंत प्रत्येक अनुभवाने मला मानसिकदृष्ट्या सक्षम केले. एन. सी. सी. मधील शिस्त आणि ग्रंथालयातील वाचन यांचा संगम माझ्या व्यक्तिमत्त्वाच्या जडणघडणीत अत्यंत महत्त्वाचा ठरला.

वैयक्तिक अनुभव

एक दिवस असा होता की परीक्षांच्या अभ्यासामुळे मी थोडासा खचलेलो होतो. अभ्यासाचा प्रचंड ताण आणि भविष्याबद्दलची चिंता मनात होती. त्या दिवशी मी ग्रंथालयात शांतपणे बसलो होतो. रेवाळे सरांनी माझ्या चेहऱ्यावरची चिंता ओळखली मी सर्व वस्तुस्थिती सांगितली त्यावेळी त्यांनी मला **''गरुडझेप''** हे पुस्तक माझ्या हातात दिले. त्यांनी फक्त एवढेच सांगितले ''हे वाच, तुला तुझं उत्तर सापडेल.''

त्या रात्री मी पुस्तक वाचताना जाणवले की अडचणी या शेवट नसतात; त्या नव्या सुरुवातीची चाहूल असतात. त्या दिवसानंतर माझा दृष्टिकोन बदलला. त्या एका पुस्तकाने माझ्या मनात नव्या आशेचा दिवा पेटवला.

कृतज्ञतेची भावना

आज ''आदर्श विद्यार्थी वाचक पुरस्कार'' माझ्या हातात आहे; पण या यशामागे माझ्या महाविद्यालयाचे प्राचार्य, एन. सी. सी. प्रमुखांचे, ग्रंथपालांचे तसेच माझ्या मित्र-मैत्रिणींचे अमूल्य योगदान आहे.

सल्लीबार या छोट्याशा आदिवासी गावातून दापोलीपर्यंतचा माझा प्रवास हा केवळ अंतराचा नाही, तर आत्मविश्वास, ज्ञान आणि संस्कारांचा प्रवास आहे.

माझ्यासाठी ग्रंथालय हे केवळ पुस्तकांचे दालन नाही, तर स्वप्नांना पंख देणारे स्थान आहे.

माझे महाविद्यालय हे केवळ शिक्षण संस्था नाही, तर माझ्या आयुष्याला दिशा देणारे प्रेरणास्थान आहे.

''पुस्तकांशी मैत्री करा, कारण तीच तुमच्या स्वप्नांना आकार देतात, वाचा, विचार करा आणि स्वत:ला घडवा-कारण वाचन हीच यशाची खरी गुरुकिल्ली आहे.''

या ज्ञानमंदिराचा विद्यार्थी असल्याचा मला सदैव अभिमान राहील.

*****

सोबती

आयुष्य किती सुंदर असतं ना,
स्वप्नांनी भरलेलं,
समजून घेणारं मन भेटलं की,
जगण ही असत सोपं झालेलं.

नाही हवी असते दौलत,
नाही हवे मोठे संसार,
फक्त मनाशी मन जुळणारा,
हवा असतो एक आधार.

सुखात असणारा सोबती,
दु:खात खांदा देणारा,
शब्द न बोलताही मनातलं, ओळखणारा.

असा एक सोबती मिळाला की,
आयुष्य खुलून जातं,
प्रत्येक वळणावर जगणं मग,
अधिक सुंदर वाटतं...!

- आर्यन संतोष मळेकर
11th Arts

जलसंधारण

- ऋतुराणी मनोहर धाडवे
...✍ T. Y. B. Com.

जलसंधारण म्हणजे उपलब्ध पाण्याचा जपून वापर करणे. तिचे संरक्षण करणे आणि विकास करणे. जेणे करुन मानवी जीवन, शेती व उदयोग यांच्या गरजा पूर्ण होतील आणि भविष्यातील पिढ्यांसाठी पाणी वाचवता येईल कारण पृथ्वीवर पाणी भरपूर असेल तरी पिण्यायोग्य गोड्या पाण्याची उपलब्धता खूप कमी आहे, त्यामुळे प्रत्येक थेंब जपून वापरणे तसेच पाण्याचा अपव्यय टाळणे आणि पाण्याचे होणारे प्रदूषण थांबणे आवश्यक आहे. जलसंधारण म्हणजेच जलसंपत्तीचे संरक्षण, संवर्धन व विकास आणि तिचे उपयुक्तता व फायदेशीर व्यवस्थापन होय.

पाणी हे मानव, प्राणी आणि वनस्पती यांच्या जीवनासाठी अत्यंत आवश्यक आहे. पिणे, शेती, उद्योग आणि स्वच्छता यांसारख्या सर्व कामांसाठी पाण्याची गरज असते. पृथ्वीचा ७०% भाग पाण्याने व्यापलेला असला तरी पिण्या योग्य गोड्या पाण्याचे प्रमाण १% पेक्षाही कमी आहे. उर्वरित पाणी खारे किंवा बर्फाच्या रुपात आहे. तसेच जलसंधारणात वाढती लोकसंख्या, औद्योगिकीकरण आणि हवामान बदलामुळे पाण्याची मागणी वाढत आहे. ज्यामुळे पाणी टंचाईच्या समस्या निर्माण होत आहेत. जलसंधारणामुळे पर्यावरण रक्षणाची भूजल पातळी वाढते. जल स्त्रोतांचे संरक्षण होते आणि पर्यावरणाचा समतोल राखण्यास मदत होते.

पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी जलसंवर्धन हे एक महत्त्वाचे पाऊल आहे. पृथ्वीवरील जीवनाला, सजीवांना आधार देणारे एक महत्त्वाचे संयुग आहे. पाणी हे आपल्यासाठी निसर्गाच्या सर्वात महत्त्वाच्या देणग्यांपैकी एक आहे. सर्व सजीवांना जगण्यासाठी पाण्याची आवश्यकता असते. आपण दरोज पिण्यासाठी, स्वयंपाक करण्यासाठी, साफसफाईसाठी आणि शेतीसाठी पाण्याचा वापर करतो. यामुळे आपण याची काळजी घेतली पाहिजे कधी ही पाणी वाया घालवू नये. जलसंधारण म्हणजे पाण्याचा योग्य पद्धतीने वापर करणे आणि भविष्यासाठी ते टिकवून ठेवणे वाचवणे आवश्यक आहे. आपण अनेक पद्धतीने पाणी वाचवू शकतो. वापरानंतर आपण नळ घट्ट बंद केले पाहिजे, कमी वेळ पाणी वापरणे, तसेच दात घासताना पाण्याचा अपव्यय टाळणे, पाणी साठवून ते झाडांसाठी वापरु शकतो. शेतात पाणी वाचवण्यासाठी शेतकरी चांगल्या पद्धती वेगवेगळे उपाय करुन पाण्याची बचत करु शकतो. जर आपण सर्वांनी पाणी वाचवण्याचा प्रयत्न केला तर आपल्या नद्या, तलाव व विहिरी आटणार नाहीत. आज पाणी वाचवल्याने आपल्याला उद्या सुरक्षित आणि निरोगी जीवन जगण्यास मदत होईल.

पाणी हे पृथ्वीवरील सर्वात मौल्यवान संसाधनापैकी एक आहे. परंतु जगाला पाणी टंचाई गंभीर समस्या भेडसावत आहे. काही ठिकाणी लोकांना सुरक्षित पिण्याचे पाणी मिळत नाही. याचा अर्थ असा की ते आजारांना आणि अस्वास्थ्यकर जीवनाला बळी पडतात. पाण्याच्या गुणवत्तेवरही परिणाम होत आहे. हवामानाच्या असुरक्षिततेमुळे पूर आणि दुष्काळ अधिक वारंवार येतात. त्यामुळे पाणी वाचवण्याची गरज वाढते. जागतिक स्तरावर गोड्या पाण्याची वाढती मागणी पूर्ण करण्यासाठी जलसंवर्धन अत्यंत महत्वाचे आहे. शेती, उद्योग आणि घरांसाठी पाण्याचा वापर खूप जास्त आहे. पाण्याचे संवर्धन करुन आपण वापरण्यासाठी अतिरिक्त पाणी उपलब्ध करुन देऊ शकतो आणि मर्यादित संसाधनावरुन होणारे संघर्ष टाळू शकतो. जलसंवर्धनामुळे परिसंस्थेतील संतुलन राखण्यास मदत होते. पाणी संवर्धनाचे सर्वोत्तम मार्ग म्हणजे पावसाचे पाणी साठवणे, पाण्याचे संयंत्र बसवणे, बाग कामासाठी, शेतीसाठी पाण्याचा पुनर्वापर करणे, वापरात

नसताना नळ बंद करणे, योग्य सिंचन, स्वयंचलित नळ बंद करणारी उपकरणे बसवणे, पाण्याचे स्त्रोत प्रदूषित न करणे आणि बरेच काही साधन संपत्तीचा शाश्वत वापर सुनिश्चित करण्यासाठी पाण्याचे संवर्धन अत्यंत महत्त्वाचे आहे. पाणी वाचवणे हे आपले मूलभूत कर्तव्य आहे. पाण्याचा वापर योग्य पद्धतीने करणे आवश्यक आहे. पाणी वाया न घालवता ते जमिनीत मुरवणे किंवा साठवून ठेवणे हा एक प्रभावी उपाय आहे. पाण्याचा कार्यक्षम वापर शेती, ठिंबक सिंचन आणि तुषार सिंचनाचा वापर करणे. नद्या, तलाव आणि भूजल स्त्रोत स्वच्छ ठेवणे जलप्रदुषण टाळणे. तसेच कमी उताराच्या जमिनीवर आणि डोंगराळ भागात जागीच पाणी मुरवणे. प्रत्येकाने पाण्याची बचत करणे ही आपली जबाबदारी आहे.

जलसंधारण ही काळाची गरज आहे. पाण्याचा अपव्यय थांबवून आणि योग्य नियोजन करुनच आपण आपल्या पृथ्वीवरील जीवसृष्टीचे रक्षण करु शकतो. प्रत्येक थेंब वाचवणे ही आपली जबाबदारी आहे. जलसुरक्षामुळे पिण्याची आणि शेतीसाठी पाण्याची उपलब्धता सुनिश्चित होते. तसेच आर्थिक विकासात सिंचनामुळे शेतीत आणि पर्यायाने अर्थव्यवस्थेत सुधारणा होते. परिसरातील जलचक्र संतुलित राहते. दुष्काळ मुक्ती पाण्याची उपलब्धता वाढल्याने दुष्काळाचा सामना करण्यास मदत होते.

तर जलसंधारण ही केवळ शासनाची जबाबदारी नसून ती प्रत्येकाची नैतिक जबाबदारी आहे. जलसंधारणासाठी आपल्या सर्वांच्या एकत्रित प्रयत्नांतून आपण जलसंपत्तीचे रक्षण करु शकतो आणि येणाऱ्या पिढ्यांसाठी एक सुजलाम सुफलाम महाराष्ट्र निर्माण करु शकतो.

बोल रे माणसा...

गप्पांचा ओघ वाहायच्या,
हसत-खेळत मनं फुलवून,
आज तीच मंडळी आहेत,
पण स्क्रीनमध्ये कैद झालेली,
शब्दांची अब हरवली,
फक्त 'टायपिंग'ची रेष राहीली...

कधी काळी नजरेतून वाचायचो मनाचे भाव,
आज इमोजीने सांगतो आपण आपला वाव,
हातात मोबाईल, पण हृदयात दुरावा,
जवळ असूनही झालो आपण, एकटेपणाचा ठेवा...

बोलणे म्हणजे जादू असते,
जोडते दोन आत्म्यांना,
एक हसू, एक शब्द पुरतो,
मिटवायचा दु:खांना.
पण शांततेचा हा किल्ला,
आता गडद झाला,
मैत्रीचा दीप,
संवादाशिवाय विझला...

चला, पुन्हा उजळूया ती गप्पांची ज्योत,
थोडं बोलूया मनापासून, थोड्या मौनाची ओट.
कारण माणूस माणसाशी बोलतो,
तेव्हा जग रंगत,
शब्दांनीच मन जुळतं,
आणि आयुष्य खर आनंदत...!

- आर्यन संतोष मळेकर
11th Arts

पंचतत्वे - पृथ्वी, जल, अग्नी, वायू, आकाश

- जुई मनोज परचुरे
प्रथम वर्ष कला



भारतीय तत्त्वज्ञानानुसार हे संपूर्ण विश्व आणि मानवी शरीर ज्या पाच मूलभूत घटकांपासून बनलेले आहे, त्यांना 'पंचतत्वे' किंवा 'पंचमहाभूते' असे म्हणतात. ही पाच तत्वे म्हणजे पृथ्वी, जल, अग्नी, वायू आणि आकाश. निसर्गाचे चक्र सुरळीत चालण्यासाठी या तत्वांचे एकमेकांशी संतुलन असणे अत्यंत आवश्यक आहे.

''क्षिती, जल, पावक, गगन, समीर ।
पंच रचित अति अधम सरीर ।।''

रामचरितमानसातील या ओळी सांगतात की, आपले शरीर या पाच तत्वांनी बनलेले आहे. केवळ मानवी शरीरच नव्हे, तर या विश्वातील प्रत्येक सजीव आणि निर्जीव वस्तू या पाच घटकांच्या मिश्रणातून तयार झाली आहे. जेव्हा या तत्वांचे संतुलन बिघडते, तेव्हा प्रलय किंवा विनाश येतो आणि जेव्हा ही तत्वे एकत्र राहतात, तेव्हा जीवनाची निर्मिती होते.

पृथ्वी : स्थिरतेचा आधार

पृथ्वी हे सर्वात स्थूल तत्व आहे. यात गंध हा मुख्य गुण असतो. आपल्या शरीरातील हाडे, मांस, त्वचा आणि दात हे पृथ्वी तत्वाचे प्रतिनिधीत्व करतात. पृथ्वी आपल्याला आधार देते, अन्न देते आणि सहनशीलता शिकवते. ज्याप्रमाणे पृथ्वी स्वत:वर होणारे सर्व आघात सोसून आपल्याला सुजलाम-सुफलाम फळे-फुले देते, तशीच सहनशक्ती मानवाने अंगी बाणवावी, असा संदेश हे तत्व देतेह्न

जल : जीवनाचा प्रवाह

'जीवन' हे पाण्याचे दूसरे नाव आहे. चव 'रस' हा पाण्याचा मुख्य गुण आहे. पृथ्वीचा ७०% भाग पाण्याने व्यापला आहे आणि मानवी शरीरातही रक्ताच्या आणि इतर द्रव्यांच्या स्वरुपात पाण्याचे प्रमाण तेवढेच आहे. जल तत्व आपल्याला प्रवाहीपणा, शीतलता आणि स्वच्छता शिकवते. पाण्याशिवाय सृष्टीची कल्पना करणे अशक्य आहे.

अग्नी : ऊर्जेचे स्त्रोत

अग्नी किंवा तेज हे ऊर्जेचे प्रतीक आहे. रुप हा अग्नीचा गुण आहे. सूर्याच्या रुपात अग्नी संपूर्ण जगाला प्रकाश आणि उष्णता देतो. मानवी शरीरात 'जठराग्नी'च्या रुपात तो अन्नाचे पचन करतो. अग्नी हा शुद्धिकरणाचे काम करतो; तो अशुद्धता जाळून टाकतो आणि प्रकाश पसरवतो. हे तत्व आपल्याला तेजस्वी बनवण्याची आणि आळस झटकून कार्यप्रवण होण्याची प्रेरणा देते.

वायू : प्राणशक्तीचा संचार

वायू म्हणजे हवा, जी आपण श्वासावाटे आत घेतो. स्पर्श हा वायूचा मुख्य गुण आहे. वायू सतत गतिशील असतो. शरीरात प्राणवायू आपल्याला जिवंत ठेवतो. वायू तत्व हे अदृश्य असूनही सर्वात शक्तिशाली आहे. हे तत्व आपल्याला सतत कार्यरत राहण्याची आणि सर्वत्र संचार करण्याची वृत्ती देते वायूशिवाय कोणतेही कार्य घडणे शक्य नाही.

आकाश : अनंताची व्याप्ती

आकाश हे सर्वात सूक्ष्म आणि व्यापक तत्व आहे. शब्द हा आकाशाचा गुण आहे. जिथे काहीच नाही, तिथे आकाश असते. हे तत्व पोकळी आणि विस्ताराचे प्रतीक आहे. आपल्या शरीरातील पोकळ भाग आणि ऐकण्याची क्षमता (कर्णेंद्रिये) आकाश तत्वाशी संबंधित आहेत. आकाश आपल्याला विशालता, शांतता आणि मोकळेपणाची जाणीव करुन देते.

पंचतत्वाचे संतुलन आणि आजची स्थिती

निसर्गाचा नियम असा आहे की, जोपर्यंत ही पाच तत्वे संतुलित आहेत, तोपर्यंत सृष्टी सुरक्षित आहे. परंतु, आज मानवाच्या हव्यासामुळे ही पाचही तत्वे प्रदूषित झाली आहेत.

- रसायनांमुळे पृथ्वी नापीक होत आहे.
- कचरा आणि सांडपाण्यामुळे जल प्रदूषित होत आहे.
- वाढत्या उष्णतेमुळे तेज तत्वाचा कोप होत आहे.
- धुरामुळे वायू विषारी झाला आहे.

• ध्वनी प्रदूषण आणि लहरींमुळे आकाश तत्वही बाधित झाले आहे.

आपल्या पूर्वजांनी या पंचतत्वांना 'देव मानले होते', कारण त्यांना माहित होते की या तत्वांचे रक्षण म्हणजे मानवाचे रक्षण आहे. ''पिंडी ते ब्रम्हांडी'' या उक्तीनुसार, जे विश्वात आहे तेच आपल्या शरीरात आहे. जर आपण निसर्गाचा समतोल राखला, तरच ही पंचतत्वे आपल्याला साथ देतील. पर्यावरणाचे रक्षण करणे हीच या पंचतत्वांची खरी पूजा ठरेल.

तुच आहेस तुझ्या जीवनाचा शिल्पकार

घडवायचं स्वप्न तुला, तर हातोडा तुझ्याच हाती,
तुझ्या मनाची ताकद आहे, तुझ्या डोळ्याची ज्योती.
अडथळे येतील पुढे, वादळेही कधीतरी धडकतील,
पण तुझ्या पावलांच्या ठशांनीच नवी वाटा उमटतील.
इतरांनी घडवलेलं जीवन, टिकत नाही फार काळ,
तुझ्या प्रयत्नांच्या मातीचा, तुच घडव रे तो भाल.
स्वत:वर विश्वास ठेव, धैर्याची करवत उचल,
एकेक घाव प्रेमाने दे, मितीला मात्र नकोच पाचर.
यशाचं तेज जेव्हा पसरते, परिश्रमांच्या चिंतेतून
तुझ्या घडवलेल्या या मूर्तीतून, प्रकटतं तुझंच व्यक्तीमत्व सुंदरुन.
म्हणून उठ, पाऊल टाक, जगण्याला एक आकार दे,
तुच आहेस इथे – तुच – आहेस.
तुझ्या जीवनाचा खरा शिल्पकार...!

- आर्यन संतोष मळेकर
11th Arts

शाळेची आठवण

शाळा म्हणजे एक घर होतं,
जिथे मन आनंदी राहायचं...
प्रत्येक क्षण तिचे सुंदर होतं,
ते आठवलं की आनंद व्हायचं...
ती बाकं, ते मित्र, ती घंटा,
सगळं अजूनही मनात आहे...
शाळेचे ते दिवस परत यावे,
याचीच एक छोटी आस आहे...!

- आर्यन संतोष मळेकर
11th Arts

कॉलेज : एक अनमोल प्रवास

पहिलं पाऊल कॉलेजच्या दारी,
हसू होतं ओठांवरी, भीती होती भारी,
नवे मित्र, नवी स्वप्नं रंगायची,
शिकताना मजाही भरपूर यायची...
कट्ट्यावरच्या गप्पा अन् टेस्तचं tension,
गोष्टी छोट्या, पण आठवणींचं collection,
सांस्कृतिक कार्यक्रम, स्पर्धांची मज्जा,
प्रत्येक क्षणांत होती एक वेगळीच मज्जा...
आज संपल ते पर्व, पण मन तिथचं राहतं,
त्या दिवसांची आठवण मनात रोज दाटतं,
कॉलेज म्हणजे आयुष्याचं सुंदर पान,
जिथे शिकतो प्रेम, संघर्ष आणि ज्ञान...!

- आर्यन संतोष मळेकर
11th Arts

पर्यावरण संरक्षणात युवकांची जबाबदारी

- श्रेया सुधीर तुरे
प्रथम वर्ष कला

पर्यावरण हे आपल्या जीवनाचा आधार आहे. हवा, पाणी, माती, झाडे आणि प्राणी यांच्यामुळेच मानवाचे अस्तित्व टिकून आहे. पण आज औद्योगिकीकरण, वाढती लोकसंख्या, प्रदूषण आणि प्लास्टिकच्या अतिवापरामुळे पर्यावरणाचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. त्यामुळे पर्यावरणाचे संरक्षण करणे ही सर्वांची जबाबदारी आहे. यामध्ये युवकांची भूमिका फार महत्त्वाची आहे.

युवक म्हणजे समाजाची ताकद आणि ऊर्जा. त्याच्यात बदल घडवण्याची क्षमता असते. युवक जर पर्यावरण संरक्षासाठी पुढे आले, तर समाजात मोठा बदल घडू शकतो. युवक आजच चांगल्या सवयी लावतील. तर भविष्यात पर्यावरण सुरक्षित राहील.

पर्यावरण संरक्षणात युवकांची पहिली भूमिका म्हणजे जागरुकता निर्माण करणे. युवक आपल्या मित्रांमध्ये कुटुंबात आणि समाजात पर्यावरणाचे महत्त्व समजावून सांगू शकतात. प्लास्टिकचा कमी वापर, पाणी वाचवणे, झाडे लावणे याविषयी लोकांना सांगणे हे युवक सहज करु शकतात.

युवकांनी प्रत्यक्ष कृतीतून पर्यावरणाचे संरक्षण करावे. वृक्षारोपण करणे, झाडांची काळजी घेणे, परिसर स्वच्छ ठेवणे, कचरा ओला व सुका वेगळा करणे. पावसाचे पाणी साठवणे अशा गोष्टी युवक करु शकतात. लहान कृतीतूनही मोठा बदल होऊ शकतो.

पर्यावरणासाठी चांगली जीवनसृष्टी स्वीकारणे हा देखील युवकांची भूमिका आहे. अनावश्यक वीज वापर टाळणे, पाणी वाया घालवू नये, सार्वजनिक वाहतूक व सायकलचा वापर करणे, प्लास्टिकच्या पिशव्यांऐवजी कापडी पिशव्या वापरणे या सवयी पर्यावरणाला उपयोगी आहेत.

युवकांनी पर्यावरण विषयक नियम पाळावेत आणि इतरांनाही ते पाळायला सांगावेत. शासनाची पर्यावरण विषयक उपक्रमात सहभाग घेणे, स्वच्छता मोहीम आणि वृक्षारोपण कार्यक्रमात सहभागी होणे. हे ही महत्त्वाचे आहे.

याशिवाय, युवकांनी शासनाच्या पर्यावरण विषयक धोरणांबाबत सजग राहून लोकशाही मार्गाने आपली भुमिका मांडणेही गरजेचे आहे. पर्यावरण रक्षणासाठी कायदे प्रभावीपणे राबवले जात आहेत का, यावर लक्ष ठेवणे आणि आवश्यक तेथे आवाज उठवणे ही जबाबदार म्हणून युवकांची भूमिका आहे.

उपसंहारत: पर्यावरण संरक्षण ही केवळ शासनाची किंवा संस्थांची जबाबदारी नसून ती प्रत्येक नागरिकाची नैतिक जबाबदारी आहे. मात्र युवकांनी पुढाकार घेतला, तर ही चळवळ अधिक व्यापक आणि प्रभावी ठरु शकते. आजचा युवक जर पर्यावरण प्रेमी, जागरुक आणि कृतिशील झाला, तर उद्याची पृथ्वी सुरक्षित, स्वच्छ आणि समृद्ध राहील. म्हणूनच ''पर्यावरण वाचवा – भविष्य वाचवा'' हा संदेश कृतीत उतरवण्याची खरी जबाबदारी युवकांवरच आहे.

''युवक बदल घडवतो, पर्यावरण वाचवतो''

गाव

मातीचा सुंगध, वाऱ्याची झुळूक,
मनात रुजलेली आठवणींची फूलूक...

चुलीवरी धुर, आईचा गंध,
गाव म्हणजे प्रेमाचा बंध...

शेतातल्या पिकांत सोनं दडलं,
घामाच्या थेंबात सुख फुललं...

चांदण्यांनी सजलेलं आभाळगावाचं,
मन मात्र झुलतं त्या आठवणीत नवाचं...

- आर्यन संतोष मळेकर
11th Arts

डिजिटल पेमेंट प्रणाली व ई-बँकिंग

- जान्हवी सुर्यकांत भांबीड
...✍11 वी वाणिज्य अ

आजच्या आधुनिक युगात तंत्रज्ञानामुळे आर्थिक व्यवहार करण्याची पद्धत पूर्णपणे बदलती आहे. रोख रकमेऐवजी डिजिटल माध्यमातून व्यवहार करण्याची पद्धत म्हणजे डिजिटल पेमेंट प्रणाली. तसेच इंटरनेटच्या साहाय्याने बँकिंग सेवा घेण्याला ई-बँकिंग असे म्हणतात. या दोन्ही प्रणालींमुळे व्यवहार अधिक सोपे, सुरक्षित आणि जलद झाले आहेत.

डिजिटल पेमेंट प्रणालीमध्ये मोबाईल ॲप, इंटरनेट बँकिंग, डेबिट-क्रेडिट कार्ड, युपीआय (UPI), क्यूआर कोड, वॉलेट इत्यादी माध्यमांचा वापर केला जातो. आज भारतात डिजिटल व्यवहारांमध्ये मोठी वाढ झाली आहे. विशेषत: यूपीआयमुळे काही सेकंदात पैसे पाठवणे किंवा स्वीकारणे शक्य झाले आहे. दुकानदार, व्यापारी, विद्यार्थी, शेतकरी अशा सर्वच घटकांची डिजिटल पेमेंटचा स्वीकार केला आहे. त्यामुळे रोख पैशांवर अवलंबित्व कमी झाले आहे.

ई-बँकिंग ही बँकेची ऑनलाइन सेवा आहे. ग्राहक आपल्या मोबाईल किंवा संगणकावरुन खात्याची शिल्लक पाहू शकतो, पैसे ट्रान्सफर करु शकतो, वीजबिल, फोनबिल भरु शकतो. तसेच ऑनलाइन खरेदीसाठी पेमेंट करु शकतो. पूर्वी बँकेत जाऊन रांगेत उभे राहावे लागायचे; परंतु आता घरबसल्या सर्व व्यवहार शक्य झाले आहेत. त्यामुळे वेळ आणि श्रम दोन्हीची बचत होते.

डिजिटल पेमेंट आणि ई-बँकिंगचे अनेक फायदे आहेत. व्यवहार वेगवान आणि पारदर्शक होतात. प्रत्येक व्यवहाराची नोंद राहते. त्यामुळे आर्थिक शिस्त वाढते. भ्रष्टाचारावर आळा बसण्यास मदत होते. तसेच सरकारलाही आर्थिक व्यवहारांचे व्यवस्थापन सुलभ होते. कोविड-१९ कालात संपर्कविरहित व्यवहारासाठी डिजिटल पेमेंट खूप उपयुक्त ठरले.

तथापि, काही आव्हानेही आहेत. सायबर गुन्हे, फसवणूक, डेटा चोरी यांसारख्या समस्या उद्‌भवू शकतात. त्यामुळे मजबूत पासवर्ड वापरणे, ओटीपी कोणालाही न सांगणे आणि सुरक्षित ॲप्सचाच वापर करणे आवश्यक आहे. डिजिटल साक्षरता वाढविणे ही काळाची गरज आहे.

एकूणच, डिजिटल पेमेंट प्रणाली आणि ई-बँकिंग ही आधुनिक भारताच्या प्रगतीची महत्त्वाची पायरी आहे. तंत्रज्ञानाचा योग्य आणि सुरक्षित वापर केल्यास ही प्रणाली देशाच्या आर्थिक विकासाला मोठी चालना देईल.

*****

मेहनतीची जादू

स्वप्न डोळ्यात घेऊन चालते मी,
रस्ता कठीण असला तरी थांबत नाही कधी ।
घामाच्या प्रत्येक थेंबात दडलेली असते शक्ती.
मेहनतीनेच बदलते आयुष्याची दिशा नक्की ।

अपयश आले तरी न घाबरते मन,
कारण प्रयत्नांतच दडलेले असते यशाचे धन ।
रात्री जागून, दिवस भर मेहनत,
हळूहळू मिळते यशाची चाहूल हलकीच गुपचूप ।

काट्यांनी भरलेला असतो प्रवास,
पण धैर्य ठेवले तर मिळतो सुवास ।
मेहनत कधीच वाया जात नाही,
तीच आपल्या भविष्याची खरी कमाई ।
जिद्द, शिस्त आणि आत्मविश्वास,
यांनीच घडतो आयुष्याचा सुवर्ण प्रवास ।
आजचा संघर्ष, उदयाचा अभिमान,
मेहनतीनेच पूर्ण होतात सगळे स्वप्न महान ।

- Bhakti Rajivale
11th Com. A

महिला बचत गट

- सायली सुनिल भुवड
...✍ 11th Com. A

डॉ. मोहम्मद युनूस यांनी बांगला देशात गटांचे बीज रोवले. त्यांनी जाबेरा या गावात गरीबांच्या बचतीतून ग्रामीण बँकेचा प्रकल्प सुरु केला. ग्रामीण बँकेकडे बांगला देशात आज 90% महिला सदस्य आहेत व 90 % शेअर्स महिलांच्या बालकीचे आहेत. बांगला देशातील गरीबी दूर करण्यासाठी व कुटुंबे आत्मनिर्भर राहण्यासाठी डॉ. युनूस यांनी बचत गट हे माध्यम लोकांच्या हाता सोपविले आहे. याच धर्तीवर भारतामध्ये 1990 च्या दशकात नाबार्ड, राज्य सरकार आणि केंद्र सरकार यांच्या संयुक्त विद्यमाने ग्रामविकासाच्या योजना राबविल्या जात आहेत. समान प्रश्न सारखे आचार विचार, समान मते असणारी स्त्री किंवा पुरुष एकत्र येतात व नियमित बचतीच्या माध्यमातून आपल्या छोट्या मोठ्या आर्थिक गरजा भागवून आपला सर्वांगीण विकास साधतात. त्यास स्वयंसहाय्यता समूह अथवा स्वयंसहाय्यता गट म्हणतात. नियमितपणे केलेल्या अल्पबचतीतून आर्थिक साहाय्य करण्यासाठी भांडवल उभे करण्यासाठी संघटन शक्ती वाढविण्यासाठी परस्परांच्या सहकार्याने सभासदाच्या नेतृत्वाने तयार झालेला गट अशीच बचत गटाची संकल्पना आहे.

गावपातळीवर समविचारांचे, समवयस्कर, सेवाभावीवृत्तीचे सुमारे 15-20 व्यक्ती समान ध्येयाने प्रेरीत होऊन स्वयंसहाय्यता बचतगटाच्या माध्यमातून आर्थिक बचत करण्यासाठी एकत्र येणे गरजेचे आहे. महिलांची काटकसर वृत्ती, व्यवहारातील पारदर्शकता तसेच संघटन कौशल्यामुळे स्वयंसहाय्यता बचत गटाच्या सदस्य अधिक प्रमाणात महिला आहेत. बचत गटामुळे गावातच रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत. महिला सक्षमीकरणात बचत गटाचा मोठा वाटा आहे. बचत गटाच्या माध्यमातून महिलांना आर्थिक स्वावलंबनाच्या वरटेवरुन जाण्यास साहाय्य झाले आहे, व त्यांना आत्मसन्मान मिळवून दिला आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांचा वाढता सहभाग हे ही बचत गटाचे एक यश आहे. ग्रामसभांचे महिलांचा सहभाग वाढला आहे. गावातील पाणीपुरवठ्यासंबंधी निर्णयही महिला बचतगटाच्या माध्यमातून घेत आहेत. तंटामुक्ती गाव मोहिमेअंतर्गत अनेक गावातून बचतगटांचा सकारात्मक दबाव गट दिसून येत आहे. बचत गटामुळे महिलांमध्ये सहकाराची भावना वाढीस लागली असून काही बचतगट समुपदेशनाचे कार्यही करीत आहेत. जिजाऊ, सिंधू, सावित्री अशा विविधनावाने ब्रँडिंग केलं जात आहे. दरवर्षी राज्य आणि केंद्र शासनातर्फे विविध विभागाच्या सरस प्रदर्शनामध्ये वस्तूंची विक्री केली जाते. अनेक ठिकाणी सरकारी कार्यालयाच्या आवारातील स्टॉल किंवा स्टेशनरी दुकान बचत गटातील महिला चालवतात. शालेय पोषण आहाराचे काम महिला बचत गटाकडे दिले गेले आहे. जिल्हा परिषदेच्या शाळामधील गणवेशांची शिलाई बचतगटामधील महिलांकडून करुन घेतली जात आहे.

महाराष्ट्रात अडीच लाखापेक्षा अधिक बचतगट असून, त्याद्वारे 36 लाख महिला संघटीत झाल्या आहेत. कोकण विभागातील बचत गटासाठी आयोजित कोकण सरस प्रदर्शनातून बचत गटातील महिलांना वस्तू विक्रीसाठी व्यासपीठ मिळाले आहे. बचत गटातील वस्तूंच्या उत्पादनाला गावापासून मॉलपर्यंत बाजारपेठ उपलब्ध झाली आहे.

एकंदरीत बचतगट हे महिलांच्या आर्थिक, सामाजिक व राजकीय वाढीस साहाय्यकच ठरत आहेत. महिला आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी व एकत्रित होतील तेव्हाच त्या सर्व क्षेत्रात आत्मविश्वासाने वावरु शकतील खऱ्या अर्थाने त्यांचे सबलीकरण होर्सल. सामाजिक स्वास्थ्यासाठी दबावगट निर्माण करण्यासाठी महिलांना या बचतगटाचा अस्त्रासरखा वापर नक्कीच करता येईल. बचतगटामुळे व्यवसाय स्थापन करण्यासाठी कमी व्याजदरात भांडवल उपलब्ध होते.

****

विकसित भारत

- रिया प्रकाश राजपुरे
11th Com. A

विकसित भारताचे स्वप्न हे प्रत्येक भारतीयासाठी प्रेरणा देणारे आहे. भारत हा प्राचीन काळापासून ज्ञान, विज्ञान, संस्कृती आणि समृद्धतेची केंद्रबिंदू होता. आज जागतिक पातळीवर प्रगत राष्ट्रांमध्ये भारताचे नाव अग्रस्थानी असावे असे प्रत्येक भारतीयाला वाटतो. मात्र, हे स्वप्न पूर्ण करण्यासाठी आपल्याला अनेक आव्हाने पार करावी लागतील. विकसित भारत म्हणजे केवळ आर्थिक प्रगती नव्हे, तर सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक आणि तांत्रिक प्रगतीचे एकत्रित चित्र आहे. माझ्या दृष्टिकोनातून विकसित भारत साकारण्यासाठी प्रत्येक नागरिक, सरकार आणि विविध क्षेत्रातील घटकांनी एकत्रित प्रत्येकांनी प्रयत्न केले पाहिजेत.

शिक्षण हे कोणत्याही राष्ट्राच्या प्रगतीसाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. विकसित भारत घडवण्यासाठी गुणवत्तापूर्ण शिक्षण सर्वांसाठी उपलब्ध असायला हवे. ग्रामीण भागांतील शाळांना सुधारित करणे, डिजिटल शिक्षणाचा प्रसार आणि मुलींच्या शिक्षणाला प्रोत्साहन देणे ही प्राथमिकता असायला हवी. आज भारताला केवळ साक्षरता नव्हे, तर नवोन्मेषी संशोधन आणि तंत्रज्ञानाच्या दिशेने वाटचाल करणारे शिक्षण आवश्यक आहे. तसेच भारताचे विज्ञान, अभियांत्रिकी आणि वैद्यकीय क्षेत्रातील संशोधनाला चालना दिल्यास जागतिक स्तरावर स्पर्धात्मक भूमिका बजावताना येईल.

महिला सशक्तीकरणाशिवाय विकसित भारताची कल्पना अपूर्ण आहे. महिलांना समान हक्क संधी आणि सुरक्षा उपलब्ध करुन देणे हे अत्यावश्यक आहे. आज महिलांनी शिक्षण, उद्योग, कला आणि राजकरणात या प्रत्येक क्षेत्रात आपली ओळख निर्माण केली आहे. ग्रामीण आणि शहरी भागांतील महिलांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनवण्यासाठी विविध उपक्रम राबवले पाहीजेत.

भारतीय लोकसंख्येचा मोठा भाग ग्रामीण भागात राहतो. त्यामुळे विकवित भारतासाठी ग्रामीण विकासाला प्राधान्य द्यावे लागेल. आधुनिक शेती तंत्रज्ञानाचा वापर, जलसिंचन प्रकल्पांचा विस्तार आणि शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनांसाठी योग्य बाजारपेठ उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. ग्रामपंचायतीचे सक्षमीकरण रस्ते, वीज आणि पाण्यासारख्या मूलभूत सुविधांचा विस्तार केला तर ग्रामीण भाग प्रगतीच्या प्रवाहात येईल. तंत्रज्ञान आणि उद्योगक्षेत्राच्या विकास हा विकसित भारताचा मुख्य आधार आहे. मेक इन इंडिया सारख्या योजनांमुळे भारताने स्वदेशी उत्पादनांना चालना दिली आहे. डिजिटल तंत्रज्ञानाचा उपयोग करुन विविध क्षेत्रांमध्ये रोजगाराच्या संधी निर्माण करता येतील. स्टार्टअप संस्कृतीला प्रोत्साहन देऊन तंत्रज्ञानाच्या माध्यमातून नव्या पिढीला जागतिक स्तरावर स्पर्धा करण्यासाठी सक्षम करता येईल.

विकास करताना पर्यावरणाचे संरक्षण करणे तितकेच महत्वाचे आहे. जलसंपत्ती, वायूप्रदुषण आणि वनसंपत्ती यांचे योग्य व्यवस्थापन केले तर शाश्वत विकास साधता येईल. स्वच्छ उर्जा स्त्रोतांचा वापर, वृक्षारोपण आणि कचऱ्याचे पुनर्वापर तंत्रज्ञान या गोष्टीवर भर दिला पाहिजे. पर्यावरणास अनुकूल धोरणे राबवून आपण भविष्यातील पिढ्यांसाठी एक सदृढ आणि प्रदुषणमुक्त भारत निर्माण करु शकतो. डिजिटल इंडिया हा विकसित भारताचा पाया ठरु शकतो. ई-गव्हर्नन्स, ई-शिक्षण आणि ई-आरोग्य यांसारख्या सुविधा लोकांच्या आयुष्यात बदल घडवू शकतात. ग्रामीण आणि दुर्गम भागांतील लोकांना इंटरनेटद्वारे जागतिक पातळीवरील संधी मिळवून

देता येतील.

डिजिटल सेवांच्या प्रसारामुळे उद्योग, व्यापार आणि शिक्षण क्षेत्रात मोठा क्रांतिकारी बदल घडवता येईल. सामाजिक समता आणि न्याय ही विकसित भारताची महत्त्वाची वैशिष्ट्ये आहेत. जातीयवाद, धार्मिक विद्वेष आणि लिंगभेद यांचा नायनाट करुन सामाजिक एकात्मतेसाठी काम केले पाहिजे. प्रत्येक व्यक्तीला समान संधी मिळाली पाहिजे. शिक्षण, रोजगार आणि आरोग्य या मूलभूत गरजा प्रत्येकाला उपलब्ध असायला हव्यात.

विकसित भारताचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी प्रत्येक नागरिकांची भूमिका महत्त्वाची आहे. देशाचा विकास केवळ सरकारच्या धोरणांवर अवलंबून नसतो; नागरिकांची समजूतदार जबाबदारी त्यात महत्त्वाची भूमिका बजावते. करपद्धतीचे पालन, स्वच्छता मोहिमांमध्ये सहभाग आणि स्थानिक उत्पादनांचा वापर या गोष्टींमुळे नागरिकांचा विकासात सहभाग वाढेल. विकसित भारतासाठी प्रत्येक नागरीकाचे आरोग्य महत्त्वाचे आहे. भारतात अजूनही अनेक ठिकाणी वैद्यकीय सेवा पोहोचत नाहीत. ग्रामीण भागात प्राथमिक आरोग्य केंद्र अधिक सक्षम करणे, नवीन तंत्रज्ञानांचा वापर करणे आणि आरोग्य सेवांसाठी जास्त निधी देणे हे सरकारचे मुख्य उद्दिष्ट असावे. तसेच सर्वसामान्यांसाठी मोफत औषधोपचार आणि आरोग्य शिक्षण उपलब्ध करुन दिली पाहिजे.

भारताला विकसित होण्यासाठी आर्थिक स्थैर्य आवश्यक आहे. आत्मनिर्भर भारताच्या मोहिमेअंतर्गत स्थानिक उत्पादनांना प्रोत्साहन देऊन जागतिक बाजारात स्पर्धा करण्याची क्षमता निर्माण केली पाहिजे. शेती, उद्योग आणि सेवा क्षेत्र यांचे करण्याची क्षमता संतुलित विकसन हा देशाच्या आर्थिक प्रगतीचा कणा असावा. महिला आणि तरुणांच्या रोजगारासाठी विशेष योजना राबवल्या पाहिजेत.

विकसित भारतासाठी प्रत्येक नागरिकाची भूमिका महत्त्वाची आहे. शिक्षण, आरोग्य, अर्थव्यवस्था, तंत्रज्ञान, सामाजिक न्याय आणि पर्यावरण संरक्षण यांसारख्या विविध क्षेत्रांत सुधारणा करुनच आपण खऱ्या अर्थाने भारताला विकसित करु शकतो. भारताच्या उज्ज्वल भविष्यासाठी संपूर्ण समाजाने एकत्र येऊन प्रामाणिक प्रयत्न गरजेचे आहे. विकसित भारताचा माझा दृष्टिकोन हा समतोल विकासाचा आणि टिकाऊ भविष्याचा आहे.

****



ग्राहक हाच राजा

- वैष्णवी अजितकुमार जांभळे
11th Com. A

सरकारी सेवेत, बँकेत, पोस्टात, हॉस्पिटलात, नगरपालिकांत, नगरपरिषदांत, खाजगी कंपन्यात अन्यत्र सर्व नोकरीत असणाऱ्या कर्मचाऱ्यांनी हे लक्षात ठेवावयास पाहिजे की, ग्राहक आहेत म्हणून आपण आहेत. ग्राहक आहेत म्हणून आपल्याला पगार मिळतो. आपले व आपल्या कुटुंबाचे पोट भरते त्यामुळे प्रत्येक कर्मचाऱ्याची 'ग्राहक देवो भव' ही मानसिकता हवी.

ग्राहक हा राजा आहे किंवा ग्राहकाला उत्कृष्ट ग्राहक सेवा देणे हे आवश्यक आहे याचा भारतात पूर्वी अभाव होता. आता यात जरा बदल झाला असला तरी शंभर टक्के बदल झालेला नाही. संसदेने ग्राहकांच्या संरक्षणासाठी १९८६ साली दि कन्झ्युमर प्रोटेक्शन कायदा संमत केला. २०१९ मध्ये या कायद्यातील काही त्रुटी दूर करुन काही बदल करण्यात आले. दि कन्झ्युमर प्रोटेक्शन कायदा १९८६ नुसार १९८८ मध्ये दि नॅशनल कन्झ्युमर डिस्प्युट्स रिड्रेसल कमिशन हे 'क्वाझी ज्युडिशियल कमिशन' स्थापन करण्यात आले. या कमिशनचे मुख्यालय नवी दिल्ली येथे आहे. सर्वोच्च न्यायालयाचा सेवानिवृत्त जज या कमिशनच्या प्रमुख पदी नेमला जातो. सध्या सर्वोच्च न्यायालयाचे माजी जज आर. के. आगरवाल या पदावर आहेत. ग्राहकांच्या वाद झालेल्या तक्रारींचे निराकरण करणे हे या कमिशनच्या अधिकारात येते.

ग्राहक न्यायालय ग्राहकांच्या तक्रारींसाठी भारतात हे खास न्यायालय आहे. या न्यायालयात फक्त ग्राहक तक्रारीसंबंधीचेच कामकाज चालते. ग्राहकांचे अधिकार जपण्यासाठी शासनाने हे न्यायालय अस्तित्वात आणले आहे. विक्रेते ठरलेल्या कराराला बांधील राहतात की नाही ? पारदर्शक व्यवहार करतात की नाहीत याबाबतची दक्षता हे न्यायलय घेते. ग्राहकाला जर विक्रेत्याने फसवले असेल किंवा लुबाडले असेल तर असा ग्राहक या न्यायालयात दाद मागू शकतो. जर ग्राहकाने फसवणुकीचे, लुबाडण्याचे पुरावे दिले, माल खरेदी केल्याची बिलं दिली व जर न्यायालयाची खात्री पटली की ग्राहकाची तक्रार योग्य आहे हे न्यायालय ग्राहकाच्या बाजूने निर्णय देऊ शकते. पण ग्राहक पुरेसे व योग्य पुरावे देऊ शकला नाही तर न्यायालयास ग्राहकाच्या बाजूने निकाल देणे अडचणीचे होऊ शकते. ग्राहक न्यायालयाने ग्राहकांना दिलेले अधिकार पुढीलप्रमाणे –

१) सुरक्षिततेचा अधिकार –
ग्राहकाला जीवन हानी पोहोचणारी सेवा किंवा वस्तू विकता कामा नये.

२) माहितीचा अधिकार –
ग्राहकाला उत्पादनाची व सेवेची संपूर्ण माहिती दिली गेली पाहिजे. हे उत्पादन कसे कार्यरत होते व याचा दर्जा काय ? याबाबतची माहितीही दिली गेली पाहिजे.

३) निवडीचा अधिकार –
ग्राहकाला कोणते उत्पादन निवडायचे, कोणते उत्पादन विकत घ्यायचे याचा पूर्ण अधिकार असला पाहिजे.

४) कायद्याची प्रक्रिया जाणून घेण्याचा अधिकार –
ग्राहकांच्या हिताच्या ज्या निर्णय घेण्याच्या प्रक्रिया असतील त्या जाणून घेण्याचा अधिकार ग्राहकाला हवा.

५) तक्रार निवारण्याचा अधिकार –
ज्या ज्या वेळेला ग्राहकाला अधिकारावर बाधा येते तेव्हा तेव्हा त्याला नुकसान भरपाई मिळण्याचा अधिकार.

६) ग्राहक शिक्षणाचा अधिकार –
ग्राहक शिक्षणानुसार वंचित राहता कामा नये.

महात्मा गांधी म्हणायचे की ग्राहक हा देव आहे. आपल्या देशानी जसे गांधीजींचे इतर विचार सोडले तसा 'ग्राहक हा देव' हा विचार देखील सोडावा. कोणत्याही कंपनीने तुम्हाला विकलेल्या उत्पादनात दोष असेल किंवा त्या कंपनीची सेवा दर्जेदार नसेल तर असा ग्राहक ग्राहक न्यायालयात/ फोरमध्ये यासाठी तक्रार नोंदवू शकता. ऑनलाईन लिगल इंडियावर तक्रार दाखल केल्यास तुम्हास खर्च कमी येतो व तुम्हाला तुमच्या दाव्याचा निकाल लागेपर्यंत ऑनलाईन लिगल इंडियाकडून पाठिंबा मिळतो. ग्राहक जी वस्तू/ उत्पादन विकत

घेऊ इच्छितआहे त्याच इतर कंपन्यांच्या वस्तू/उत्पादनांबाबत माहिती असणे हा ग्राहकाचा अधिकार आहे. ग्राहकावर झालेला अन्याय दूर होणे हे देखील ग्राहकाच्या अधिकारात येते. जर विक्रेत्याने खोटी जाहिरात देऊन ग्राहकाची फसवणूक केली तर २०१९ च्या कायद्याने त्याला लाख १० रुपयांपर्यंतचा दंड व दोन वर्षांचा तुरुंगवास या शिक्षा होऊ शकतात. गुन्हा परत केल्यास ५० लाख रुपये दंड व ५ वर्षांचा तुरुंगवास या शिक्षा होऊ शकतात.

विकत घेतलेले उत्पादन सदोष असेल, उत्पादन प्रक्रियेतील चुकीमुळे उत्पादन योग्य तयार झालेले नसेल याचे दायित्व उत्पादक किंवा विक्रेत्याकडे होऊ शकते. जर एखाद्या ग्राहकाला त्याच्या तक्रारीबाबत राष्ट्रीय आयोगाने दिलेला निर्णय पटला नाही व तो अयोग्य वाटला तर असा ग्राहक राष्ट्रीय आयोगाने दिलेल्या तारखेपासून तीन दिवसांच्या आत सर्वोच्च न्यायालयात दाद मागू शकतो. पण विवादात फार मोठी रक्कम असेल तरच सर्वोच्च न्यायालयाचे दरवाजे ठोठवावे, कारण सर्वोच्च न्यायालयात लढा देणे ही फार खर्चिक बाब ठरु शकते. ग्राहकाने प्रथम उत्पादक कंपनीकडे नुकसान भरपाईसाठी दावा करावा लागतो. उत्पादक कंपनीने जर समाधान केले नाही किंवा दाव्याकडे दुर्लक्ष केले तरच सरकारने निर्माण केलेल्या यंत्रणांकडे यावे.

२०१९ च्या कायद्यात खालील यंत्रणांविरुद्ध निकृष्ट ग्राहक सेवेबद्दल तक्रार करता येते असे नमूद केलेले आहे. ते व्यवसाय – प्रवासी विमान वाहतुक कंपन्या, आयुर्वेदिक व जडीबुटीची औषधे उत्पादक कंपन्या, व्यवाय व वित्त, वाहन, सुटे भाग, कपडे, पादत्राणे, इतर शरीरावर धारण केल्या जाणाऱ्या वस्तू, संगणक व त्यासंबंधीचे व्यवसाय, ई कॉमर्स, शिक्षण, इलेक्ट्रॉनिक्स व उपकरणे, करमणूक, कुटुंब व नातलग, वित्त, अन्न, सरकारी यंत्रणा, हॉटेल, हॉस्पीटल व वैद्यकीय सेवा, गृह सजावट, हॉटेल व उद्योग, इंटरनेट सेवा, ज्वेलरी व घड्याळे, नोकरी व करिअर, पाळीव प्राणी, हॉटेल व बार, सोसायटी व संस्कृती, अनाधिकृत शुल्क, लग्नसोहळ्यासाठी घेतलेल्या सेवा व इतर. देशात प्रचंड मंदी आहे. देश आर्थिक मरगळीत आहे. या वातावरणात तुम्ही जर ग्राहकाला नाखुश केले तर तुमच्या कंपनीला टाळेही लागू शकेल. सध्या नोकऱ्या नाहीत. बेरोजगारीचे प्रमाण प्रचंड आहे. ज्यांना नोकऱ्या आहेत त्यांना त्या टिकवण्यासाठी दर्जेदार प्रमाण प्रचंड आहे. ज्यांना नोकऱ्या आहेत त्यांना त्या टिकवण्यासाठी दर्जेदार ग्राहक सेवा द्याव्या लागेल.



मानवी हस्तक्षेप आणि निसर्गाचा कोप

- आर्यन संतोष मळेकर
इयत्ता 11th Arts

मानवी हस्तक्षेपाचा निसर्गावर पडणारा परिणाम एक अत्यंत महत्त्वाचा आणि चिंताजनक मुद्दा बनला आहे. विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे माणसाने निसर्गाच्या सिमांमध्ये अनवधानाने आणि अनेकदा नोंद न घेता प्रवेश केला आहे. या हस्तक्षेपामुळे पर्यावरणातील असंतुलन वाढले आहे आणि निसर्गाने आपला कोप दाखवायला सुरुवात केली आहे.

*** मानवी हस्तक्षेपाचा निसर्गावर परिणाम ***

मानवी क्रियांमुळे निसर्गाच्या विविध घटकांवर गंभीर परिणाम झाले आहेत. या परिणांमांचे काही मुख्य कारणे आणि उदाहरणे पुढील प्रमाणे आहेत.

- वनीकरण आणि जंगलतोड : माणसाने आपल्या वाढत्या गरजांसाठी जंगलांचे अतिक्रमण केले. जंगलांचे तोड, वृक्षारोपणाची कमी, वनप्राण्यांच्या अधिवासाचा नाश या सर्वांमुळे जैवविविधता घटली आहे. मोठ्या प्रमाणावर जंगलांच्या तोडामुळे हवामान बदल, मातीचे क्षरण आणि जलवायु संकट निर्माण झाले आहेत. उदा. : ब्राझीलमधील अमेजॉन जंगलाचे संकोचन हे पृथ्वीवरील कार्बन साठवण क्षमतेवर परिणाम करत आहे.

- औद्योगिकीकरण : औद्योगिकीकरणामुळे हवामान बदल घडले आहेत. कार्बन डाय ऑक्साइड आणि इतर ग्रीन हाऊस गॅसांच्या उत्सर्जनाने पृथ्वीच्या वातावरणाचा तापमान वाढला आहे, जो ग्लोबल वॉर्मिंगचे कारण ठरतो. औद्योगिकीकरणामुळे जलवायू बदल, वाऱ्याचे बदलते प्रवाह, तसेच भूकंप व समुद्र पातळीची वाढ यांसारखे दुष्परिणाम दिसून आले आहेत.
- जलप्रदूषण : मानवी हस्तक्षेपामुळे पाणी प्रदूषणाचे प्रमाण घपाट्याने वाढले आहे. रासायनिक पदार्थ, प्लास्टिक आणि इतर प्रदूषकामुळे नद्या, तलाव आणि समुद्र प्रदूषित होत आहेत. यामुळे नद्या आणि समुद्रांमध्ये रहिवास करणारे जीव धोक्यात आहेत. आणि मानवाच्या पिण्याच्या स्त्रोतांवरही परिणाम होत आहे.
- वातावरणातील असंतुलन : शहरीकरणामुळे मोठ्या प्रमाणावर हवेचा प्रदूषण आणि आवाज प्रदूषण वाढले आहे. या प्रदूषणामुळे मानवासोबतच वनजीव देखील प्रभावित होतात. जसे की, ध्वनी प्रदूषणामुळे प्राणी त्यांचा नैसर्गिक अधिवास सोडून स्थलांतर करतात.
- प्लास्टिक प्रदूषण : प्लास्टिकच्या वाढत्या वापराने निसर्गावर अत्यंत वाईट परिणाम झाले आहेत.प्लास्टिक अत्यंत दीर्घकालीन अवयव आहे, ज्यामुळे ते निसर्गात सडत नाही. समुद्र आणि जमिनीत प्लास्टिकचा अडथळा निर्माण होतो. जो वनप्राणी आणि माणसांसाठी एक मोठा धोका ठरतो.

* निसर्गाचा कोप *

मानवी हस्तक्षेपामुळे निसर्गाने आपल्या कोपाचे संकेत द्यायला सुरुवात केली आहे हे कोप काही प्रकारे दिसून येतात.

- हवामान बदल : जागतिक तापमानाच्या वाढीमुळे गडगडणाऱ्या हिमनद्या, वाढती समुद्र कातळी, अनियमित पाऊस आणि धुंदी येणारे वादळ यांसारख्या घटनांचे प्रमाण वाढले आहे. उदा. : २०२० मध्ये ऑस्ट्रेलियातील भयंकर जंगलांची आग ही हवामान बदलाचे एक उदाहरण होते.
- प्राकृतिक आपत्ती : अनेकदा, भूकंप, सुनामी, महापूर आणि दुष्काळ यांसारख्या आपत्ती निसर्गाच्या कोपाच्या उदाहरणे मानली जातात. हे आपत्ती वाढलेले मानवी हस्तक्षेप आणि पर्यावरणीय असंतुलनाचे परिणाम आहेत.
- वनस्पती आणि प्राणी यांची विलुप्तता : मानवाच्या कार्यामुळे अनेक प्रजाती विलुप्त होऊ लागल्या आहेत. एकूणच जैवविविधतेला धोका निर्माण झाला आहे. उदा. : गोड्या पाण्याच्या प्रजातींचा हानीकारक परिणाम आणि अंटार्क्टिक प्रदेशातील विविध वनजीवांचा संकट, हे प्रदर्शित करते की मानवी हस्तक्षेपामुळे निसर्गाचा कोप होऊ शकतो.

* उपाय आणि संरक्षक पाऊले *

मानवांनी आपल्या क्रियांवर विचार केला पाहिजे आणि निसर्गाच्या रक्षणासाठी कठोर पाऊले उचलली पाहिजेत. काही उपाय पुढीलप्रमाणे आहेत.

- नवीन तंत्रज्ञानाचा वापर : पर्यावरणाच्या रक्षणासाठी क्लीन ग्रीन तंत्रज्ञानाचा वापर करणे आवश्यक आहे. सौरऊर्जा, वाऱ्याची ऊर्जा आणि जलऊर्जा हे पर्यावरण मित्र तंत्रज्ञान वापरणे उपयुक्त ठरु शकते.
- जंगलांचे संरक्षण : वृक्षारोपणाला प्रोत्साहन देणे, जंगलांचे संवर्धन करणे, आणि वन प्राण्यांच्या अधिवासांचे संरक्षण करणे आवश्यक आहे.
- शाश्वत शहरीकरण : शहरीकरणाच्या प्रक्रियेत निसर्गाला जास्त नुकसान होणार नाही याची काळजी घेण आवश्यक आहे. स्मार्ट सिटी योजना आणि हरित शहरी विकासाचे महत्व वाढवले पाहिजे.
- जलवापसीचे उपाय : पाण्याची बचत उपयोग, जलस्त्रोतांचे व्यवस्थापन आणि पाण्याचे पुन:चक्रण यांसारख्या उपायांची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे.

मानवी हस्तक्षेपामुळे निसर्गावर होणारे परिणाम अत्यंत चिंताजनक आहेत. हे परिणाम केवळ पर्यावरणासाठीच नव्हे, तर मानवजातीसाठी देखील धोक्याचे ठरु शकतात. त्यामुळे प्रत्येक व्यक्तीला आणि समाजाला यावर विचार करणे आवश्यक आहे आणि निसर्गाचे रक्षण करण्यासाठीठोस पाऊल उचलणे गरजेचे आहे.

*****

ग्राहक हाच राजा

- जान्हवी सुर्यकांत भांबीड
11 वी वाणिज्य अ

''ग्राहक हाच राजा'' ही म्हण आजच्या आधुनिक बाजार व्यवस्थेत अत्यंत अर्थपूर्ण ठरते. कोणत्याही व्यवसायाचे अस्तित्व ग्राहकांवर अवलंबून असते. ग्राहक नसतील तर उत्पादन सेवा आणि उद्योग यांना काहीच अर्थ ठरत नाही. त्यामुळे प्रत्येक व्यापारी आणि उद्योजकासाठी ग्राहकांचे समाधान हेच सर्वात महत्वाचे ध्येय असते.

पूर्वीच्या काळात ग्राहकांना मर्यादित पर्याय उपलब्ध होते. परंतु आज जागतिकीकरण आणि तंत्रज्ञानामुळे बाजारपेठ अत्यंत स्पर्धात्मक झाली आहे. एका वस्तूसाठी अनेक पर्याय उपलब्ध आहेत. ग्राहक आपल्या गरजेनुसार, गुणवत्तेनुसार आणि किंमतीनुसार वस्तू निवडू शकतो. त्यामुळे उत्पादकांना दर्जेदार वस्तू व सेवा पुरवणे भाग पडते. अन्यथा ग्राहक दुसऱ्या पर्यायाकडे कळतो.

ग्राहकांचे हक्कही कायद्याने संरक्षित केले आहेत. भारतात राष्ट्रीय ग्राहक विवाद निवारण आयोग (National Consumer Disputes Redressal Commission) तसेच राज्य व जिल्हा स्तरावरील ग्राहक मंच ग्राहकांच्या तक्रारी ऐकून त्यांना न्याय देतात. ग्राहक संरक्षण अधिनियम २०१९ या कायद्यामुळे ग्राहकांना सुरक्षितता, माहितीचा अधिकार, निवडीचा अधिकार आणि तक्रार निवारणाचा अधिकार मिळाला आहे. त्यामुळे ग्राहक अधिक सजग व जागरुक झाला आहे.

आजच्या डिजिटल युगात ग्राहक ऑनलाइन खरेदी करतो, सेवा रेटिंग देतो आणि अभिप्राय लिहितो. सोशल मीडियावर दिलेला नकारात्मक प्रतिसाद एखाद्या कंपनीच्या प्रतिमेला धक्का देऊ शकतो. त्यामुळे कंपन्या ग्राहक सेवा सुधारण्यावर भर देतात. सवलती, ऑफर्स, हमी, परतावा धोरण या सर्व गोष्टी ग्राहकाला आकर्षित करण्यासाठीच असतात.

तथापि, ग्राहकांनीही जबाबदारीने वागणे आवश्यक आहे. वस्तू खरेदी करताना बिल घ्यावे, उत्पादनाची माहिती वाचावी, कालबाह्य वस्तू टाळाव्यात आणि फसवणूक झाल्यावर तक्रार करावी. जागरुक ग्राहकच खऱ्या अर्थाने ''राजा'' ठरतो. अज्ञानामुळे अनेकदा ग्राहकांची फसवणूक होते, म्हणून ग्राहक शिक्षण अत्यंत गरजेचे आहे.

एकूणच, ग्राहक हा बाजारपेठेचा केंद्र बिंदू आहे. त्याच्या गरजा अपेक्षा आणि समाधान यांवरच उद्योगधंद्यांचे यश अवलंबून असते. म्हणूनच ''ग्राहक हाच राजा'' ही म्हण केवळ वाक्य नाही, तर आधुनिक अर्थव्यवस्थेचा मूलमंत्र आहे. ग्राहक जागरुक आणि जबाबदार राहिला, तर बाजारपेठ अधिक पारदर्शक, न्याय्य आणि प्रगत होईल.

खरा गुरु

शब्दांचे रोप लावणारा,
ज्ञानाचा दीप पेटवणारा,
शिकवतो तो जगणं खरं,
तोच आहे खरा गुरु...!

चूक झाली तरी न रागावणारा,
मार्ग दाखवून प्रेमाने समजावणारा,
हातात घेतो उजेडाचा दिवा,
अंधारातून काढतो वाट नवा...

फक्त पुस्तक शिकवत नाही,
तर शिकवतो माणूसकी ही,
शब्दांचे देतो गंधदार फुल,
शिक्षक म्हणजेच जीवनाचं मुळ...

- आर्यन संतोष मळेकर
11th Arts

कृत्रिम बुद्धिमत्ता (AI)

- सार्थक महेंद्र पिंपळकर
11 वी कॉर्मस (A)

कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजे संगणक, यंत्रे किंवा सॉफ्टवेअर यांना माणसासारखी विचार करण्याची, शिकण्याची, निर्णय घेण्याची आणि समस्या सोडवण्याची क्षमता देण्याचा तंत्रज्ञान प्रणाली होय. इंग्रजीत याला AI असे म्हणतात. आजच्या डिजिटल युगात AI ही केवळ एक संकल्पना नसून ती डिजीटल युगात AI ही आपल्या दैनंदिन जीवनाचा महत्त्वाचा भाग बनली आहे. मोबाईल व्हॉइस असिस्टंट, सोशल मीडीयावरील रेकमेंडेशन ऑनलाईन खरेदीचे सुचवलेले पर्याय, बँकिंगमधील फसवणूक शोध प्रणाली, तसेच आरोग्य क्षेत्रातील निदान यामध्ये AI चा मोड्या प्रमाणात वापर होत आहे.

AI ची संकल्पना आणि इतिहास कृत्रिम बुद्धिमत्तेची 1950 च्या दशकात पुढे आली. ब्रिटीश शास्त्रज्ञ Alan Turing यांनी ''मशीन विचार करु शकते का ?'' हा प्रश्न उपस्थित केला. त्यानंतर 1956 साली अमेरीकेतील Dartmouth College येथे झालेल्या परीषदेत "Artificial Intdligence" हा शब्द प्रथम वापरला जातो. सुरुवातीच्या काळात AI वर मर्यादीत संशोधन झाले, परंतु संगणकाची क्षमता वाढत गेली तसा AI चा विकास वेगाने होऊ लागला.

आज AI मध्ये मशीन लर्निंग (Machine Learning), डीप लर्निंग (Deep Learning), नैसर्गिक भाषा प्रक्रिया (Natural Language Processing), रोबोटीक्स आणि संगणक दृष्टी (Computer ision) अशा शाखांचा समावेश होतो.

AI कसे कार्य करते ?

AI प्रणाली मोठ्या प्रमाणातील डेटा गोळा करुन त्यावर आधारित नमुने (Patterns) ओळखले आणि त्यानुसार निर्णय घेते. उदाहरणार्थ, मशीन लर्निंग अल्मोरिदम डेटा मधील ट्रेड ओळखून भविष्यातील अंदाज लावतात. डीप लर्निंग न्युरल नेटवर्क्सचा वापर केला जातो, जे मानवी मेंदूप्रमाणे कार्य करतात.

उदाहरणार्थ –

मोबाईल अनलॉक प्रणाली तुमचा चेहरा ओळखते. युट्युब किंवा इन्स्टाग्राम तुमच्या आवडीप्रमाणे व्हिडीओ सुचवते. गुगल मॅप्स ट्रॅफिकनुसार योग्य मार्ग दाखवते. हे सर्व AI मुळे शक्य झाले आहे.

- AI चे प्रकार
- AI चे मुख्यत: तीन प्रकार मानले जातात.
  1) नॅरो AI (Weak AI) – विशिष्ट कामासाठी तयार केलेली AI. उदा. व्हॉइस असिस्टंट, चॅटबॉट्स.
  2) जनरल AI (Strong AI) – माणसासारखी सर्वसाधारण बुद्धीमत्ता असलेली AI (अजून पूर्णपणे विकसित नाही)
  3) सुपर AI – माणसापेक्षा अधिक बुद्धिमत्ती AI (सध्या केवळ सैद्धांतिक संकल्पना)
- विविध क्षेत्रातील उपयोग –
  1) शिक्षण क्षेत्र – ऑनलाईन शिक्षण प्लॅटफॉर्म स्वयंचलित परीक्षा तपासणी विद्यार्थ्यांच्या प्रगतीचे विश्लेषण.
  2) आरोग्य क्षेत्र – रोगांचे निदान एक्स-रे व स्कॅन रिपोर्ट विश्लेषण रोबोटिक शस्त्रक्रिया.
  3) शेती क्षेत्र – हवामानाचा अंदाज, पिकांची गुणवत्ता तपासणी, ड्रोन द्वारे शेती व व्यवसाय ग्राहक सेवा चॅटबॉट डेटा विश्लेषण, स्वयंचलित यंत्र सामग्री.
  4) वाहतूक – स्वयंचलित गाड्या ट्रफिक नियंत्रण प्रणाली कृत्रिम बुद्धिमत्तेचे फायदे.
- भविष्यातील आव्हाने –

  AI चा वापर करताना नैतिकता, सुरक्षितता आणि कायदे यांचा योग्य विचार करणे गरजेचे आहे. भविष्यात AI मुळे अनेक नवीन नोकऱ्या निर्माण होतील, पण त्यासाठी कौशल्य विकास आवश्यक आहे.
- निष्कर्ष – कृत्रिम बुद्धिमत्ता ही मानवाच्या बुद्धिची निर्मिती असून ती आपल्या जीवनात अविभाज्य भाग बनत आहे. योग्य वापर केल्यास AI मानवासाठी अत्यंत उपयुक्त ठरु शकते.

*****

महिला स्वातंत्र्य क्रांतिकारकांचे योगदान

- सलोनी विनायक शिगवण
इयत्ता बारावी कला



महिला स्वातंत्र्य लढा हा केवळ पुरुषांनी लढलेला संघर्ष नव्हता, तर तो स्त्री-पुरुष समान सहभागातून घडलेला एक व्यापक राष्ट्रीय आंदोलन होता. समाजातील अनेक बंधनांमध्ये अडकलेल्या स्त्रियांनी आपल्या जीवनातील भीती, रुढी, अन्याय आणि मर्यादा झुगारुन देत स्वातंत्र्याच्या रणांगणात उडी घेतली. भारतीय स्वातंत्र्य लढ्यात महिलांचे योगदान अमूल्य, प्रेरणादायी आणि ऐतिहासिक महत्त्वाचे आहे. त्यांनी केवळ पाठिंबा दिला नाही, तर थेट क्रांतिकारक, नेत्या, संघटक, सैनिक, प्रचारक आणि बलिदानी म्हणून कार्य केले. स्त्रियांची सामाजिक स्थिती आणि संघर्ष ब्रिटिश राजवटीच्या काळात भारतीय स्त्रियांची सामाजिक स्थिती अत्यंत दयनीय होती. शिक्षणाचा अभाव, बालविवाह, सती प्रथा, विधवांवरील अन्याय, पडदा पद्धती अशा अनेक सामाजिक स्थिती कुप्रथा अस्थित्वात होत्या. अशा परिस्थितीत स्वातंत्र्य लढ्यात सहभागी होणे हे स्त्रियांसाठी मोठे धैर्याचे पाऊल होते. परंतु देशप्रेम, स्वाभिमान आणि स्वातंत्र्याची आस यामुळे अनेक स्त्रियांनी या बंधनांना झुगारुन दिले.

* १८५७ च्या स्वातंत्र्य समरातील स्त्रिया :

१८५७ च्या स्वातंत्र्यसमर हा भरतीय स्वातंत्र्यलढ्याचा पहिला माठा टप्पा मानला जातो. या उठावात महिलांनीही महत्त्वाची भूमिका बजावली.

राणी लक्ष्मीबाई त्या भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील पहिल्या आणि सर्वात प्रभावी महिला क्रांतिकारक ठरल्या. झाशीच्या राणीने इंग्रजांविरुद्ध शौर्याने लढा दिला. ''मी माझी झाशी देणार नाही'' हे तिचे वाक्य आजही स्वातंत्र्य प्रेमाची प्रेरणा देते. घोड्यावर बसून तलवार हाती घेत शत्रूशी लढणारी राणी लक्ष्मीबाई स्त्रीशक्तीचे प्रतीक बनली.

क्रांतिकारी चळवळीतील महिलांचे योगदान २० व्या शतकाच्या सुरुवातीस क्रांतिकारी चळवळी अधिक तीव्र झाल्या. या चळवळीत हिहलांनी सक्रिय सहभाग घेतला. मॅडम भीकाजी कामा या परदेशात राहूनही भारताच्या स्वातंत्र्यासाठी कार्य करणाऱ्या महान महिला क्रांतिकारक होत्या. त्यांनी जर्मनीतील स्टुटगार्ट येथे १९०७ साली पहिल्यादा भारतीय ध्वज फडकावला. त्यांनी ब्रिटिश अत्याचारांविरोधात आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताचा आवाज पोहोचवला. कल्पना दत्त, प्रीतीलता वाडेदार, सुचेता कृपलानी यांसारख्या महिलांनी सशस्त्र चळवळींमध्ये सहभाग घेतला. प्रीतीलता वाडेदार यांनी इंग्रज अधिकाऱ्यांच्या क्लबवर हल्ला करताना बलिदान दिले.

* महात्मा गांधी आणि महिलांचा सहभाग :

महात्मा गांधीनी महिलाहना स्वातंत्र्यलढ्यात सक्रिय सहभागी होण्यासाठी प्रेरित केले. असहकार आंदोलन, सविनय कायदेभंग आंदोलन, मिठाचा सत्याग्रह, भारत छोडो आंदोलन या सर्व चळवळीत महिलांचा मोठ्या प्रमाणावर सहभाग होता. कस्तुरबा गांधी यांनी गांधीजींसोबत राहून तुरुंगवास भोगला आणि आंदोलनात नेतृत्व केले. सरोजिनी नायडू या एक महान कवयित्री, वक्त्या आणि नेत्या होत्या. त्या भारतीय राष्ट्रीय

काँग्रेसच्या पहिल्या अध्यक्षा बनल्या आणि मिठाच्या सत्याग्रहात त्यांनी नेतृत्व केले. महाराष्ट्रातील महिला स्वातंत्र्यसेनानी महाराष्ट्राने अनेक धाडसी महिला स्वातंत्र्यसेनानी घडवल्या.

उषा मेहता यांनी 'काँग्रेस रेडिओ' चालवून ब्रिटिश सरकारविरुद्ध जनजागृती केली. त्यांना अटक करुन कठोर शिक्षा देण्यात आली. तरीही त्यांनी हार मानली नाही. ताराबाई शिंदे, सावित्रीबाई फुले यांनी सामाजिक सुधारणा करुन स्त्रियांच्या स्वातंत्र्याचा पाया मजबूत केला. सामाजिक स्वातंत्र्याशिवाय राजकीय स्वातंत्र्य अपूर्ण आहे, हे त्यांनी दाखवून दिले.

* आदिवासी व ग्रामीण महिलांचे योगदान :

स्वातंत्र्य लढ्यात ग्रामीण व आदिवासी महिलांचे योगदान अनेकदा दुर्लक्षित राहिले आहे. जंगल सत्याग्रह, कर न भरणे, परकीय मालावर बहिष्कार अशा आंदोलनांत त्यांनी सक्रिय सहभाग घेतला. अनेक महिलांनी अन्नपुरवठा, संदेशवहन, आश्रय देणे अशी महत्त्वाची कामे केली.

* महिला आणि तुरुंगवास :

स्वातंत्र्य लढ्यात हजारो महिलांनी तुरुंगवास भोगला, कठोर शिक्षा, उपासमार, शरिरिक व मानसिक छळ सहन करुनही त्यांनी आंदोलन सुरु ठेसले. स्त्रियांचा हा त्याग स्वातंत्र्य लढ्याला नैतिक बळ देणारा ठरला.

* स्वातंत्र्यानंतर महिलांचे स्थान :

महिलांच्या योगदानामुळे स्वातंत्र्यानंतर भारतीय संविधानात स्त्री-पुरुष समानतेचा विचार करण्यात आला. मतदानाचा हक्क, शिक्षणाचा अधिकार, नोकरीतील समान संधी यांचा मार्ग खुला झाला. स्वातंत्र्य लढ्यातील महिलांनी आधुनिक भारतातील स्त्री स्वातंत्र्याचा पाया घातला.

निष्कर्ष :

भारतीय स्वातंत्र्यलढा हा केवळ राजकीय संघर्ष नव्हता, तर सामाजिक परिवर्तनाचा प्रवास होता. या प्रवासात महिलांचे योगदान अत्यंत मोलाचे आहे. त्यांनी तलवार, लेखणी, सत्याग्रह, बलिदान आणि संघटन यांच्या माध्यमातून स्वातंत्र्य लढ्याला दिशा दिली. आजच्या पिढीने या महान महिलांच्या त्यागाची जाणीव ठेवून स्त्री-पुरुष समानतेचे मूल्य जपणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल. महिला स्वातंत्र्य क्रांतिकारकांचे योगदान हे भारतीय इतिहासातील सुवर्णाक्षरांनी लिहिलेल पर्व आहे.

****

कोकणातील कातळशिल्पे व त्यांचे संवर्धन

- आर्यन संतोष मळेकर
इयत्ता 11th Arts

महाराष्ट्राचा कोकण प्रदेश हा निसर्ग सौंदर्य, जैवविविधता आणि सांस्कृतिक वारशाने नटलेला आहे. सह्याद्री पर्वतरांगांच्या सानिध्यात व अरबी समुद्राच्या किनाऱ्यावर वसलेला हा प्रदेश केवळ भौगोलिक दृष्ट्या महत्वाचा नसून, तो मानवी इतिहासाच्या अतिशय प्राचीन खुणा आजही जपून ठेवणारा आहे. कोकणातील कातळशिल्पे हा अशाच एका प्राचीन अमूल्य वारशाचा भाग असून, ती आदिमानवाच्या जीवनशैलींचे व वचिस्वाचे दर्शन घडवितात.

कातळशिल्पे म्हणजे प्राचीन मानवाने दगडांच्या सपाट पृष्ठभागावर कोरलेल्या आकृती होत. ही शिल्पे रंगकामातून नव्हे, तर दगड ठोकून, घासून अथवा कोरुन साकारलेली आहेत. प्राणी, मानवकृती, शिकार प्रसंग, नृत्य दृश्ये, जलचर जीव, पक्षी तसेच विविध भौमितीक चिन्हे या शिल्पांत आढळतात. अभ्यासकांच्या मते ही शिल्पे साधारणपणे इ.स.पू. १००० ते ३००० वर्षांपूर्वीच्या काळातील असावीत.

कोकणातील कातळशिल्पांचा शास्त्रीय अभ्यास आणि व्यापक नोंद तुलनेने अलीकडच्या काळात सुरु झाली. रत्नागिरी, सिंधुदुर्ग आणि रायगड या जिल्ह्यामध्ये मोठ्या प्रमाणावर कातळशिल्पे आढळून आली आहेत. राजापूर, लांजा, चिपळूण, देवगड, कुडाळ, कणकवली, माणगाव अशा अनेक ठिकाणी ही शिल्पे मातीच्या घराखाली लपलेली होती: शेती काम, रस्ते बांधकाम किंवा नैसर्गिक धुप यांमुळे ती हळूहळू

उघडकीस आली.

कोकणातील कातळशिल्पांचे वैशिष्ट्ये म्हणजे त्यातील प्राण्यांच्या मोठ्या व ठसठशीत आकृती. वाघ, हत्ती, बैल, हरण, माकड, मासे, कासव यांसारख्या प्राण्यांचे प्रभावी चित्रण या शिल्पांत दिसून येते. काही शिल्पांमध्ये आज कोकण प्रदेशात आढळत नसलेल प्राणी दर्शवलेली आहेत. यावरुन त्या काळातील पर्यावरण, हवामान व जैवविविधता यांचा अभ्यास करता येतो. मानवी आकृती अत्यंत साध्या रेषांत दाखवली असून, त्यातून समूहजीवन, शिकार व सामाजिक व्यवहार यांचे संकेत मिळतात.

कातळशिल्पे ही केवळ कलात्मक अभिव्यक्ती नसून, ती आदिमानवाच्या श्रद्धा, जीवनपद्धती व विचारसरणीचे प्रतिबिंब आहेत. लेखन व्यवस्था अस्तित्वात येण्यापूर्वी मानवाचे दगडांवर कोरीव काम करुन आपले अनुभव व भावना व्यक्त केल्या. त्यामुळे कातळशिल्पे ही मानवी संस्कृतीची आद्य भाषा मानली जाते. या शिल्पांच्या माध्यमातून मानवाचा निसर्गाशी असलेला घनिष्ठ संबंध स्पष्टपणे दिसून येतो.

आज मात्र कोकणातील कातळशिल्पे विविध संकटांना सामोरी जात आहेत. नैसर्गिक कारणांमध्ये पावसामुळे होणारी धूप, तापमानातील बदल, शेवाळ व माती साचणे यांचा समावेश होतो. मानवनिर्मित कारणे अधिक गंभीर असून, अनियंत्रित बांधकाम, खाणकाम, औद्योगिकीकरण, रस्ते विस्तार, वृक्षतोड तसेच अज्ञानामुळे होणारी तोडफोड यांमुळे अनेक शिल्पे नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत. काही ठिकाणी धार्मिक गैरसमजुतीमुळे शिल्पांवर रंग फासणे किंवा त्यात बदल करणे हेही आढळून येते.

या पार्श्वभूमीवर कातळशिल्पांचे संवर्धन करणे अत्यंत आवश्यक आहे. संवर्धनाची पहली पायरी म्हणजे सर्व कातळ शिल्पे स्थळांची शास्त्रीय नोंद व दस्ताऐवजीकरण करणे, छायाचित्रण, मोजमाप, नकाशे. आणि अभ्यासपूर्ण माहिती संकलित करुन ती सुरक्षित ठेवली पाहिजे. त्यांनतर या स्थळांना कायदेशीर संरक्षण देणे गरजेचे आहे.

कातळ शिल्पे संवर्धनात शासनाची भूमिका महत्त्वाची आहे. पुरातत्व विभागाने संशोधन, संरक्षण आणि स्मारकांचा दर्जा, माहिती फलक, मार्गदर्शक सुविधा आणि नियंत्रित प्रवेश व्यवस्था उभारल्यास शिल्पांची संरक्षण अधिक प्रभावी होऊ शकते.

स्थानिक समाजाचा सहभागही तितकाच महत्वाचा आहे. स्थानिक नागरिक, शाळा, महाविद्यालये, स्वयंसेवी संस्था आणि ग्रामपंचायती यांच्या माध्यमातून जनजागृती केल्यास कातळशिल्पांविषयी आदरभाव निर्माण होईल. स्थानिक लोकच या वारशाचे खरे संरक्षक ठरु शकतात.

कातळशिल्पे पर्यटनाच्या दृष्टीने महत्वाची आहेत. शाश्वत आणि नियंत्रित पर्यटनाच्या माध्यमातून स्थानिकांना रोजगाराच्या संधी मिळू शकतात; मात्र पर्यटन विकास करताना संवर्धनाचा समतोल राखणे आवश्यक आहे. अनियंत्रित पर्यटनामुळे शिल्पांचे नुकसान होऊ नये. यासाठी स्पष्ट नियम व मार्गदर्शन तत्वे असणे गरजेचे आहे.

एकंदरीत, कोकणातील कातळशिल्पे हा महाराष्ट्राचा नव्हे, तर संपूर्ण मानवजातींचा अमूल्य सांस्कृतिक ठेवा आहे. हा वारसा जतन करणे ही आपली सामुहिक जबाबदारी आहे. योग्य संवर्धन, शास्त्रीय अभ्यास आणि जनजागृती यांच्या माध्यमातूनच हा प्राचीन वारसा पुढील पिढ्यांसाठी सुरक्षित ठेवता येईल. कातळावर कोरलेला हा इतिहास जपणे म्हणजे आपल्या मूळ ओळखीचे संरक्षण करणे होय.





हिंदी विभाग

''जाका गुरु भी अंधला, चेला खरा निरंध ।
अंधा-अंधा ठेलिया, दून्यूँ कूप पडंत ।''

-कबीर

नई राष्ट्रीय शिक्षा नीति और हिंदी भाषा

- रितिशा कुरुळकर
द्वितीय वर्ष कला

''अंग्रेज चले गए लेकिन अंग्रेजी छोड़ गए'' ये कहावत तो सबने सुनी होगी । हमारे देश के लोग अपनी राष्ट्रीय भाषा हिंदी को छोड़कर अंग्रेजी भाषा को अपना रहे है । हमारे देश के स्कूलों ने भी अंग्रेजी भाषा के अध्ययन पर अधिक जोर देना शुरु कर दिया है क्योंकी इससे बहुराष्ट्रीय कंपनियों में बेहतर नौकरी के अवसर प्राप्त करने में मदद मिलती है ।

हिंदी एक ऐसी भाषा है जो समय के साथ विकसित हुई है । इसकी जड़े संस्कृत में है लेकिन यह फारसी अपनी और अंग्रेजी सहित कई अन्य भाषाओं से भी प्रभावित है ।

हिंदी का पहला लिखित अभिलेख ११ वी शताब्दी का है। हालाँकी १९ वी सदी तक हिंदी का मानकिकरण शुरु नहीं हुआ था । २० वी सदी में हिंदी भारत की राजभाषा बन गई । यह एक विवादास्पद निर्णय था, क्योकि कई लोंगो का मानना था कि हिंदी सभी भारतीयों की भाषा नहीं है ।

अब, भारत में ४२८ मिलियन से अधिक लोग हिंदी बोलते है । यह नेपाल और मॉरीशस सहित कई अन्य देशों की अधिकारिक भाषा भी है । हिंदी एक जीवंत और बढ़ती हुई भाषा है और निश्चित रुप से आने वाले वर्षो में इसका विकास जारी रहेगा ।

हाल के वर्षो में, भारतीय शिक्षा प्रणाली में हिंदी की भूमिका को लेकर कुछ बहस छिड़ी हुई है । कुछ लोगों का तर्क है कि स्कूलों में शिक्षा का एक मात्रा माध्यम अंग्रेजी होना चाहिए । हालाँकी स्कूलों में हिंदी पढ़ाई जारी रखने के पक्ष में मजबुत तर्क है ।

संचार और नौकरियों तथा शिक्षा तक पहुच के लिए हिंदी एक महत्वपूर्ण भाषा है ।

नई राष्ट्रीय शिक्षा नीति (एनईपी) २०२० शिक्षा में हिंदी के महत्व को पहचानती है । नीति में कहा गया है, ''हिंदी भाषा क्षेत्रों के स्कुलों में शिक्षा के माध्यम के रुप में स्कूलों में हिंदी का उपयोग किया जाएगा ।''

इसलिए, एनईपी २०२० शिक्षा में हिंदी के महत्व को पहचानती है और स्कुलों में इसके निरंतर उपयोग के लिए प्रावधान किया है ।

नविन राष्ट्रीय शिक्षा नीति २०२०-२१ वी शताब्दी की ऐसी पहली शिक्षा नीति है, जिसका लक्ष्य हमारे देश के विकास के लिए आनेवाले आवश्यकता को पूरा करना है, यह नीति भारत की परंपरा और उसके सांस्कृतिक मूल्यों को बरकरार रखते हुए २१ वी सदी की शिक्षा के लिए आकांक्षात्मक लक्ष्य, जिसके अंतर्गत शिक्षा व्यवस्था उसके नियमों का वर्णन सहित सभी पक्षों के सुधार और पुनर्गठन का प्रस्ताव रखता है । राष्ट्रीय शिक्षा नीति प्रत्येक व्यक्ति में विहित रचनात्मक क्षमता के विकास पर जोर देती है । यह नीति इस सिद्धांत पर आधारित है कि शिक्षा से ना केवल साक्षरता, उच्च स्तर की तार्किक और समस्या समाधान संबंधित संज्ञानात्मक क्षमताओं का विकास होना चाहिए बल्कि नैतिक सामाजिक और भावनात्मक स्तर पर भी व्यक्ति का विकास होना चाहिए ।

नई शिक्षा नीति के निर्माण के लिए जून २०१७ में पूर्व इसरो प्रमुख डॉ. के. कस्तूरीरंगन की अध्यक्षता में एक समिती का गठन किया गया था । इस समिती ने मई २०१९ में राष्ट्रीय शिक्षा नीति का मसौदा प्रस्तुत किया था । राष्ट्रीय शिक्षा नीति (एनईपी) २०२० वर्ष १९६८ और वर्ष १९८६ के बाद स्वतंत्र भारत की तीसरी शिक्षा नीति होगी ।

नई शिक्षा नीति में वर्तमान में सक्रिय १० + २ के शैक्षिक मॉडल के स्थान पर शैक्षिक पाठ्यक्रम को ५ + ३ + ३ + ४ प्रणाली के आधार पर विभाजित करने की बात कही गई

है। इस शिक्षा नीति में छात्रों में रचनात्मक सोच, तार्किक निर्णय और नवाचार की भावना को प्रोत्साहित करने पर बल दिया गया है । इस नीति में प्रस्तावित सुधारों के अनुसार कला और विज्ञान, व्यायसायिक तथा शैक्षणिक विषयों एवं पाठ्यक्रम का पाठ्येतर गतिविधियों के बीच बहुत अधिक अंतर नहीं होगा ।

नई शिक्षा नीति का मुख्य उद्देश एक बच्चे को कुशल बनाने के साथ-साथ, जिस भी क्षेत्र में वह रुचि रखता है, उसी क्षेत्र में उन्हें प्रशिक्षित करना हैं । इस तरह सीखने वाले अपने उद्देश और अपनी क्षमताओं का पता लगाने में सक्षम होते है । नई शिक्षा नीति में शिक्षक की शिक्षा और प्रशिक्षण प्रक्रियाओं के सुधार पर भी जोर दिया गया है ।

वर्तमान शिक्षा प्रणाली वर्ष १९८६ की मौजूदा शिक्षा नीति में किए गए परिवर्तनों का परिणाम है । इसे शिक्षार्थी और देश के विकास को बढ़ावा देने के लिए लागू किया गया है । नई शिक्षा नीति बच्चों के समग्र विकास पर केंद्रित है । इस निती के तहत वर्ष २०३० तक अपने उद्देशय को प्राप्त करने का लक्ष्य है ।

नई शिक्षा नीति में मातृभाषा पर विशेष जोर दिया गया है जिससे बच्चा बचपन से ही अपनी मातृभाषा को अच्छे से समज और जान पाएगा । शिक्षा नीति में कोंडिवा को भी शामिल किया गया है, यानी बच्चे मात्र किताबी और व्यावहारिक ज्ञान ही नहीं अपितू तकनीकी क्षेत्र में भी बेहतर प्रदर्शन कर पाएंगे ।

शिक्षा की व्यवस्था हो चाहे व्यवस्था की शिक्षा दोनों की स्थिती में भाषा का महत्व सर्वविदित है । व्यावहारिक जीवन शैली हो चाहे अध्ययन शीलता का ककहरा सीखना हो, भाषा के बिना सब व्यर्थ है । बिना भाषा के सीखें, समझे और जानने के कुछ भी सीखना असंभव है । बात जब ककहरे की हो तो मातृकुल परिवेश की भाषा यानी मातृभाषा का महत्व स्वाकारा गया है ।

भारतीय नवजागरण के अग्रदुत के रूप में प्रसिद्ध आधुनिक काल के कवि भारतेंदु हरिशचंद्र ने निज भाषा का महत्व बताते हुए लिखा है, कि निज भाषा उन्नती है, सब उन्नति को मुल, बिन निज भाषा ज्ञान के, मिटन नहिश के सुल । इस के साथ भारत की निज भाषा से भारतेंदु जी का तात्पर्य हिंदी सहित भारतीय भाषाओं से रहा है । वे आगे ये भी लिखते है कि 'अंग्रेजी पढ़ के जदपि, सब गुण होता प्रवीण । पै निज भाषा ज्ञान के रहत हीन के हीन यानी अंग्रेजी जैसी विदेशी भाषाओं में प्राप्त शिक्षा से आप प्रवीण तो हो जाओगे किंतु सांस्कृतिक एव व्यावसाहिक दृष्टिकोण से हीन ही रहो गे।

प्राय: एक दिन की अखबार की सुर्खियां भारत के शिक्षा नीति निर्धारकों को सोचने- समझने पर विवश कर देती है की आखिर भारत में हीं अपने राष्ट्र की प्रतिनिधी भाषा जानने, समझने के बावजूद अंग्रेजी का इतना दबाव क्यों है ? जो व्यक्ति को अवसादग्रस्त तो कर ही रहा है साथ-साथ जीवन की बाजी लगाने के लिए भी विवश कर रहा है ।

आजादी के बाद के पहले दो दशकों में पूरी आशा थी की अंग्रजी का वर्चस्व कम होगा । हिंदी के विरोध के कारण सरकारें सशंकित हुई जिसका खामियाना दूसरी भारतीय भाषाओं को भुगतना पड़ रहा है । तीन-चार दशक तो इसी में बीते की अंग्रेजी में प्रति वर्ष करोंड़ो बच्चे हाईस्कूल परिक्षा में फेल होते रहें । किंतु वर्तमान पर नजर डालों तो ठीक विपरीत परिणामों का दर्शन होता है ।

आज उपलब्धियों के बड़े आकड़े सामने आते हैं कि २१ करोड़ बच्चें स्कुल जा रहे हैं, १५ करोड़ मध्यान्ह भोजन व्यवस्था से लाभान्वित हो रहे है, स्कुलों की उपलब्धता लगभग प्रतिशत के लिए एक किलोमीटर के दायरें में उपलब्ध है । यही नहीं, अधिकांश राज्य सरकारे अंग्रेजी पढ़ाने की व्यवस्था कक्षा एक या दो से कर चुकी है और इसे बड़ी उपलब्धि के रुप में गिनाती भी है । आज अगर भारत के

युवाओं से पूछे तो वे भी यहीं कहेंगे – अगर उनकी अंग्रेजी अच्छी होती या फिर वे किसी कॉन्वेट या पब्लिक स्कूल में पढ़े होते तो जीवन सफल हो जाता ।

मातृभाषा से बच्चों का परिचय घर और परिवेश से ही शुरु हो जाता है । इस भाषा में बातचीत करने और चींजो को समझने-समझाने की क्षमता के साथ बच्चे विद्यालय में दाखिल होते है । अगर उनकी इस क्षमता का इस्तेमाल पढ़ाई के माध्यम के रुप में मातृभाषा की चुनाव करके किया जाए तो इसके सकारात्मक परिणाम देखने को मिलते है ।

कई बार मातृभाषा को हतोत्साहित करने की प्रवृत्ति विद्यालयों में देखी जाती है । जैसे हिंदी बोलने में अँग्रेजी माध्यम विद्यालयों में दंड लगने वाली घटनाओं के बारें में हमने सुना है । ऐसे ही निमाड़ी या अन्य मातृभाषाओं के गीतो की स्कुलो में गाने से बच्चों को हतोत्साहित किया जाता है, इसका अर्थ है कि हम बच्चों को उनके अपने परिवेश, संस्कृति और उनकी जड़ से काट देना चाहते है ।

यह प्रक्रिया बड़ी चालाकी के साथ बचपन से ही शुरु हो जाती है और एक दिन हमें अहसास होता है कि हम अपनी ही जड़ों से अजनबी हो गए है । इससे बचने का एक ही तरीका है कि हम मातृभाषा में संवाद, चिंतन और विचार-विमर्श को अपने रोजमरा की जिंदगी में शामिल करें, इसके इस्तेमाल को लेकर किसी भी तरह की हीनभावना का शिकार होने की बजाय ऐसा करने को प्रोत्साहित करें ।

हालांकि भारत की पहली शिक्षा नीति में भी त्रिभाषा में शिक्षा व्यवस्था की परिकल्पना दौलत सिंह कोठारी आयोग ने रखी थी, कतिपय राजनैतिक कारणों से पहली शिक्षा नीति भी न तो त्रिभाषा फार्मुला और न ही मातृभाषा में अनिवार्य शिक्षा का मसौदा अपना पाई, किंतु वर्षो की तपस्या और माँग अनुरुप वर्ष २०२० में जारी शिक्षा नीति ने प्रधानमंत्री नरेंद्र मोदी एव शिक्षा मंत्री या कहे मानव संसाधन विकास मंत्री रमेशचंद्र पोखरियाल निशंक द्वारा प्राथमिकी शिक्षा में मातृभाषा की अनिवार्यता को अपनाकर भारत भर में निज भाषा में शिक्षा के महत्व को प्रतिपादित किया है ।

नई शिक्षा नीति में जिस तरह से प्राथमिक तौर पर मातृभाषा के प्रभाव को सामायोजित करते हुए हिंदी भाषा के महत्व को भी सम्मिलित किया है वह हिंदी के प्रभुत्व को स्थापित करते हुए भविष्य में हिंदी युग की स्थापना का कारक बनेगा। हिंदी के साथ-साथ भारतीय भाषाओं का भी महत्व बने और अंग्रजी का अधिपत्य समाप्त हो यही मूल ध्येय है ।

मुख्य अतिथी और महात्मा गांधी अंतर्राष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालय, वर्धा के कुलपति प्रोफेसर रजनीश कुमार शुक्ला ने कहा कि यह पहली शिक्षा नीति है, जो भाषाओं के प्रति चिंता को उजागर करती है । यह नीति बहुभाषी होने की ताकत की पहचानती है । हिंदी सबसे अधिक लोगों की भाषा है । हम आम तौर पर मानते है कि अंग्रेजी ज्ञान और विज्ञान की भाषा है और यह मानसिकता हिंदी और अन्य भारतीय भाषाओं के विकास और विस्तार में बाधक है । एनइपी २०२० का लक्ष्य देश को आगे ले जाना है । अपनी भाषा के विकास के बिना यह संभव नहीं है । अटल बिहारी वाजपेही हिंदी विश्वविद्यालय के कुलपति प्रोफेसर रामदेव भारद्वाज ने कहा कि हमें अपनी भाषा पर गर्व करना चाहिए और अपनी मातृभाषा का उपयोग करने में संकोच नही करना चाहिए ।

हिंदी को व्यापार और अंतर्राष्ट्रीय संवाद की भाषा बनाया जाना चाहिए । इस संबंध में प्रधानमंत्री श्री. नरेंद्र मोदी ने एक उदाहरण प्रस्तूत किया । उन्होंने अंतराष्ट्रीय मंचो पर हिंदी को सन्मान दिलाया । हिंदी की सन्मान देना और दिलाना सभी का दायित्व है ।

6) स्व. गोपीनाथ मुंडे कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, मंडणगड येथील अर्थशास्त्र विभागाशी महाविद्यालयातील अर्थशास्त्र विभागाने सामंजस्य करार केला आहे.

7) महाविद्यालय आणि नॅशनल स्किल सेंटर रत्नागिरी यांच्या दरम्यान 12 फेब्रुवारी 2020 रोजी कौशल्य आधारित प्रमाणपत्र कोर्स प्रशिक्षण संदर्भात सामंजस्य करार करण्यात आला.

8) सामंजस्य करारा अंतर्गत नॅशनल स्किल सेंटर रत्नागिरी द्वारे महाविद्यालयामध्ये विद्यार्थ्यांकरिता फ्रंट डेक्स ऑफिस एक्झिक्युटिव्ह या सर्टिफिकेट कोर्सची सुरुवात करण्यात आली.

9) IQAC च्या वतीने महाविद्यालयातील अर्थशास्त्र, वाणिज्य, इतिहास आणि भूगोल या विभागांत कौशल्य आधारित सर्टिफिकेट कोर्स सुरु करण्यात आले.

10) IQAC व अमृतेश्वर कला वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, विंझर, पुणे यांच्यामध्ये सामंजस्य करारानुसार 1 डिसेंबर 2025 रोजी IQAC च्या नियोजनाबाबत सभा आयोजित केली होती.

11) IQAC ने विविध विषयाच्या अनुषंगाने शैक्षणिक वर्ष 2025-26 करिता एकूण पाच सभाचे 23 जुलै 2025, 13 ऑगस्ट 2025, 16 ऑगस्ट 2025, 21 ऑगस्ट 2025 व 16 सप्टेंबर 2025 आयोजन करण्यात आले.

समन्वयक IQAC
डॉ. गणेश बा. मांगडे

वाणिज्य विभाग आणि व्यवस्थापन विभाग अहवाल २०२५-२६

1) सर्टिफिकेट प्रोग्राम इन बँकिंग फायनान्स अँड इन्शुरन्स :

15 जुलै 2025 रोजी श्री. राजेश गोंनकर, बजाज कंपनी यांनी विद्यार्थ्यांना 'सर्टिफिकेट प्रोग्राम इन बँकिंग फायनान्स अँड इन्शुरन्स' या कोर्स बद्दल माहिती दिली.

2) करिअर मार्गदर्शन CMA आणि CA :

22/07/2025 मंगळवार रोजी CMA मधील वाणिज्य विभाग 'विद्यार्थ्यांसाठी संधी' या विषयावर श्रीमती प्रणाली आरेकर, मुंबई यांनी व्याख्यान दिले.

श्री. एम. एस. जाधव CA यांनी 'चार्टर्ड अकाउंट मधील करियर' या विषयावर मार्गदर्शन केले.

3) सायबर सेक्युरिटी जनजागृती कार्यक्रम :

29 जुलै 2025 रोजी सायबर सेक्युरिटी अवेअरनेस कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

4) करिअर मार्गदर्शन CMA :

2/8/2025 रोजी करियर मार्गदर्शन CMA या विषयावर श्री. जुगल महेश्वरी, श्री. आशिष कोठारी (CA) यांनी माहिती दिली.

5) बँक मर्जर : राष्ट्रीयकृत बँका फक्त चार राहणार :

दिनांक 3/12/2025 रोजी बँक मर्जर : राष्ट्रीयकृत बँका फक्त चार राहणार ? या विषयावर डॉ. जयवंत जालगांवकर यांनी मार्गदर्शन केले.

6) सामान्य मानसिक आरोग्य कार्यशाळा :

दिनांक 12/12/2025 शुक्रवार रोजी आदित्य बिरला एज्युकेशन ट्रस्ट आणि महाराष्ट्र शासन यांच्या तर्फे सामान्य मानसिक आरोग्य कार्यशाळा आयोजित करण्यात आली. सौ. रेणुका वारे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

7) स्मार्ट करिअर इन कॉमर्स :

दि. 12 जानेवारी 2026 रोजी स्मार्ट करिअर इन कॉमर्स या विषयावर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. सीए राजेंद्र डांगी, पुणे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

8) करिअर इन एव्हिएशन :

13 जानेवारी 2026 रोजी 'करियर इन एव्हिएशन' या विषयावर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. प्रा. डॉ. प्रशांत पवार यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

9) करिअर इन MBA :

22/1/2026 डॉ. विठ्ठल जाधव आणि प्रा. नगरकर दिवेश मदनभाई सुरा इन्स्टिट्यूट खेड यांनी 'करियर इन MBA' या विषयावर मार्गदर्शन केले.

10) करिअर गायडन्स :

दि. 4 फेब्रुवारी 2026 रोजी स्टर्लिंग इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट मुंबई येथील श्री. इक्तिकार मिस्त्री आणि श्री. मुरलीधर धनवडे यांनी विद्यार्थ्यांना करिअर बाबत मार्गदर्शन केले.

11) पितांबरी ॲग्रो टुरिझम साखळोली येथे औद्योगिक भेट :

दि. १६/०२/२०२६ रोजी तृतीय वर्ष वाणिज्य विद्यार्थ्यांसाठी पितांबरी ॲग्रो टुरिझम साखळोली येथे औद्योगिक भेटीचे आयोजन करण्यात आले.

डॉ. भारत कऱ्हाड
डॉ. सुरेश निंबाळकर
डॉ. जयश्री गव्हाणे

इतिहास विभाग वार्षिक अहवाल २०२५-२६

सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षामध्ये इतिहास विभागाद्वारे इतिहास मंडळाची नव्याने स्थापना करण्यात आली. या मंडळामध्ये कु. सलोनी सालेकर, द्वितीय वर्ष कला; कु. नेहल पवार, प्रथम कर्ष कला आणि कैलास उजाळ, तृतीयवर्ष कला या विद्यार्थी प्रतिनिधींचा समावेश करण्यात आला.

इतिहास विभागाद्वारे वर्षभरात पुढील उपक्रम राबविण्यात आले.

* १४ जुलै २०२५ रोजी इतिहास विभागाद्वारे इतिहासाचार्य वि. का. राजवाडे जयंती साजरी करण्यात आली.
* २६ जुलै २०२५ रोजी 'राजर्षी शाहू महाराज' जयंती निमित्त द्वितीय वर्ष कला वर्गातील कु. सलोनी सालेकर हिने राजर्षी शाहू जीवन व कार्य या विषयावर तयार केलेल्या भित्तीपत्रकाचे अनावरण मा. प्राचार्य भारत कऱ्हाड सर यांचे हस्ते करण्यात आले.
* १५ ऑगस्ट २०२५ रोजी स्वातंत्र्य दिनानिमित्ताने कु. तनिष्का नाटेकर द्वितीय वर्ष कला हिने 'स्वातंत्र्य समर' या विषयावर तयार करण्यात आलेल्या भित्तिपत्रकाचे अनावरण मा. प्राचार्य यांच्या हस्ते करण्यात आले.
* सप्टेंबर महिन्यामध्ये इतिहास विभागाद्वारे पन्हाळेकाझी येथील प्राचीन लेण्यांना भेट देण्यासाठी ऐतिहासिक सहलीचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये तृतीय वर्ष कला या वर्गातील विद्यार्थी सहभागी झाले होते.
* २ ऑक्टोबर २०२५ रोजी राष्ट्रपती महात्मा गांधी जयंतीनिमित्त कु. श्रेया तुरे व कु. अक्सारी मिरकर प्रथम वर्ष कला या विद्यार्थीनीनी मराठी व इंग्रजी भाषेत तयार केलेल्या भित्तिपत्रकाचे अनावरण मा. प्राचार्य डॉ. भारत कऱ्हाड सर यांचे हस्ते करण्यात आले.
* इतिहास विभागाद्वारे २६ नोव्हेंबर २०२५ रोजी संविधान दिनानिमित्त कु. वृषाली गुंदेकर व कु. अकसरी मिरकर प्रथम वर्ष कला आणि कु. वैष्णवी शेलार तृतीय वर्ष कला या विद्यार्थीनींनी मराठी व इंग्रजी भाषेत तयार केलेल्या भित्तिपत्रकाचे महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. सुरेश निंबाळकर यांचे हस्ते अनावरण करण्यात आले.
* दि. ६ डिसेंबर रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिनानिमित्त 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर जीवन चरित्र' या विषयावर कु. नेहल पवार प्रथम वर्ष कला हिने तयार केलेल्या भित्तिपत्रकाचे अनावरण मा. प्राचार्य डॉ. भारत कऱ्हाड यांचे हस्ते करण्यात आले.

* दि. २६ जानेवारी 'प्रजासत्ताक दिना'निमित्त 'प्रजासत्ताकाचे महत्व' या विषयावर कु. सलोनी सालेकर द्वितीय वर्ष कला वर्गातील विद्यार्थीनीने भित्तिपत्रक तयार केले होते या भित्तिपत्रकाचे अनावरण मा. प्राचार्य यांच्या हस्ते करण्यात आले.
* दि. १९ फेब्रुवारी २०२५ रोजी छ. शिवाजी महाराज यांच्या ३९५ व्या जयंतीनिमित्त कु. जुई परचुरे प्रथम वर्ष कला हिने 'छ. शिवाजी महाराज यांची योग्यता' या विषयावर भित्तिपत्रक तयार करण्यात आले. या भित्तीपत्रकाचे अनावरण मा. प्राचार्य डॉ. भारत कऱ्हाड व कनिष्ठ महाविद्यालयाचे पर्यवेक्षक प्रा. लक्ष्मीकांत पाटील यांचे हस्ते करण्यात आले.

विभाग प्रमुख प्रा. सुरेश खरात यांनी शिवजयंती निमित्त 'छ. शिवाजीराजे जीवन संघर्ष' या विषयावर कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयामध्ये व्याख्यान स्वरुपात विचार मांडले.

या विभागाचे कामकाज विद्यार्थी प्रतिनिधी म्हणून श्री. कैलास उजाळ, तृतीय वर्ष कला आणि विभाग प्रमुख प्रा. सुरेश खरात यांनी पाहिले.

विद्यार्थी प्रतिनिधी
श्री. कैलास उजाळ
(तृतीय वर्ष कला)

विभाग प्रमुख
प्रा. सुरेश खरात

भाषा मंडळ व मराठी विभाग

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये भाषा मंडळ व मराठी विभागाद्वारे जे उपक्रम कार्यक्रम घेतले ते सर्व कार्यक्रम उपक्रम विद्यार्थ्यांना प्रेरणा देणेकरिता, स्पर्धाचे महत्व अधोरेखित करणेकरिता घेतले.

गुरुवार दि. १०/०७/२०२५ रोजी गुरुपौर्णिमा निमित्त आयोजित कार्यक्रमात गुरुंचे महत्व व आवश्यकता या विषयावर समाजशास्त्र व राष्ट्रीय सेवा योजना विभाग आयोजित कार्यक्रमात व्याख्यान प्रा. उत्तम पाटील यांनी दिले.

बुधवार दि. १७/९/२०२५ रोजी कु. श्रुती साखरकर यांचे 'कथाकथन व कथा सादरीकरण' या विषयावर व्याख्यानांचे आयोजन केले. सांस्कृतिक व वाङ्मयीन स्पर्धाकरिता या व्याख्यानाचा फायदा होईल. यादृष्टीने सदर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

बुधवार दि. ०७/१०/२०२५ रोजी लेखक बाबू घाडीगावकर यांचे व्याख्यान व सुसंवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. वृत्तपत्रात कथा, कविता, चित्रे, विनोद कसे लिहावेत या विषयी त्यांनी सुंदर विवेचन केले. हा लेखक मालवणी भाषा बोलणारा व जाणणारा असल्याने मालवणी भाषेचा सुंदर नमुना म्हणून विद्यार्थ्यांची करमणूक झाली मनोरंजन झाले.

सुंदर हस्ताक्षर स्पर्धाचे सालाबादप्रमाणे आयोजन करणेत आले सदर स्पर्धा मराठी व इंग्रजी भाषामध्ये घेणेत आली. या स्पर्धेला उत्तम प्रतिसाद मिळाला. मराठी व इंग्रजी भाषेतील प्रत्येकी पाच विद्यार्थ्यांना क्रमांक देऊन रोख रक्कम व प्रमाणपत्र देणेत आले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना अक्षराबद्दल लेखनाबद्दल आतुरता निर्माण झाली. शुद्ध लेखन, सुंदर लेखन कसे असायला हवे याचा परिचय झाला. मराठी भाषा पंधरवडा निमित्त या उपक्रमाचे आयोजन करणेत आले.

ग्रंथालय व मराठी विभागाने संयुक्तअसा ग्रंथप्रदर्शन व वाचनाचा उपक्रम हाती घेतला. ग्रंथ प्रदर्शनामुळे अनेक दुर्मिळ ग्रंथ, पुस्तके, चरित्र, आत्मचरित्रे यांची विद्यार्थ्यांना ओळख झाली. प्रत्येक वर्गातील विद्यार्थ्यांना ग्रंथ प्रदर्शनास भेट देण्यासाठी विशेष प्रयत्न करणेत आले. काही उल्लेखनीय पुस्तके, ग्रंथ यांचा विद्यार्थ्यांना परिचय करुन देणेत आला.

मराठी विभागाचे स्वतंत्र ग्रंथालय असून या ग्रंथालयातील आवश्यक असणारी अभ्यासक्रमाची पुस्तके अथवा संदर्भ पुस्तके अथवा इतर अवांतर वाचनाकरिताची पुस्तके विद्यार्थ्याच्या आवश्यकतेनुसार दिली जातात. या पुस्तक देवघेवीमुळे विद्यार्थ्यांना सहज पुस्तक सेवा उपलब्ध करुन दिली जातात.

दि. २७ फेब्रुवारी २०२६ रोजी ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्त कवी कुसुमाग्रज यांच्या जयंती कार्यक्रमाचे आयोजन करणेत आले. कुसुमाग्रजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन कुसुमाग्रजांची साहित्यसंपदाचे महत्व सांगितले गेले. कुसुमाग्रजांची पुस्तके निवडक कलाकृती कार्यालयातील कर्मचाऱ्यांना वाचनासाठी देणेत आली. कुसुमाग्रजांच्या प्रतिमेस विद्यार्थ्याच्या हस्ते पुष्पहार अर्पण करुन प्रा. उत्तम पाटील, प्रा. दीपक गडकर यांनी कुसुमाग्रजांच्या साहित्यांचे महत्व व त्यांचे योगदान यावरती व्याख्यान दिले. नाटक, कविता, कादंबरी या विविध प्रकाराचे कुसुमाग्रजांचे लेखन असूनआपण सर्वांनी ते वाचावे या विषयीचे आवाहन केले. सकाळी ११.१५ वा. प्रा. निंबाळकर सरांचे शुभहस्ते कुसुमाग्रजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन जयंती साजरी करणेत आली. यावेळी सर्व प्राध्यापक, कार्यालयीन कर्मचारी उपस्थित होते या कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयातील मराठी विभागाने केले.

चालू शैक्षणिक वर्ष २०२५ मध्ये मराठी व इंग्रजी भाषा माध्यमात सुंदर हस्ताक्षर स्पर्धा घेणेत आल्या. सदर स्पर्धेस उदंड प्रतिसाद लाभला. यासुंदर हस्ताक्षर स्पर्धेचा निकाल खालीलप्रमाणे –

मराठी भाषा निकाल

१)	प्रथम क्रमांक कोड क्र. ४४	ऋषीकेश कृष्णा पानकर	T. Y. Sc. IT	३०१ व प्रमाणपत्र
२)	द्वितीय क्रमांक कोड ४५	साहिल कृष्णा खापरे	F. Y. B. A.	२५१ व प्रमाणपत्र
३)	तृतीय क्रमांक कोड क्र. ३३	समीक्षा संदिप जागडे	F. Y. B. Com.	२०१ व प्रमाणपत्र
४)	उत्तेजनार्थ १ कोड क्र. ५३	जुई मनोज परचुरे	F. Y. B. A.	१५१ व प्रमाणपत्र
५)	उत्तेजनार्थ २ कोड क्र. ५३	प्रिया दिनेश धडसे	T. Y. BMS.	१०१ व प्रमाणपत्र

इंग्रजी भाषा निकाल

1)	प्रथम क्रमांक कोड क्र. २२	Firfire Khadeeja Sadique	T. Y. BC. IT	३०१ व प्रमाणपत्र
2)	द्वितीय क्रमांक कोड क्र. २१	Afifa Alikhan Parbhulkar	T. Y. BMS.	२५१ व प्रमाणपत्र
3)	तृतीय क्रमांक कोड क्र. २०	Zikra Zubair Nakhawa	S. Y. B. A.	२०१ व प्रमाणपत्र
4)	उत्तेजनार्थ १ कोड क्र. १८	Diksha Dattaram Sakpal	S. Y. B. Com.	१५१ व प्रमाणपत्र
5)	उत्तेजनार्थ २ कोड क्र. २३	Sayee Mahesh Rajeshirke	T. Y. B. Com.	१०१ व प्रमाणपत्र

अशा सर्व कार्यक्रम उपक्रमाने भाषा मंडळ व मराठी विभागाने सर्व कार्यक्रमांचे नियोजन केले. हा विभाग प्रा. सिद्राया शिंदे, प्रा. उत्तम पाटील, प्रा. दिपक गडकर पाहतात.

विद्यार्थी प्रतिनिधी
सलोनी कदम

प्रा. सिद्राया शिंदे
प्रा. उत्तम पाटील
प्रा. दिपक गडकर

भूगोल विभाग अहवाल सन 2025-26

21/11/2025 – भूगोलातील करिअर आणि जीआयएस प्रमुख पाहुणे प्राध्यापक समीर बुटाला यांनी विद्यार्थ्यांना भूगोलातील करिअरच्या संधी या विषयी सखोल मार्गदर्शन केले या कार्यक्रमाचे नियोजन डॉ. स्कंधा खेडेकर यांनी केले.

06/01/2026 – एमआयडीसी वळणे क्षेत्रभेट –

वळणे एमआयडीसी क्षेत्रातील उद्योगांना येणाऱ्या समस्या व त्यांच्या भौगोलिक अभ्यास करण्यासाठी वळणे एमआयडीसी येथे विद्यार्थ्यांनी कारखान्यांना भेट दिली. विद्यार्थ्यांनी कारखान्यांच्या समस्या जाणून घेतल्या व त्यावर एक संशोधन अहवाल तयार केला या संशोधन अहवालाचे मार्गदर्शन डॉ. स्कंधा खेडेकर यांनी केले.

13/01/2026 – बारावीच्या विद्यार्थ्यांना भूगोलातील आवड निर्माण होण्यासाठी भूगोलातील विविध विषयाच्या संधी या विषयावर व्याख्यान देण्यात आले हे व्याख्यान प्राध्यापक डॉ. स्कंधा खेडेकर यांनी दिले.

10/01/2026 – निबंध व भित्तिपत्रक स्पर्धा आयोजन.

तृतीय वर्ष भूगोल विभागातील विद्यार्थी कुमार साईराज ढगे, रितिकेश यादव, सुहास लवाटे, फेमिदार राजपुरकर या विद्यार्थ्यांनी या स्पर्धेचे आयोजन केले.

14/01/2026 – भूगोल दिन

या दिवशी जागतिक भूगोल दिनाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात भिंत्तिपत्रक प्रकाशन संशोधन अहवाल प्रकाशन प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. प्रमुख अतिथी प्रा. बिभीषण ढवळे व प्रा. डॉ. जयश्री गव्हाणे, प्रा. गणेश मांगडे सर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन फेमिदा राजपुरकर तसेच रितेशा करोळकर हिने मनोगत व्यक्त केले.

परीक्षेला बसलेल्या सर्व विद्यार्थ्यांचा शंभर टक्के निकाल लागल्याने त्यांचे अभिनंदन पुष्प देऊन करण्यात आले.

जानेवारी महिन्यात झालेल्या ICS महाविद्यालय, खेड व डी. बी. जे. महाविद्यालय, चिपळूण या स्पर्धेमध्ये विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. त्यातील कुमारी श्रेया तुरे या विद्यार्थिनीने पीपीटी स्पर्धेमध्ये द्वितीय क्रमांक मिळवला.

17 फेब्रुवारी 2025 – शिवजयंती निमित्त पालगड येथे पालगड किल्ल्याची स्वच्छता करण्यात आली.

सर्व कार्यक्रमांना प्राचार्य डॉ. भारत कऱ्हाड यांचे सहकार्य व उपस्थिती लाभली. त्यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

विविध विषयांवर विद्यार्थ्यांनी भिंत्तिपत्रके व निबंध तयार केले. त्याची यादी खालीलप्रमाणे –

निबंध स्पर्धा –

1) कु. श्रेया सुधीर तुरे
2) कु. ऋतुराणी मनोहर धाडवे
3) कु. जुई मनोज परचुरे
4) रितिशा देवानंद कुरुळकर

भिंत्तिपत्रक स्पर्धा –

1) कु. श्रेया सुधीर तुरे
2) कु. मनस्वी टेंभे

प्राध्यापक प्रतिनिधी
डॉ. स्कंधा खेडेकर

विद्यार्थी प्रतिनिधी
साईराज ढगे
फेमिदा राजपूरकर

अर्थशास्त्र विभाग २०२५-२६

*** 1) जागतिक लोकसंख्या दिन साजरा –**

अर्थशास्त्र विभागामार्फत 11 जुलै रोजी जागतिक लोकसंख्या दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाच्या माध्यमातून वाढत्या लोकसंख्येचे आर्थिक व सामाजिक परिणाम विद्यार्थ्यांना समजावून सांगण्यात आले. तसेच लोकसंख्या नियंत्रण, संसाधनांचे योग्य नियोजन आणि शाश्वत विकास याबाबत विद्यार्थ्यांमध्ये जागरुकता निर्माण करण्यात आली.

*** 2) भात लागवड प्रशिक्षण कार्यक्रम –**

विद्यार्थ्यांने कृषी अर्थशास्त्राचे प्रत्यक्ष ज्ञान मिळावे या उद्देशाने भात लागवड विषयावर प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमामध्ये भात लागवडीच्या पद्धती, उत्पादन वाढविण्याच्या आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती तसेच कृषी क्षेत्रातील रोजगाराच्या संधींबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

*** 3) रिझर्व्ह बँकेला शैक्षणिक भेट –**

अर्थशास्त्र विभागामार्फत विद्यार्थ्यांना बँकिंग व्यवस्थेचे प्रत्यक्ष ज्ञान मिळावे या उद्देशाने रिझर्व बँकेला शैक्षणिक **भेट** आयोजित करण्यात आली. या भेटीदरम्यान विद्यार्थ्यांना बँकेचे कार्य, चलन व्यवस्थापन, आर्थिक धोरणे आणि बँकिंग प्रणाली याबाबत सविस्तर माहिती मिळाली.

*** 4) काजू फळ प्रक्रिया उद्योग भेट-वळणे –**

अर्थशास्त्र विभागामार्फत वळणे येथे असलेल्या काजू फळ प्रक्रिया उद्योगाला शैक्षणिक भेट आयोजित करण्यात आली. या भेटीदरम्यान विद्यार्थ्यांना काजू प्रक्रिया उद्योगाची कार्यपद्धती, उत्पादन प्रक्रिया, विपणन व्यवस्था आणि उद्योग व्यवस्थापन याबाबत प्रत्यक्ष माहिती मिळाली.

*** 5) रोजगार प्रशिक्षण कार्यक्रमात सहभाग –**

कोकण कृषी विद्यापीठ, सामाजिक वनीकरण विभाग आणि कोकण कृषी विद्यापीठाच्या फॉरेस्ट विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित रोजगार प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये महाविद्यालयातील अर्थशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग घेतला. या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांना ग्रामीण रोजगार, पर्यावरण संवर्धन आणि कृषी संबंधित उद्योगांविषयी माहिती मिळाली.

*** 6) बँकिंग क्षेत्रातील सुधारणा-मार्गदर्शन व्याख्यान –**

३ डिसेंबर २०२५ रोजी ''बँकिंग क्षेत्रातील सुधारणा'' या विषयावर विशेष मार्गदर्शन व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात दापोली अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेचे चेअरमन जयवंत जालगांवकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केल. त्यांनी बँकिंग क्षेत्रातील बदल, डिजिटल बँकिंग, वित्तीय समावेशन आणि बँकिंग क्षेत्रातील करिअर संधी याबद्दल सविस्तर माहिती दिली.

*** 7) State Level Quiz Contest - "Eco's Echo" (फेब्रुवारी) –**

वराडकर कला आणि बेलोसे वाणिज्य महाविद्यालय, दापोली येथील अर्थशास्त्र विभागामार्फत ९ फेब्रुवारी रोजी State Level Quiz Contest - "Eco's Echo" या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेमध्ये विविध महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग घेतला. अर्थशास्त्र विषयाशी संबंधित विविध प्रश्नांद्वारे विद्यार्थ्यांचे ज्ञान, विश्लेषण क्षमता आणि स्पर्धात्मकता वाढविण्याचा प्रयत्न करण्यात आला. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये अर्थशास्त्र विषयाबद्दलची आवड आणि अभ्यासाची प्रेरणा वाढली.

* दिनांक ११ मार्च २०२६ रोजी प्रथम वर्ष कला अर्थशास्त्र विषयाच्या विद्यार्थ्यांनी डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली येथील कृषी सेवा केंद्राला भेट देण्यात आली होती.

* दिनांक १२ मार्च २०२६ रोजी गोपीनाथराव मुंडे महाविद्यालय, मंडणगड येथील अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ. भरत सोलापुरे यांचे 'शाश्वत विकास पर्यावरण आणि माधवराव गाडगीळ' या विषयावर त्यांचे व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.

विद्यार्थी मंडळ (वरिष्ठ महाविद्यालय)
वार्षिक अहवाल २०२५-२६

सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षामध्ये वरिष्ठ महाविद्यालयामध्ये मा. प्राचार्य डॉ. भारत कऱ्हाड यांच्या अध्यक्षतेखाली सर्वानुमते विद्यार्थी मंडळातील वर्ग प्रतिनिधी व विद्यार्थी प्रतिनिधी म्हणून नियुक्ती करण्यात आली. ही नियुक्ती गुणानुक्रमे करण्यात आली. यावेळी विद्यार्थी मंडळ प्रमुख प्रा. सुरेश खरात व प्रा. डॉ. स्कंधा खेडेकर उपस्थित होत्या.

विद्यार्थी प्रतिनिधी म्हणून तृतीय वर्ष कला वर्गातल विद्यार्थी श्री. कैलास उजाळ यांची नियुक्ती करण्यात आली तर विद्यार्थीनी प्रतिनिधी म्हणून कु. रिया वैद्य हिची नियुक्ती करण्यात आली.

विद्यार्थी मंडळ २०२५-२६ यादी

1)	F. Y. B. A.	–	श्री. वाघमारे सौरभ
2)	F. Y. B. Com.	–	कु. काझी इकरा
3)	F. Y. B. Sc. IT	–	कु. जुवारी अशाना
4)	F. Y. BMS.	–	कु. शेख याना
5)	S. Y. B. A.	–	कु. नाखवा झीक्रा
6)	S. Y. B. Com.	–	श्री. रखांगे अदनान
7)	S. Y. BMS.	–	कु. मुन्शी हुडा
8)	S. Y. B. Sc. IT	–	कु. भाटकर फिजा
9)	T. Y. B. A.	–	श्री. उजाळ कैलास
10)	T. Y. B. Com.	–	कु. तळघरकर नौशीन
11)	T. Y. BMS.	–	कु. प्रभुळकर आफिफा
12)	T. Y. B. Sc. IT	–	कु. खादिजा फिरफिरे
	N. S. S.	–	श्री. कैलास उजाळ
	N. C. C.	–	कु. अमृता खैरे
	D. L. L. E.	–	श्री. ऋत्वीक यादव
	सांस्कृतिक विभाग	–	अभिजित खांडेकर, रिया वैद्य
	जिमखाना विभाग	–	रितेश खांबे

विद्यार्थी मंडळद्वारे शिशीर महोत्सवांतर्गत होणाऱ्या रांगोळी, पाककला स्पर्धा, विविध डेज, शेला पागोटे, सांस्कृतिक कला, वादन, गायन, नृत्य अशा विविध प्रकारामध्ये भाग नियोजनानही सहभाग घेतला. या शिवाय वार्षिक क्रीडा महोत्सव महाविद्यालयातील विविध उपक्रम यामध्ये सहभाग घेतला.

या विभागाला मा. प्राचार्य डॉ. भारत कऱ्हाड यांचे बहुमोल मार्गदर्शन मिळाले. या विभागाचे कामकाज विद्यार्थी मंडळ प्रमुख प्रा. सुरेश खरात व प्रा. स्कंधा खेडेकर यांनी पाहिले.

विद्यार्थी प्रतिनिधी प्रमुख
श्री. कैलास उजाळ

विद्यार्थी मंडळ प्रमुख
प्रा. सुरेश खरात
प्रा. स्कंधा खेडेकर

संगणक विभाग अहवाल २०२५-२६

B. Sc. IT Department

शैक्षणिक वर्ष २०५-२६ मध्ये B. Sc. IT विभागातर्फे विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

1) Cyber Security Awareness –

दि. ३० जुलै २०२५ रोजी आपल्या महाविद्यालयात Cyber Security या विषयावर मार्गदर्शन करण्यासाठी गोगटे

जोगळेकर महाविद्यालयाचे विद्यार्थी आले होते. त्यांनी मुलांना Cyber crime आणि Cyber Security या संदर्भात मार्गदर्शन केले.

2) Power-point Presentation –

मुलांचे Communication Skill वाढविण्यासाठी Power-point presentation हा उपक्रम राबविला. तसेच Technical communication skill या विषयावर मुलांचे प्रथम सत्रामध्ये Power-point Presentation घेण्यात आले. तरी या उपक्रमांत २० विद्यार्थ्यांचा समावेश होता. विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या विषयांवरती Power point Presentation दिले.

3) Career Guidance Program –

दि. २२ जानेवारी २०२६ रोजी GIT, खेड महाविद्यालयाचे प्राध्यापक मंगेश ठसाळे यांनी पदवी शिक्षणानंतर IT क्षेत्रात नवीन संधी उपलब्ध कशा होतील याचे मार्गदर्शन केले.

4) पदवीनंतर IT च्या विद्यार्थ्यांसाठी करिअरच्या संधी –

दि. २८ जानेवारी २०२६ रोजी Finolex महाविद्यालय, रत्नागिरी महाविद्यालयाचे प्राध्यापक श्री. किशोर भोसले यांनी करिअर मार्गदर्शन सेमिनार घेतला. या सेमिनार मध्ये MCA संदर्भातील माहिती, MCA नंतरच्या करिअर संधी तसेच MCA प्रवेश परीक्षेची पात्रता, अभ्यासक्रम, प्रवेश प्रक्रिया इ. बाबत मार्गदर्शन केले.

5) Career Guidance Program –

४ फेब्रुवारी २०२६ रोजी NCRD'S sterling institute of Management of Studies, नवी मुंबई या महाविद्यालयाचे प्राध्यापक श्री. इफ्तिखार मेस्त्री आणि श्री. मुरलीधर धनावडे यांनी MCA CET या विषयावर मार्गदर्शन केले. तसेच प्रवेश परीक्षा आणि मोफत CET मार्गदर्शन, करिअर नियोजन आणि प्रवेश प्रक्रिया या बाबत मार्गदर्शन केले.

6) AI Awareness Seminar –

दि. ६ फेब्रुवारी २०२६ रोजी स्कील लीट सोल्युशन या अकादमीचे श्री. प्रणव शिर्के सर यांनी Aetificial Intelligence (कृत्रिम बुद्धिमत्ता) या विषयावर मार्गदर्शन केले. दैनंदिन जीवनात AI चा वापर आपण कशाप्रकारे करत असतो. AI चे फायदे आणि तोटे कसे आहेत. याबाबत मार्गदर्शन केले.

1) Prof. Jueeli Balaram Shirke
2) Prof. Mayuri Sunil Vedak
3) Prof. Rutugandha Shashank Raykar
4) Prof. Sanket Dilip Chandavade
B. Sc. IT Department

जिमखाना अहवाल २०२५-२६

वरिष्ठ महाविद्यालय

महाविद्यालयाच्या जिमखाना विभागाची सुरुवात वर्ग प्रतिनिधीची निवड करण्यात आली. वर्गप्रतिनिधी खालीलप्रमाणे

1) रितेज रघुनाथ खांबे
2) सानिया भरत देवघरे

कोकण झोन व्हॉलीबॉल स्पर्धा –

दिनांक 16/10/2025 घराडा कॉलेज लवेल, खेड येथे कोकण झोन क्रीडा स्पर्धात व्हॉलीबॉल या क्रीडा प्रकारात महाविद्यालयाच्या संघाचा सहभाग घेतला यामधील सहभागी विद्यार्थ्यांची नावे.

1) आहद सरगुरो
2) अक्षय हरवडे
3) असदुला चिकडे
4) अयाना बांगी
5) इबाद तबीर
6) किराग चिमकोर
7) राज चोगले
8) सफॉन देसाई
9) असर मनियार
10) सुफियान फडणीस
11) तेजस खांबे

दिनांक 04/11/2025 रोजी जे. एन. पालीवाला कॉलेज, पाली, सुधागड या ठिकाणी कोकण झोन पावसाळी खो-खो क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आलेले होते. यामध्ये महाविद्यालयाच्या मुलांच्या संघाने तृतीय क्रमांक संपादन करुन त्यातील तीन खेळाडूची University च्या संघामध्ये निवड करण्यात आली होती. यामध्ये खालील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

1) अक्षय हरावडे
2) मयुर टेमकर
3) ओंकार मंडलिक
4) पासर साळवी
5) पार्थ कदम
6) राज चोरगे
7) रीतेज खांबे
8) रीतेज भुवड
9) सचिन गिजे
10) सरवेश खांबे
11) सुरज शिंदे

पॉवरलिफ्टिंग स्पर्धा दिनांक 27/2/2026 रोजी आर डी नॅशनल कॉलेज, मुंबई या ठिकाणी पॉवरलिफ्टिंग स्पर्धांचे आयोजन करण्यात आलेल होते यामध्ये सहभागी विद्यार्थी.

1) सानिया देवघरे
2) अपेक्षा पठाण
1) अनुराग जाधव
2) समिर सावंत

विद्यार्थी प्रतिनिधी
रितेज खांबे

प्रा. एस. टी. निंबाळकर
क्रिडा प्रशिक्षक सौ. पी. डी. सावंत

सांस्कृतिक विभाग अहवाल २०२५-२६

सांस्कृतिक विभाग हा महाविद्यालयातील अत्यंत महत्वपूर्ण विभाग आहे. या विभागातील कार्यक्रम, उपक्रम, स्पर्धामुळे विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळतो. विद्यार्थ्यांना व्यासपीठ मिळते. त्याच्याकडील सुप्त गुण त्याच्या वैयक्तिक विकासात महत्वाचे ठरतात. विद्यार्थ्यांना व्यस्त व्हायची संधी प्राप्त होते. यातून विद्यार्थी कार्यक्रम उपक्रमाचे स्वरुप समजावून घेतात, सहभाग नोंदवतात. सादरीकरणामुळे बोलणे, सूत्रसंचलन करणे, लिहिणे, पाठांतर करणे अभिनय करणे विविध कलांचे महत्व समजून घेणे, करियर शोधणे इ. गोष्टी घडतात.

चालू शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये सांस्कृतिक विभागाने उल्लेखनीय व अविस्मरणीय कामगिरी केली आहे. मुंबई विद्यापीठ स्तरावर सिल्व्हर मेडल प्राप्त करुन महाविद्यालय व संस्थेची वेगळी ओळख संपूर्ण विद्यापीठात निर्माण केली आहे.

मुंबई विद्यापीठाने ५८ वा सांस्कृतिक युवा महोत्सवाचे आयोजन करुन सांस्कृतिक स्पर्धाचे स्वरुप सांगितले याकरिता दि. ८/७/२०२५ रोजी युवा महोत्सव कार्यशाळषचे आयोजन करणेत आले. या कार्यशाळेत सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा.

उत्तम पाटील व विद्यार्थी रिया वैद्य यांनी सहभाग घेतला.

दि. ९/७/२०२५ रोजी गुरुपौर्णिमानिमित्त कार्यक्रमात प्रा. उत्तमराव पाटील यांचे गुरु व गुरुंचे महत्व या विषयावर व्याख्यान देणेकरिता प्रमुख अतिथी म्हणून सहभाग घेतला.

दि. २४/७/२०२५ रोजी शासन व विद्यापीठ आयोजित जाणीव जागृती कार्यशाळेत प्रा. उत्तमराव पाटील सहभागी झाले.

दि. २३/८/२०२५ रोजी सालाबादप्रमाणे महाविद्यालयात श्रावणधारा कार्यक्रमाचे आयोजन करणेत आले. कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी पोवाडा, गीते, नृत्य, नकला इ. विविध स्वरुपाचे कलाप्रकार सादर केले. या कार्यक्रमाला उदंड प्रतिसाद मिळाला.

दि. २४/८/२०२५ रोजी मुंबई विद्यापीठ आयोजित युवामहोत्सव खेड येथे ज्ञानदीप महाविद्यालय, खेड, जि. रत्नागिरी येथे हा युवा महोत्सव संपन्न झाला. या महोत्सवात महाविद्यालयाने १५ कला प्रकारात सहभाग घेतला. युवामहोत्सवाची ही प्राथमिक फेरी होती. त्यामध्ये वादविवाद स्पर्धा व मेहंदी स्पर्धा यामध्ये अनुक्रमे वादविवाद स्पर्धा मध्ये सनीम डबीर व आशीया चिकटे आणि मेहंदी स्पर्धेत कु. साजिदा चिकटे यांना द्वितीय क्रमांक प्राप्त झाला व मुंबई येथील अंतिम स्पर्धेकरिता निवड झाली.

दि. १६/९/२०२५ रोजी श्रुती साखरकर यांचे माझे वक्तृत्व अनुभव कथन या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करणेत आले. यामध्ये त्यांनी स्वत: वक्तृत्व स्पर्धेत प्रथम क्रमांक सुवर्ण पदक प्राप्त करणेपर्यंतची सर्व हकीकत सांगितली. या व्याख्यानास उत्तम प्रतिसाद मिळाला.

दि. १६/९/२०२५ रोजी NEP मध्ये सांस्कृतिक विषय निवडणाऱ्या विद्यार्थ्यांच्या सभेचे आयोजन करणेत आले. त्यांना सांस्कृतिक विभाग व विषयामध्ये करियरच्या कोणत्या संधी आहेत या बद्दलची माहिती देणेत आली.

दि. २३/९/२०२५ रोजी मुंबई विद्यापीठ आयोजित अंतिम युवा महोत्सव स्पर्धेत महाविद्यालयाची मानांकन प्राप्त विद्यार्थीनी कु. साजिदा चिकटे या विद्यार्थीनीस मुंबई विद्यापीठ सिल्हर पदक तिने प्राप्त केले. संस्था व महाविद्यालयाने या विद्यार्थीनीचा यथोचित सन्मान सत्कार केला वृत्तपत्राने याची दखल घेतली.

दि. २७/९/२०२५ रोजी मुंबई विद्यापीठाने वादविवाद स्पर्धा अंतिम स्पर्धांचे आयोजन करणेत आले. त्यामध्ये प्राथमिक फेरीत निवड झालेल्या सनीम डबीर व आशीया चिकटे या विद्यार्थांनी सहभाग घेतला. त्यांना प्रमाणपत्र प्राप्त झाले.

दि. २२ डिसेंबर २०२५ रोजी सालाबाद प्रमाणे महाविद्यालयात शिशिर युवा महोत्सवाचे आयोजन करणेत आले. त्यामध्ये ४५ विविध कलाप्रकारात विद्यार्थांनी सहभाग घेतला. हा उत्सव मनोरंजन करमणूक व प्रबोधन करण्याचा ठरला.

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये सांस्कृतिक विभागाने विविध कार्यक्रम उपक्रमाचे आयोजन केले. स्पर्धांमध्ये सहभाग नोंदवला.

या विभागाचे कामकाज प्रा. उत्तमराव पाटील पहातात.

विद्यार्थी प्रतिनिधी	सांस्कृतिक विभाग
कु. रीया वैद्य	प्रा. उत्तम पाटील

राष्ट्रीय सेवा योजना (*वरिष्ठ विभाग*)

२०२५-२०२६

1) **जागतिक पर्यावरण दिन :** दि. ५ जून २०२५ रोजी जागतिक पर्यावरण दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमाला संस्थेच्या संचालिका मा. श्रीमती जानकीताई बेलोसे या प्रमुख अतिथी म्हणून तर कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे मा. प्राचार्य डॉ. भारत कऱ्हाड सर उपस्थित होते. या कार्यक्रमातून महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना पर्यावरण संवर्धनाविषयी जाणीव व जनजागृतीची माहिती देण्यात आली. तसेच महाविद्यालयातील परिसरामध्ये विविध प्रकारच्या वृक्षांची लागवड करण्यात आली. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील ८० मुले व ४२ मुली असे एकूण १२२ स्वयंसेवक उपस्थित होते.

2) **आंतरराष्ट्रीय योग दिन :** दि. २१ जून २०२५ रोजी आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त योग प्रशिक्षण कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमात सौ. हर्षदा डोंगरे यांनी विद्यार्थ्यांना योगाचे प्रशिक्षण दिले. या कार्यक्रमासाठी ७० मुली व ५५ मुले असे एकूण १२५ विद्यार्थी उपस्थित होते.

3) **महाविद्यालय परिसर स्वच्छता :** दि. २२ जून २०२५ रोजी महाविद्यालय परिसर स्वच्छता मोहिम राबविण्यात आली. यामध्ये प्रामुख्याने महाविद्यालयासमोरील परिसर व पार्किंग परिसराची स्वच्छता करण्यात आली. तसेच विद्यार्थ्यांना स्वच्छतेचेमहत्व समजावून सांगण्यात आले. या उपक्रमासाठी ७२ मुली व ५० मुले असे एकूण १२२ विद्यार्थी उपस्थित होते.

4) **सामाजिक न्याय दिन :** दि. २६ जून २०२५ रोजी राजर्षी शाहू महाराज जयंतीनिमित्त महाविद्यालयात सामाजिक न्याय दिन साजरा करण्यात आला. या प्रसंगी राजर्षी शाहू महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. या कार्यक्रमासाठी २५ मुले व २५ मुली उपस्थित होत्या

5) **महाविद्यालय वर्धापन दिन :** दि. १ जुलै २०२५ रोजी महाविद्यालयाचा वर्धापन दिन साजरा करण्यात आला. यावेळी संस्थेचे पदाधिकारी उपस्थित होते. या कार्यक्रमासाठी ७० मुली व ८२ मुले उपस्थित होती.

6) **महिलांचे आरोग्य यावर मार्गदर्शन :** दि. २ जुलै २०२५ रोजी महिलांचे आरोग्य या विषयावर महाविद्यालयाच्या प्राध्यापिका डॉ. जयश्री रामदास गव्हाणे यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील ६२ मुली उपस्थित होत्या.

7) **कै. लोकनेते बाळासाहेब बेलोसे स्मृतीदिन :** दि. ६ जुलै २०२५ रोजी कै. लोकनेते बाळासाहेब बेलोसे यांच्या स्मृतीदिनानिमित्त महाविद्यालयामध्ये स्मृतिदिनाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमासाठी संस्थेचे अध्यक्ष धनंजयराव यादव, संस्थेच्या संचालिका सौ. जानकीताई बेलोसे, मा. प्राचार्य तसेच सेवानिवृत्त प्राध्यापक उपस्थित होते. या कार्यक्रमासाठी ५५ मुली व ४९ मुले उपस्थित होती.

8) **जागतिक लोकसंख्या दिन :** दि. ११ जुलै २०२५ रोजी जागतिक लोकसंख्या दिन साजरा करण्यात आला. दि. ११ जुलै २०२५ रोजी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत जागतिक लोकसंख्या दिन साजरा करण्यात

आला. या कार्यक्रमात एन. सी. सी. विभाग प्रमुख प्रा. सीताफुले यांनी लोकसंख्या वाढीविषयी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमासाठी ७० मुली व ४९ मुले उपस्थित होते.

9) **युवती प्रशिक्षण :** दि. १७ जुलै २०२५ रोजी महाविद्यालयामध्ये राजमाता जिजाऊ युवती प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात सौ. योगिता खाडे यांनी विद्यार्थिनींनी स्वसंरक्षणाचे प्रशिक्षण दिले. या कार्यक्रमासाठी ७३ मुले व ४८ मुली असे एकूण १२१ विद्यार्थी उपस्थित होते.

10) **रेड रिबन क्लबतर्फे मॅरेथॉन स्पर्धा :** दि. २६ जुलै २०२५ रोजी दापोली येथे रेड रिबन क्लबतर्फे मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या मॅरेथॉन स्पर्धेमध्ये महाविद्यालयातील ३८ मुली व ३५ मुले सहभागी झाले.

11) **वृक्षारोपण :** दि. ३१ जुलै २०२५ रोजी महाविद्यालयामध्ये सह्याद्री फाउंडेशन, जालगाव व वराडकर महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने वृक्षारोपण कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमात विविध प्रकारच्या आंब्याच्या रोपांची लागवड करण्यात आली. तसेच केळसकर नाका ते वराडकर महाविद्यालय अशी वृक्षदिंडी काढण्यात आली. या उपक्रमात ७० मुली व ५५ मुले उपस्थित होते.

12) **उद्योजकतेतून महिला सबलीकरण आणि स्त्री-पुरुष समानता व्याख्यान –** ०१ ऑगस्ट २०२५ रोजी महाविद्यालयात महिला सबलीकरण आणि स्त्री-पुरुष समानता या विषयावर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात सौ. निशा सावंत यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमात १९ मुले व ४८ मुली असे एकुण ६७ विद्यार्थी उपस्थित होते.

13) **दि. १७ ऑगस्ट २०२५ मॅरेथॉन स्पर्धा –** दि. १७ ऑगस्ट २०२५ रोजी दापोली येथे जेसीआय मार्फतमॅरेथॉन स्पर्धा आयोजित करण्यात आली. या मॅरेथॉन स्पर्धेमध्ये महाविद्यालयातील विद्यार्थी सहभागी झाले होते. त्यामध्ये प्रामुख्याने ३८ मुली व ४० मुले सहभागी होते.

14) **दि. १५ ऑगस्ट २०२५ – स्वातंत्र्य दिन ध्वजारोहण :** दि. १५ ऑगस्ट २०२५ रोजी महाविद्यालयामध्ये स्वातंत्र्यदिनानिमित्त ध्वजारोहण करण्यात आले.

15) **दि. २८ ऑगस्ट २०२५ – व्यसनमुक्ती व्याख्यान :** दि. २८ ऑगस्ट २०२५ रोजी महाविद्यालयामध्ये व्यसनमुक्ती या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले. हे व्याख्यान दापोली पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक महेश तोरस्कर सर यांनी दिले.त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले व व्यसनबंदीची शपथ दिली. या कार्यक्रमाला ५५ विद्यार्थी व ५७ विद्यार्थिनी सहभागी होते.

16) **दि. १९ सप्टेंबर २०२५ – रेड रिबन क्लब स्थापना :** दि. १९ सप्टेंबर २०२५ रोजी महाविद्यालयामध्ये रेड रिबन क्लबची स्थापना करण्यात आली. या कार्यक्रमासाठी ज्येष्ठ प्राध्यापक पैठणे सर उपस्थित होते. तसेज ४० मुली व ४५ मुले उपस्थित होते.

17) **दि. २३ सप्टेंबर २०२५ – परिसर स्वच्छता :** दि. २३ सप्टेंबर २०२५ रोजी महाविद्यालय परिसर स्वच्छता करण्यात आली. या उपक्रमासाठी ७३ मुली व ६० मुले उपस्थित होते.

18) **दि. २४ सप्टेंबर २०२५ ० राष्ट्रीय सेवा योजना दिवस :** दि. २४ सप्टेंबर २०२५ रोजी महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय सेवा योजना दिवस साजरा करण्यात आला. यानिमित्त सामाजिक जागृती या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले. हे व्याख्यान कॉमर्स विभागाच्या पीएच. डी. संशोधन केंद्राच्या विभागप्रमुख डॉ. जयश्री रामदास गव्हाणे यांनी दिले. या कार्यक्रमासाठी ७० मुली व ६० मुले उपस्थित होते.

19) **दि. २५ सप्टेंबर २०२५ – एक दिन एक घंटा :** दि. २५ सप्टेंबर २०२५ रोजी एक दिन एक घंटा या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना स्वच्छतेची शपथ देण्यात आली. या कार्यक्रमाला प्रा. ढवळे सर व पत्रकार राधेश लिंगायत उपस्थित होते.

20) **दि. ३० सप्टेंबर २०२५ – स्वच्छता ही सेवा :** दि. ३० सप्टेंबर २०२५ रोजी स्वच्छता ही सेवा या उपक्रमांतर्गत महाविद्यालयामध्ये पोस्टर स्पर्धा आयोजित करण्यात आली. या कार्यक्रमाचे उद्घाटन प्राचार्य डॉ. भारत कऱ्हाड यांनी केले.

21) **राष्ट्रपिता महात्मा गांधी जयंतीनिमित्त स्वच्छता अभियान :** दि. २६ सप्टेंबर २०२५ ते १ ऑक्टोबर २०२५ दरम्यान महात्मा गांधी जयंतीनिमित्त स्वच्छता अभियान राबविण्यात आले. दि. २६ सप्टेंबर २०२५ रोजी महाविद्यालय परिसर स्वच्छता करण्यात आली. यावेळी २० मुले व ३० मुली असे एकूण ५० विद्यार्थी उपस्थित होते. दि. २७ सप्टेंबर २०२५ रोजी पुन्हा परिसर स्वच्छता करण्यात आली. यामध्ये ३० मुले व ४० मुली असे एकूण ७० विद्यार्थी उपस्थित होते. दि. ३० सप्टेंबर २०२५ रोजी महाविद्यालय परिसर स्वच्छता करण्यात आली. तसेच एन. एस. एस. स्वयंसेवकांनी वृक्षारोपणासाठी खड्ड्यांचे खोदकाम केले. या उपक्रमात २४ मुले व ३६ मुली असे एकूण ६० विद्यार्थी उपस्थित होते.

22) दि. १ ऑक्टोबर २०२५ रोजी राष्ट्रपिता महात्मा गांधी जयंती व लाल बहादूर शास्त्री जयंतीच्या पूर्वतयारीसाठी एन. एस. एस. स्वयंसेवकांनी महाविद्यालय परिसर स्वच्छता केली. यावेळी ३२ मुले व २८ मुली असे एकूण ६० विद्यार्थी उपस्थित होते.

23) **दि. १ ऑक्टोबर २०२५ – ज्येष्ठ नागरिक दिन :** दि. १ ऑक्टोबर २०२५ रोजी महाविद्यालयामध्ये ज्येष्ठ नागरिकांचा सन्मान करण्यात आला. संस्थेचे सर्व पदाधिकारी तसेच संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. संजयजी चंदुकाका जगताप यांनी मार्गदर्शन केले. सर्व प्राध्यापक व कर्मचारी उपस्थित होते. या कार्यक्रमासाठी ४० मुली व ४५ मुले उपस्थित होते.

24) **दि. २ ऑक्टोबर २०२५ –** दि. २ ऑक्टोबर २०२५ रोजी राष्ट्रपिता महात्मा गांधी जयंती व लाल बहादूर शास्त्री जयंतीनिमित्त प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. या कार्यक्रमासाठी ३० मुले व ३५ मुली असे एकूण ६५ विद्यार्थी उपस्थित होते.

25) **दि. २८ ऑक्टोबर २०२५ – फिट इंडिया रनिंग :** दि. २८ ऑक्टोबर २०२५ रोजी फिट इंडिया मोमेंट अंतर्गत महाविद्यालयात फिट इंडिया रनिंग कार्यक्रम घेण्यात आला. यामध्ये ३ कि. मी. रनिंग घेण्यात आली. या उपक्रमात १८ मुले व १६ मुली असे एकूण ३४ विद्यार्थी सहभागी झाले.

26) **दि. १६ ऑक्टोबर २०२५ – प्लास्टिक संकलन :** दि. १६ ऑक्टोबर २०२५ रोजी महाविद्यालय व महाविद्यालयीन परिसरातील प्लास्टिक संकलन करण्यात आले. या उपक्रमात ४० मुले व ५० मुली असे एकूण ९० विद्यार्थी सहभागी झाले.

27) **दि. २५ ऑक्टोबर २०२५ – मतदान जनजागृती :** दि. २५ ऑक्टोबर २०२५ रोजी महाविद्यालयामध्ये मतदान जनजागृतीसाठी रॅली आयोजित करण्यात आली.

28) **दि. २७ ऑक्टोबर २०२५ – कॉलेज परिसर स्वच्छता :** दि. २७ ऑक्टोबर २०२५ रोजी महाविद्यालयाचा कॅन्टीन परिसर व पार्किंग परिसर स्वच्छ करण्यात आला.

29) **दि. ३१ ऑक्टोबर २०२५ – एकता दिवस शपथ :** दि. ३१ ऑक्टोबर २०२५ रोजी लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल जयंतीनिमित्त महाविद्यालयात एकता दिवस कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांना राष्ट्रीय एकतेची शपथ देण्यात आली. या कार्यक्रमासाठी ६५ मुले व ५९ मुली असे एकूण १२४ विद्यार्थी उपस्थित होते.

30) **दि. ७ नोव्हेंबर २०२५ –वंदे मातरम् सामूहिक गायन :** वंदे मातरम् गीताच्या १०५ व्या वर्धापन दिनानिमित्त महाविद्यालयामध्ये सर्व शिक्षक व विद्यार्थ्यांनी एकत्र येऊन वंदे मातरम् या गीताचे पावित्र्य राखत सामूहिक गायन केले.

31) **दि. १६ नोव्हेंबर २०२५ – कॉलेज परिसर स्वच्छता :** दि. १६ नोव्हेंबर २०२५ रोजी महाविद्यालयामध्ये कॉलेज परिसर स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.

32) **दि. २६ नोव्हेंबर २०२५ –** संविधान दिन : दि. २६ नोव्हेंबर २०२५ रोजी महाविद्यालयात संविधान दिन साजरा करण्यात आला. उपस्थित मान्यवर व विद्यार्थ्यांनी भारतीय संविधानाच्या प्रास्ताविकेचे वाचन केले. या कार्यक्रमासाठी ५५ मुले व ६६ मुली असे एकूण १२१ विद्यार्थी उपस्थित होते.

33) **दि. २ डिसेंबर २०२५ – एड्स जनजागृती रॅली :** दि. २ डिसेंबर २०२५ रोजी महाविद्यालयाच्या कॅम्प कालावधीत करंजाणी गावामध्ये एड्स जनजागृती रॅली काढण्यात आली.

34) **दि. ९ डिसेंबर २०२५ – एड्स पोस्टर्स स्पर्धा :** एड्स जनजागृती दिनानिमित्त दि. ९ डिसेंबर २०२५ रोजी महाविद्यालयामध्ये पोस्टर मेकिंग स्पर्धा आयोजित करण्यात आली.

35) **दि. १ जानेवारी २०२६ – सावित्रीबाई फुले जयंती :** दि. १ जानेवारी २०२६ रोजी महाविद्यालयात प्राचार्यांनी सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

36) **दि. १० जानेवारी २०२६ – निबंध व पोस्टर स्पर्धा :** दि. १० जानेवारी २०२६ रोजी विद्यार्थ्यांकडून निबंध व पोस्टर स्पर्धा घेण्यात आली.

37) **दि. १७ जानेवारी – कॉलेज परिसर स्वच्छता :** दि. १७ जानेवारी २०२६ रोजी महाविद्यालयाच्या ग्राउंड परिसराची स्वच्छता करण्यात आली.

38) **दि. २४ जानेवारी २०२५ – प्रजासत्ताक दिनानिमित्त परिसर स्वच्छता :** दि. २४ जानेवारी २०२६ रोजी २६

जानेवारीच्या पार्श्वभूमीवर महाविद्यालयामध्ये परिसर स्वच्छता राबविण्यात आली.

39) **दि. २५ जानेवारी २०२६ – राष्ट्रीय मतदान दिन :** दि. २५ जानेवारी २०२६ रोजी महाविद्यालयाचे प्राचार्य भारत कऱ्हाड यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रीय मतदान दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाला ५० विद्यार्थी व ६१ विद्यार्थिनी उपस्थित होते.

40) **दि. २६ जानेवार २०२६ – प्रजासत्ताक दिन :** दि. २६ जानेवारी २०२६ रोजी महाविद्यालयामध्ये प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला.

41) **दि. १९ फेब्रुवारी २०२५ – शिवजयंती :** दि. १९ फेब्रुवारी २०२६ रोजी महाविद्यालयामध्ये शिवजयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी
प्रा. डॉ. स्कंधा स्वप्नील खेडेकर
प्रा. जनार्धन महादेव गिरमकर

राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक
फैमिदा राजपुरकर कैलास उजाळ
भाग्यवती पावसे आदित्य खांडेकर

एन. सी. सी. विभाग २०२५-२६

राष्ट्रीय छात्र सेना (एन. सी. सी.) विभागात एकूण ५० कॅडेट आहेत. त्यापैकी ३० मुले, २० मुली कार्यरत आहेत. या शैक्षणिक वर्षात एनसीसी प्रथम वर्षामधील कॅडेटची निवड १२ ऑगस्ट २०२५ रोजी १९ महाराष्ट्र बटालियन एनसीसी कराड यांच्याकडून करण्यात आले होते. ह्या वर्षी १६ मुले व ९ मुली अशी एकूण २५ NCC कॅडेटची निवड करण्यात आली आहे. यावर्षी सीनियर अंडर ऑफिसर म्हणून कुमारी अमृता अनेश खैरे तर ज्युनिअर अंडर ऑफिसर म्हणून सागर दिलीप मर्चंडे यांची निवड करण्यात आले आहे. एनसीसी युनिटचे कॉटर मास्टर म्हणून रोहन संतोष घाग तर बी.एच. एम. म्हणून कुमारी चारुता चंद्रकांत भुवड या कॅडेटची निवड करण्यात आले होते.

* या शैक्षणिक वर्षातील प्रथम कॅम्प ७ मे २०२५ ते १६ मे २०२५ या कालावधीमध्ये CATC कॅम्प कुंडल, तालुका पलूस, जि. सांगली येथे झाला होता. या NCC CATC कॅम्प करिता ५ मुली व ३ मुले यांची निवड करण्यात आले होते.
* दिनांक २१ मे २०२५ ते ३० मे २०२५ या कालावधीमध्ये यशवंतराव चव्हाण कॉलेज, कराड, जि. सातारा येथे CATC कॅम्प आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये ५ मुले व ४ मुलींची निवड झाली होती. तर याच कॅम्पमध्ये सागर दिलीप मर्चंडे याची थलसेना त्याच्या प्राथमिक फेरी करिता निवड झाली होती.
* महाविद्यालयाच्या वर्धापन दिनानिमित्त एन. सी. सी. कॅडेट कडून कॉलेजच्या परिसरात वृक्ष लागवडीचे आयोजन करण्यात आले होते.
* १३ ऑगस्ट २०२५ रोजी एनसीसी कॅडेट आणि पंचायत समिती तसेच तहसिल कार्यालय यांच्या संयुक्त वतीने **हर घर**

तिरंगा रॅली काढण्यात आले होते. त्यामध्ये एनसीसी कॅडेटचा सहभाग होता.

* १७ ऑगस्ट २०२५ रोजी डॉक्टर बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली येथील परिसर **फिट इंडिया सायकलिंग ड्रायव्हिंग** या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते, यामध्ये एनसीसी कॅडेटचा सहभाग होता.
* २५ ऑगस्ट २०२५ ते ३ सप्टेंबर २०२५ या कालावधीतमध्ये **१६ जाट रेजिर्मेंट** आयोजित आर्मी अर्टचमेंट कॅम्प, पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. या कॅम्पमध्ये वरद घाग आणि गणेश वसावे या दोन कॅडेटची निवड झाली होती.
* १८ नोव्हेंबर २०२५ ते २९ नोव्हेंबर २०२५ या कालावधीमध्ये **१५ मराठा रेजिमेंट** पुणे येथे आर्मी अटॅचमेंट कॅम्प करिता हर्ष लिंगावळे आणि रोहन घाग या कॅडेटची निवड झाली होती.
* २४ सप्टेंबर २०२५ या दिवशी **जागतिक नदी दिनानिमित्त** हमारी नदिया हमारी जिम्मेदारी या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. एकूण ४१ विद्यार्थी या कार्यक्रमाला उपस्थित होते.
* ९ ऑक्टोबर २०२५ या दिवशी **भारतीय सैन्य दिन** एनसीसी विभागाकडून याचे आयोजन करण्यात आले होते. **भारतात झालेले युद्ध** या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.
* ३० ऑक्टोबर २०२५ ते ८ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत झालेल्या **लीडरशिप टीम उभारणी** या राष्ट्रीय कॅम्पकरिता **ओमकार मंगेश मंडलिक** याची **उत्तराखंड उत्तरकाशी** येथे निवड झाली होती.
* २३ नोव्हेंबर २०२५ रोजी महाविद्यालयात **एनसीसी दिन** साजरा करण्यात आला होता. त्याच दिवशी एनसीसी कॅडेटला रँक वितरणाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.
* १८ डिसेंबर २०२५ ते २७ डिसेंबर २०२५ या कालावधीमध्ये १९ महाराष्ट्र बटालियन एनसीसी कराड कडून डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली येथे कॅम्पचे आयोजन करण्यात आले होते. त्या कॅम्पमध्ये NDRF चे प्रशिक्षण एनसीसी कॅडेटना देण्यात आले होते. या कॅम्प करिता एकूण ३० कॅडेट सहभागी झाले होते. त्यापैकी ११ मुली व १९ मुले यांचा सहभाग होता.
* २४ नोव्हेंबर २०२५ ते ३ डिसेंबर या कालावधीमध्ये गजापूर, जिल्हा कोल्हापूर येथे ATC कॅम्पमध्ये कॅडेटनी सहभाग घेतला होता.
* २६ नोव्हेंबर २०२५ रोजी **भारतीय संविधान दिनाच्या** कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून श्री. समाधान पैठने सर उपस्थित होते. तर संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन कुमारी अमृता खैरे सिनिअर अन्डर ऑफिसर हिने केले होते.
* १ डिसेंबर २०२५ रोजी **जागतिक एड्स दिनाच्या** कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयामध्ये एनसीसी विभागाकडून करण्यात आले होते.
* ८ डिसेंबर २०२५ ते १९ डिसेंबर २०२५ या कालावधीमध्ये **एक भारत श्रेष्ठ भारत (EBSB)** या राष्ट्रीय कॅम्प करिता सागर दिलीप मर्चंडे यांची निवड झाली होती.
* २६ जानेवारी २०२६ रोजी प्रजासत्ताक दिनानिमित्त एनसीसी कॅडेट कडून संचलन करण्यात आले. शासकीय ध्वजारोहणाकरिता दापोलीतील आझाद मैदानात एनसीसी कॅडेट उपस्थित होते.
* २६ जानेवारी २०२६ रोजी दापोली पंचायत समिती, दापोली येथे प्रजासत्ताक दिनाकरिता एनसीसीचे तीन कॅडेट उपस्थित होते.

* राष्ट्रीय छात्र सेना (एनसीसी) विभागाकडून महाविद्यालयातील परिसराची स्वच्छता करण्यात आली होती.
* ३ जानेवारी २०२६ रोजी **क्रांतीजोती सावित्रीबाई फुले** यांची जयंती महाविद्यालयात साजरी करण्यात आली.
* ११ जानेवारी २०२६ रोजी एनसीसी कॅडेटची ट्रेकिंग सहल रायगड येथे पेण्यात आली होती. या ट्रेकिंग सहली करिता एकूण २९ एनसीसी कॅडेटनी सहभाग घेतला.
* २० जानेवारी २०२६ रोजी एनसीसी विभागात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या एनसीसी कॅडेटचे सत्कार करण्यात आले हाते. एनसीसीचा कॅडेट **साईराज इंदुलकर** यांची भारतीय सैन्यात निवड झाल्याबद्दल त्याचा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता. **अमृता खैरे** या कॅडेटची थलसेना (TSC) कॅम्प दिल्ली करिता निवड झाली. **ओमकार मंडलिक** याची राष्ट्रीय कॅम्प करिता तर **सागर मर्चंडे** राष्ट्रीय कॅम्पकरिता निवड झाल्याबद्दल त्यांचा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता. या एनसीसी युनिटचे उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल बेस्ट कॅडेट म्हणून चारुता चंद्रकांत भुवड आणि रोहन संतोष घाग यांना गौरविण्यात आले. या एनसीसी युनिटचे सीनिअर अंडर ऑफिसर म्हणून जबाबदारी कुमारी अमृता अनिश खैरे तर ज्युनिअर अंडर ऑफिसर म्हणून सागर दिलीप मर्चंडे यांनी पाहिले.

कु. अमृता अनेश खैरे
सीनिअर अंडर ऑफिसर

लेफ्टनंट सिताफुले एल. एस.
कंपनी कमांडर

आजीवन अध्ययन आणि विस्तार विभाग वार्षिक अहवाल २०२५-२६

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ या वर्षामध्ये आजीवन अध्ययन व विस्तार विभागामध्ये एकूण ६० विद्यार्थी सहभागी झाले. त्यामध्ये ४५ विद्यार्थींनी व १५ विद्यार्थी होते.

या विभागातंर्गत वर्षभरामध्ये विविध उपक्रम राबविण्यात आले.

या सर्व विद्यार्थ्यांनी विभागाद्वारे SWS आणि IOP हे दोन प्रकल्प देण्यात आले या प्रकल्पांतर्गत आपला कामकाजाचा अहवाल तयार करणे, ग्रामीण भागातील स्थितीचे सर्वेक्षण करणे, पथनाट्य, लोकगीत, निबंध स्पर्धा असे जनजागृतीपर उपक्रम राबविण्यात आले. व प्रथम सत्र प्रशिक्षणाचे विद्यापीठ विभागाद्वारे संगमेश्वर येथे आयोजन करण्यात आले. या प्रशिक्षण कार्यक्रमाला विभागाचे प्रमुख प्रा. सुरेश खरात व विद्यार्थी प्रतिनिधी श्री. ऋत्वीक यादव, तृतीय वर्ष कला हे उपस्थित होते.

विभागातील विद्यार्थ्यांसाठी महाविद्यालयामध्ये सप्टेंबर महिन्यामध्ये जिल्हा समन्वय प्रा. गंगा गोरे मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षण कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमाला सहभागी विद्यार्थी, प्रा. सुरेश खरात, प्रा. कांबळे सर उपस्थित होते.

द्वितीय सत्रामध्ये विद्यापीठाद्वारे कला व वाणिज्य महाविद्यालय, सावर्डे येथे द्वितीय सत्र शिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रशिक्षणाला विभागाचे प्रा. सुरेश खरात व विद्यार्थी प्रतिनिधी श्री. ऋत्वीक यादव हे उपस्थित होते. या कार्यक्रमामध्ये विभाग प्रमुख कुणाल जाधव यांनी मार्गदर्शन केले.

डिसेंबर महिन्यामध्ये सहभागी विद्यार्थ्यांसाठी जिल्हा समन्वयक प्रा. गंगा गोरे मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षण

कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाला विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या शैक्षणिक वर्षामध्ये सहभागी विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाच्या व विभागाच्या विविध उपक्रमात सहभाग घेतला.

या विभागाचे कामकाज प्रा. सुरेश खरात व प्रा. कांबळे सर यांनी पाहिले तर विद्यार्थी प्रतिनिधी म्हणून श्री. ऋत्वीक यादव, तृतीय वर्ष कला यांनी कामकाज पाहिले.

ऋत्वीक यादव	विभाग प्रतिनिधी
विद्यार्थी व्यवस्थापक	प्रा. सुरेश खरात
तृतीय वर्ष कला	प्रा. कांबळे सर

स्व. बाळासाहेब बेलोसे स्पर्धा परीक्षा आणि मार्गदर्शन केंद्र

या विभागाअंतर्गत महाविद्यालयामध्ये विविध स्पर्धा परीक्षेचे मार्गदर्शन करण्यात येते. जुलै महिन्यामध्ये स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र या विभागामध्ये वर्गनिहाय नाव नोंदणीचे उपक्रम राबविण्यात आले होते. या विभागाअंतर्गत विविध स्पर्धा परीक्षा बाबतची माहिती देण्यात आली होती. सर्वप्रथम मराठी व्याकरण याचे मूलभूत माहिती देण्यात आली होती. या विभागाअंतर्गत स्पर्धा परीक्षेची पूर्व तयारी कशा पद्धतीने करावी सामाजिक शास्त्रे, विज्ञान, गणित, बुद्धिमत्ता, अंकगणित आणि जनरल नॉलेज याबाबतची तयारी कशा पद्धतीने करावी याची माहिती वेगवेगळ्या उपक्रमाच्या माध्यमातून देण्यात आली होती.

भारतीय टपाल सेवा, भारतीय सैन्यदलातील संधी, बँकिंग, तलाठी भरती, ग्रामसेवक भरती, राज्य लोकसेवा आयोग, केंद्रीय लोकसेवा आयोग यांच्या मार्फत आयोजित केल्या जाणाऱ्या परीक्षा आणि त्यांची तयारी कशी करावी या बाबतची संपूर्ण माहिती देण्यासाठी उपक्रमाचे आयोजन स्पर्धा परीक्षा आणि मार्गदर्शन केंद्र विभागाकडून करण्यात आले होते.

ग्रंथालय विभाग अहवाल-२०२५-२६

महाविद्यालयाला ५२ वर्ष पूर्ण झाली आहेत. महाविद्यालयाने नुकतेच पार केलेले पन्नासावे वर्ष हे केवळ सुवर्णवर्ष नाही तर महाविद्यालयाच्या सर्वांगीण कामाचा व गौरवाचा इतिहास आहे. या सुवर्ण वर्षाचा साक्षीदार होण्याचे व हा सुवर्ण इतिहास महाविद्यालयाच्या मंदार वार्षिक अंकाच्या माध्यमातून जतन करण्याचे भाग्य ग्रंथपाल या नात्याने मला लाभले याचा मला अभिमानअसून हे मी माझे भाग्य समजतो. ज्ञानप्राप्तीच्या अनेक साधनात ग्रंथ महत्वाचे साधन आहे. मनुष्याचे विचार वाचनाने व अनुभवाने पक्के होतात. विद्यार्थ्यांची सर्वांगीण प्रगती ही ग्रंथालयाच्या माध्यमातून होत असते. महाविद्यालयाच्या स्थापनेपासूनच महाविद्यालयात ग्रंथालय सुरु आहे.

महाविद्यालयाच्या ग्रंथालय प्रगतीवर दृष्टीक्षेप टाकला असता महाविद्यालयाच्या पहिल्या वर्षातील ८९६ ग्रंथसंख्या आज २०२५-२६ अखेर **एकूण ग्रंथसंख्या ३६१६८** एवढी असून यापैकी **वरिष्ठ महाविद्यालय ग्रंथसंख्या ३१३२७** व कनिष्ठ महाविद्यालय ग्रंथसंख्या ४८४१ एवढी आहे. ग्रंथालयात विद्यार्थ्यांच्या वाचनाची आवड व मागणी लक्षात घेऊन मराठी, हिंदी, इंग्रजी भाषेची संदर्भ पुस्तके, स्पर्धा परीक्षा पुस्तके, क्रमिक अभ्यासक्रमाची पुस्तके याशिवाय कथा, कादंबरी,

कविता, नाटक, चरित्र-आत्मचरित्र इत्यादी विषयांची वाचनीय पुस्तके दरवर्षी ग्रंथालयात खरेदी केली जातात. ग्रंथालयामध्ये सर्व ग्रंथांचे वर्गीकरण करुन विषयवार मांडणी करण्यात आली आहे.

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ या वर्षात ग्रंथालयात वरिष्ठ महाविद्यालयासाठी ९९१ नवीन ग्रंथ खरेदी करण्यात आले. ई-ग्रंथालय सॉफ्टवेअरद्वारे ग्रंथालय संगणकीकरणाचे काम पूर्ण झाले असून वरिष्ठ महाविद्यालयाच्या सर्व **३१३२७** पुस्तकांच्या नोंदी संगणकीकृत करुन पूर्ण करण्यात आल्या आहेत. तसेच ग्रंथ परिगणन, वृत्तपत्र कात्रणे क्लिपिंग व ग्रंथांचे बारकोडिंगचे कामही अंतिम टप्प्यात आहे. आपल्या ग्रंथालयात विविध विषयांशी निगडीत २० नियतकालिके व १० वृत्तपत्रे नियमित येतात. शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये विद्यार्थ्यांसाठी ग्रंथालयामार्फत विविध वाचन उद्बोधन कार्यक्रम राबविण्यात आले. वर्षाच्या सुरुवातीलाच प्रथम वर्षाला प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना ग्रंथालयाचा वापर, उपयोग व उपलब्ध सुविधा आणि साहित्य याविषयी माहिती देण्यात आली. महाविद्यालयाचे ग्रंथपाल श्री. तेजस रेवाळे यांनी ई बुक, ई जर्नल्स सुविधांबाबत मार्गदर्शन केले. आजपर्यंत ३५० विद्यार्थ्यांनी एन लिस्ट सॉफ्टवेअरला नोंदणी करुन ऑनलाईन ई बुक, ई जर्नल्स चा लाभ घेत आहेत. विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी व विद्यार्थी वाचते व्हावेत या करिता **'विद्यार्थी वाचक पुरस्कार'** सुरु करण्यात आला आहे. २०२५-२६ चा हा बहुमान गणेश रायका वसावे, टी.वाय.बी.ए. या विद्यार्थ्याला मिळाला आहे.

ग्रंथालयात उपलब्ध असलेल्या वाचन साहित्याचा तपशील :

अ.क्र.	विवरण	मागणी वर्षातील ग्रंथ संख्या	चालू वर्षातील वाढ	एकूण
१	वरिष्ठ विभाग	३०३७६	९९१	३११३२७
२	कनिष्ठ विभाग	४७७०	७१	४८४१
३	नियतकालिके	२०	–	२०
४	ई-बुक्स	३१६४३०९+	–	३१६४३०९+
५	ई-जर्नल्स	६१५०+	–	६१५०+
६	प्रबंध/थेसिस	०५	०१	०६
७	नियतकालिकांचे बांधीव खंड	११०	–	११०
८	CD/DVD	१०	–	१०

महाविद्यालय ग्रंथालय समिती

अ.क्र.	ग्रंथालय समिती सदस्य	पद
१	प्राचार्य डॉ. भारत डी. कऱ्हाड	अध्यक्ष
२	प्रा. तेजस एस. रेवाळे	सचिव
३	प्रा. सिद्राया एस. शिंदे	सदस्य
४	प्रा. जयश्री आर. गव्हाणे	सदस्य
५	श्री. संजय पी. बामणे	सदस्य



ग्रंथालय विभागामार्फत राबविलेले उपक्रम : (वर्ष २०२५-२६)

१) १२ ऑगस्ट २०२५ रोजी डॉ. एस. आर. रंगनाथान जयंती व ग्रंथपाल दिनाचे ग्रंथालयात आयोजित करण्यात आले.

२) १२ ऑगस्ट २०२५ रोजी **'डॉ. एस. आर. रंगनाथान जयंती'** व १५ ऑगस्ट २०२५ भारतीय **'स्वातंत्र्य'** दिनानिमित्त **'निबंध'** स्पर्धेचे आयोजन.
प्रथम क्रमांक - झीक्रा झुबेर नाकवा (SYBA), द्वितीय - ऋषिकेश महेश लोहार (FYBCom),
तृतीय - साबेरा मु. अनस कांबळे (11 Sci.).

३) १५ ऑक्टोबर २०२५ **भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम** यांच्या जयंतीनिमित्त ऑनलाईन अभिवाचन स्पर्धा घेण्यात आली.

४) शासनाच्या उच्च तंत्र शिक्षण व मराठी भाषा संचालनालयाच्या परिपत्रकाप्रमाणे १५ ते ३० जानेवारी २०२६ या कालावधीत **'मराठी भाषा पंधरवडा'** या उपक्रमाअंतर्गत **'ग्रंथ प्रदर्शन'** आयोजन करण्यात आले.

यावर्षी विशेष उल्लेखनीय बाब म्हणून नमूद करताना आनंद होतो की, संस्थेच्या **संचालिका मा. सुनिताताई बेलोसे** यांनी आपल्याकडील बहुमुल्य १०० विविध विषयांचे संदर्भ ग्रंथ साहित्य महाविद्यालयास भेट देऊन महाविद्यालयाचे ग्रंथालय समृद्ध केले आहे. अशा सर्व ग्रंथ दात्यांचे आम्ही ऋणी आहोत.

विद्यार्थ्यांची सर्वांगीण प्रगती ग्रंथालयाच्या माध्यमातून होत असते. सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक प्रगतीचा मानदंड म्हणजे ग्रंथालय. महाविद्यालयीन तरुणाईला पदवीबरोबरच सामाजिक समस्यांचे भान रहावे. विद्यार्थी ग्रंथालयभिमुख व्हावा यासाठी महाविद्यालय व ग्रंथालय विविध उपक्रम आयोजित करीत असते. ग्रंथालयाची प्रगती व सुधारणा वाचकांच्या सहकार्यावरच अवलंबून असतात. ग्रंथालयामार्फत शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ चे कामकाज ग्रंथालय समितीचे सर्व सदस्य, ग्रंथपाल, ग्रंथालय सहाय्यक श्री. सुमित क़दम यांच्या सहकार्याने काम उत्तमरित्या सुरु आहे.

धन्यवाद !

ग्रंथपाल
प्रा. तेजस रेवाळे

Ph. D. Reasearch Centre (Department of Commerce) - Annual Report 2025-26

Courses Offered :
Business Policy & Administration

1) RAC Meeting for Six-Month Progress Review
Date : 3 July 2025
A Research Advisory Committee (RAC) meeting was successfully conducted to review the six-month reasearch progress.
The committee evaluated the work completed, provided academic guidance, and offered constructive suggestions for further improvement of the research work.

2) LIC Visit for Ph. d. Intake and Proposal Sanction

Date : 24 July 2025

A Local Inquiry Committee (LIC) visit was conducted for :

Intake allotment for Ph. D. admissions.

Sanction and review of new Ph. D. research proposals in Accountancy.

New research proposals in Accountyancy and Commerce were reviewed during the LIC visit and subsequently submitted to the University of Mumbai for approval.

Committee Members :

Dr. Subhash Khot

Dr. Suvarna Deuskar

Dr. Yasmeen Shekh

3) Library Visits and Literature Review

Period : September 2025

Extensive library visits were undertaken for :

In-depth literature review.

Identification of research gaps.

Development of thesis structure and framework.

Relevant national and international journals, books, theses, and online databases were referred to strengthen the theoretical foundation of the research.

4) Seminar Presentation Practice

Period : December 2025

Internal mock seminar presentation sessions were organized to prepare for participation in National and International seminars.

Emphasis was given to presentation skills, research communication, and handing academic queries effectively.

5) Submission of Draft Research Paper

Period : January 2026

A draft of the research paper based on the ongoing research work was prepared and submitted. The draft incorporated empirical analysis and conceptual insights aligned with the research objectives.

6) RAC Meeting and Submission of Final Synopsis

Period : 9 January 2026

A RAC meeting was conducted to review the six-month progress.

Based on the recommendations of the RAC, the final synopsis was prepared and submitted to the University of Mumbai for approval.

Dr. Bharat Karhad
Dr. Suresh Nimbalkar
Dr. Jaishri Gavhane

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

अभ्यासकेंद्र (7302 A) सन 2025-26

'ज्ञानगंगा घरोघरी' हे ब्रीद वाक्य सार्थ करणारे यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ महाराष्ट्राच्या शहरी व ग्रामीण भागामध्ये खेडोपाडी पोहोचले आहे. शिक्षणापासून वंचित असणाऱ्या आणि नियमित शिक्षण घेऊ न शकणाऱ्या विद्यार्थ्यांना शिक्षण उपलब्ध करुन देणारे एकमेव विद्यापीठ म्हणजे मुक्त विद्यापीठ होय. या विद्यापीठाच्या स्थापनेपासून दापोली हे अभ्यासक्रेंद्र आमच्या महाविद्यालयात सुरु आहे. रत्नागिरी जिल्ह्यातील सर्वांत जुने अभ्यासकेंद्र असल्यामुळे जिल्ह्यातून अनेक विद्यार्थी या अभ्यासकेंद्रामध्ये बी. ए. आणि बी. कॉम. अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेण्यासाठी उत्सुक होते. पण आज शैक्षणिक क्षेत्रात प्रचंड बदल होत आहेत. नवीन शैक्षणिक धोरणामुळे कौशल्य विकासाला प्राधान्य दिले जात आहे. अशावेळी पदवी शिक्षणांचे आकर्षण विद्यार्थ्यामध्ये कमी होत आहे. व्यावसाईक शिक्षणाकडे विद्यार्थ्यांचे आकर्षण वाढत आहे.

*** रेड रिबन मॅरेथॉन स्पर्धा –**

जिल्हा शासकीय रुग्णालय, रत्नागिरी अंतर्गत जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण पथक रत्नागिरी कार्यालय आणि उपजिल्हा रुग्णालय, दापोली यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय युवा दिनानिमित्त दापोली येथे दिनांक 26 जुलै 2025 रोजी एड्सविषयक जनजागृतीसाठी रेड रिबन मॅरेथॉन स्पर्धेत अभ्यासकेंद्रातील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. यामध्ये कुमारी दिक्षा कडू हिने द्वितीय क्रमांक प्राप्त केला आणि राज्यस्तरीय विभागीय स्तरावरील मॅरेथॉन स्पर्धेत निवड झाली.

*** उद्बोधन सत्र (इंडक्शन प्रोग्राम) –**

अभ्यासकेंद्रामार्फत रविवार दिनांक 21/09/2025 रोजी उद्बोधन सत्राचे (इंडक्ट प्रोग्राम) आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात अभ्यासकेंद्रात प्रवेश घेतलेल्या सर्व विद्यार्थ्यांचे स्वागत करणे. समंत्रकाचा परिचय करुन देणे, अभ्यासकेंद्राचे कामकाज कसे चालते, याविषयी माहिती देणे, संपर्क सत्राचे वेळापत्रक, परिक्षेविषयी माहिती, विद्यापीठाकडून प्राप्त होणाऱ्या पुस्तकाचे आणि गुणपत्रकाचे विवरण करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य आणि अभ्यासकेंद्र प्रमुख डॉ. भारत कऱ्हाड हे होते. या कार्यक्रमास सर्व समंत्रक उपस्थित होते.

अभ्यासकेंद्रात समंत्रक म्हणून डॉ. बाळासाहेब गुंजाळ, प्रा. उत्तम पाटील, प्रा. दिपक गडकर, प्रा. सुरेश खरात, डॉ. गणेश मांगडे, प्रा. मालदेव कांबळे, श्री. एफ. के. मगदूम, प्रा. मिथून येलवे, प्रा. प्रितेश जोशी, प्रा. डी. व्ही. होडबे, प्रा. आनंद दुधाळ, प्रा. सौ. समृद्धी खताते आणि प्रा. सौ. मालवी मोरे हे आहेत.

या अभ्यासकेंद्राचे कामकाज सुरळीत चालण्यासाठी संस्थेचे मा. चेअरमन, मा. सचिव, संस्था पदाधिकारी, आणि महाविद्यालयाचे प्राचार्य यांचे उत्तम सहकार्य लाभले.

अभ्यासकेंद्र प्रमुख म्हणून मा. प्राचार्य भारत कऱ्हाड, केंद्र संयोजक श्री. लक्ष्मीकांत पाटील, केंद्र सहाय्यक श्री. वैभव कुडवाळकर, तांत्रिक सहाय्यक श्री. मनोहर मोरे आणि मदतनीस श्री. संकेत घुलप हे काम पाहतात.

केंद्र संयोजक
अभ्यासकेंद्र (7302 A)

जिमखाना अहवाल २०२५-२६

कनिष्ठ महाविद्यालय

कनिष्ठ विभागाच्या जिमखाना विभागाची सुरुवात गुणवत्तेनुसार वर्ग प्रतिनिधीची निवड करण्यात आली. वर्गप्रतिनिधी खालीलप्रमाणे –

११ कला	निशीका हेमंत डोर्लेकर
११ वाणिज्य 'अ'	जांभळे वैष्णवी अजित कुमार
११ वाणिज्य 'ब'	खांबे प्रथम संतोष
११ विज्ञान	सागवेकर कार्तिकी
१२ कला	आगरकर श्रीराम विजय
१२ वाणिज्य 'अ'	साखरकर महेर बशिर
१२ वाणिज्य 'ब'	पवार साहिल सुनिल
१२ विज्ञान	मुकादम अल्पीया अल्ताफ

तालुकास्तरीय क्रीडा -

दिनांक 26/08/2025 रोजी ए. जी. हायस्कूल येथे तालुकास्तरीय पावसाळी क्रीडा स्पर्धात बुद्धीबळ या क्रीडा प्रकारात महाविद्यालयाच्या संघाने सहभाग घेतला.

दिनांक 29/08/2025 रोजी आझाद मैदान, दापोली येथे बॅडमिंटन हॉल मध्ये 19 वर्षीय मुलांनी बॅडमिंटन या क्रीडा प्रकारात सहभाग नोंदविला.

दिनांक 10 सप्टेंबर 2025 रोजी आर. जी. पवार माध्यमिक विद्यालय, माटवण या ठिकाणी तालुकास्तरीय पावसाळी खो-खो क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आलेले होते. यामध्ये महाविद्यालयाच्या 19 वर्षीय मुलांच्या संघाने प्रथम क्रमांक संपादन करुन डेरवण येथे होणाऱ्या जिल्हास्तरीय स्पर्धासाठी निवड करण्यात आली. यामध्ये खालील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

1) आदित्य मंगेश महाडीक
2) विवेक पडयाळ
3) ओकार वारे
4) सोहम बाईत
5) श्रेयस भांबीड
6) पवन पवार
7) निखिल शिगवण
8) दर्शन वाडकर
9) तन्मय घडवले
10) आर्यन नाचरे
11) युवराज पडयाळ
12) राज शिगवण

दिनांक 20 ऑक्टोबर 2025 रोजी जिल्हास्तरीय पावसाळी क्रीडा स्पर्धांचे आयोजन डेरवण या ठिकाणी खो-खो क्रीडा प्रकारच्या स्पर्धा संपन्न झाल्या. यामध्ये महाविद्यालयाच्या 19 वर्षाखालील मुली व मुलांच्या संघाने सहभाग घेतला यामध्ये मुलांच्या संघाने तृतीय क्रमांक संपादन करुन महाविद्यालयामध्ये यशाची परंपरा कायम ठेवली. यातील सहभागी खेळाडू –

1) आदित्य महाडीक
2) विवेक पडयाळ
3) सोहम बाईत
4) ओकार बाईत
5) पवन पवार
6) श्रेयस भांबीड
7) निखिल शिगवण
8) दर्शन वाडकर
9) तन्मय घडवले
10) आर्यन नाचरे
11) राज शिगवण
12) युवराज पडयाळ

दिनांक 10 सप्टेंबर 2025 रोजी तालुकास्तरीय कबड्डी पावसाळी स्पर्धांचे गावतळे हायस्कूल या ठिकाणी आयोजन

करण्यात आले होते. यामध्ये महाविद्यालयाचा 19 वर्षा खालील मुलांच्या संघाने सहभाग नोंदविला सहभागी सर्व खेळाडूंची यादी.

1) हर्ष भोसले
2) अथर्व मांडवकर
3) आर्य शेवडे
4) ओंकार कदम
5) गुरुराज साळवी
6) नील जाधव
7) यश घाग
8) वेदात पवार
9) शुभम पावसे
10) सार्थक शिगवण
11) साहिल काष्टे
12) अथर्व हरावडे

दिनांक11 सप्टेंबर 2025 रोजी तालुकास्तरीय कबड्डी पावसाळी स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये कनिष्ठ महाविद्यालयाच्या 19 वर्षाखालील मुलीच्या संघाने सहभाग नोंदविला होता सर्व खेळाडूंची यादी खालील प्रमाणे –

1) आर्या देवघरे
2) साक्षी पवार
3) समीक्षा पवार
4) श्रेया शिगवण
5) वेदांती सुर्वे
6) रोशनी बोवणे
7) राखी थोरे
8) पूजा राजभर
9) खुशाली गोविलकर
10) इशिका तांबे
11) खुशी गोविलकर
12) ईशा सुर्वे

दिनांक 16 ऑक्टोबर 2025 रोजी पावसाळी तालुकास्तरीय मैदानी स्पर्धांचे आयोजन डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाच्या मैदानावर घेण्यात आल्या. यामध्ये 17 वर्षाखालील, 19 वर्षाखालील मुलीच्या संघाने सहभाग घेतला.

19 वर्षाखालील मुली –

1) रोशनी बोवणे
2) संघप्रिया जाधव
3) खुशाली गोविलकर

19 वर्षाखालील मुले –

1) सिद्धेश पडवाळ
2) हर्षल जाधव

17 वर्षाखालील मुले –

1) आयुष अनंत येलवे
2) यश मंगेश जाधव
3) राज शिगवण
4) रोहन जुवळे
5) ब्रम्हा शिगवण

दिनांक 11 सप्टेंबर 2025 रोजी पावसाळी तालुकास्तरीय हॉलीबॉल स्पर्धांचे आयोजन के. जी. विद्यामंदिर, तेरेवायंगणी हायस्कूलच्या मैदानावर घेण्यात आल्या. यामध्ये 19 वर्षाखालील मुलींच्या संघाने प्रथम क्रमांक संपादन करुन रत्नागिरी येथे होणाऱ्या जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड करण्यात आली सहभागी खेळाडूंची नावे –

1) आर्या देवघरे
2) विनया शिगवण
3) खुशी गोविलकर
4) खुशाली गोविलकर
5) लक्ष्मी धुर्वे
6) राखी थोरे
7) ईशा सुर्वे
8) सानिका भुवड
9) मंजुळा सितारे
10) संघप्रिया जाधव
11) इशिका तांबे
12) सानिका कातकर

दिनांक 13 सप्टेंबर 2025 रोजी के. जी. माध्यमिक विद्यालय, तेरेवायंगणी या ठिकाणी तालुकास्तरीय व्हॉलीबॉल पावसाळी क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या क्रीडा प्रकारात महाविद्यालयाचा 19 वर्ष मुलांच्या संघाने द्वितीय क्रमांक संपादन केला या संघातील सहभागी खेळाडू.

1) हर्षल जाधव
2) तुषार वाघे
3) दिशांक वाघे

4) पार्थ कालपाटील	5) मनिष वाघे	6) रोहित राठोड
7) वेदात पवार	8) शार्दूल गणवा	9) शुभम पावसे
10) अमृत कुरुलकर	11) विघ्नेश खळे	12) राजदीप वाघे

19 वर्षाखालील पॉवरलिफ्टिंग स्पर्धा दिनांक 20 डिसेंबर 2025 रोजी स्पोर्टस शिवाजी स्टेडियम, रत्नागिरी येथे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेमध्ये एकूण 6 विद्यार्थी सहभागी झाले होते.

आर्या देवघरे	57 गटामध्ये	प्रथम
खुशाली गोविलकर	66	प्रथम
दैवत वाघे	66	प्रथम
ओंकार गोविलकर	83	प्रथम

19 वर्षाखालील विभागीय पॉवरलिफ्टिंग स्पर्धा दिनांक 4 जानेवारी 2026 रोजी कोल्हापूर पेठवडगाव येथे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेमध्ये सहभागी विद्यार्थ्यांची नावे.

आर्या देवघरे	प्रथम
खुशाली गोविलकर	प्रथम
दैवत वाघे	द्वितीय

इको क्लब (कनिष्ठ विभाग) अहवाल

दिनांक ०१ जुलै २०२५ रोजी महाविद्यालयात वृक्षारोपणाचा कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमात महाविद्यालयाच्या परिसरात विविध वृक्षांची लागवड करण्यात आली. या कार्यक्रमात संस्थेचे सभापती मा. धनंजय लक्ष्मण यादव, कार्यवाह मा. डॉ. दशरथजी भोसले, तसेच संस्थेचे सर्व पदाधिकारी, प्राचार्य मा. डॉ. भारत डी. कऱ्हाड, पर्यवेक्षक मा. श्री. एल. पी. पाटील सर्व शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

दिनांक २५ जुलै २०२५ रोजी महाविद्यालयात घनकचरा व्यवस्थापनाचा कार्यक्रम संपन्न. या वेळी प्लास्टिक कचऱ्यासाठी कुंडी व कचऱ्यासाठी कुंडी यांची व्यवस्था करण्यात आली. या कार्यक्रमात प्राचार्य मा. डॉ. भारत डी. कऱ्हाड, पर्यवेक्षक मा. श्री. एल. पी. पाटील, शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

दिनांक २३ सप्टेंबर २०२५ रोजी महाविद्यालयात ''एक पेढ माँ के नाम'' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात विद्यार्थी व पालक सहभागी होऊन समाजामध्ये वृक्षांचे महत्व व जनजागृती निर्माण करण्यात आली. या वेळी प्राचार्य मा. डॉ. भारत डी. कऱ्हाड, पर्यवेक्षक मा. श्री. एल. पी. पाटील, सर्व शिक्षक, पालक व विद्यार्थी उपस्थित होते.

दिनांक १८ जानेवारी २०२६ रोजी महाविद्यालयाच्या परिसरात २६ जानेवारी निमित्त स्वच्छता करण्यात आली. यावेळी प्राचार्य मा. डॉ. भारत डी. कऱ्हाड, पर्यवेक्षक मा. श्री. एल. पी. पाटील, सर्व शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

या विभागाचे कामकाज श्री. व्ही. एम. वळवी व एस. एस. खताते पाहतात.

वाद-विवाद अहवाल (कनिष्ठ विभाग) सन २०२५-२६

दिनांक ९ ऑगस्ट क्रांतीदिनानिमित्त मंडणगड, दापोली, खेड या तीन तालुकास्तरीय 'मातोश्री इंदूमती यादव' वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. यामध्ये एकूण २५ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. यामध्ये प्रथम पाच विद्यार्थींची निवड करण्यात आली. नावे पुढील प्रमाणे –

१) कु. मानसी नागो दळवी (प्रथम क्रमांक)
२) कु. कावेरी राजेश चव्हाण (द्वितीय क्रमांक)
३) कु. सलोनी विनायक शिगवण (तृतीय क्रमांक)
४) कु. सिद्धी प्रकाश चव्हाण (उत्तेजनार्थ)
५) कु. संजना जयवंत पावसे (उत्तेजनार्थ)

वरील विजेते विद्यार्थ्यांना संस्थेचे सभापती मा. श्री. धनंजयराव यादव, संस्थेचे पदाधिकारी तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. भारत कऱ्हाड, कनिष्ठ महाविद्यालयाचे पर्यवेक्षक श्री. लक्ष्मीकांत पाटील व सर्व शिक्षक वृंद यांनी अभिनंदन केले. विजेत्या विद्यार्थ्यांना रोख रक्कम व प्रमाणपत्र कै. इंदूमती लक्ष्मण यादव यांच्या स्मरणार्थ संस्थेचे सभापती मा. श्री. धनंजयराव लक्ष्मण यादव यांच्याकडून प्राप्त झाली. या स्पर्धेस पर्यवेक्षक म्हणून प्रा. सुधीर शिंदे, प्रा. विश्वंभर कमळकर आणि प्रा. दिपक गडकर यांनी केले.

दिनांक १३-०८-२०२५ रोजी कोकण मराठी साहित्य परिषदेमार्फत अर्बन सायन्स कॉलेज, दापोली येथे ''श्रावणधारा'' काव्योत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत वराडकर-बेलोसे महाविद्यालयातील कु. सलोनी विनायक शिगवण हिने प्रथम क्रमांक प्राप्त केला.

दिनांक १६-८-२०२५ रोजी ''कै. रामा बाबाजी मुरुडकर चॅरिटेबल ट्रस्ट'' (रजि.) च्या वतीने वराडकर-बेलोसे महाविद्यालयातील अकरावी व बारावी वर्गातील गरीब व होतकरु एकूण ३५ विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. या प्रसंगी महर्षी कर्वे प्रशिक्षण संस्थेचे केंद्र व्यवस्थापक श्री. रोहन मोरे, महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. सुरेश निंबाळकर, कनिष्ठ महाविद्यालयाचे पर्यवेक्षक श्री. लक्ष्मीकांत पाटील, वादविवाद विभागाचे श्री. दिनेश होडबे व श्री. युवराज आग्रे उपस्थित होते.

दिनांक २२-११-२०२५ रोजी रत्नागिरी जिल्हा माध्यमिक शाळा सेवक सहकारी पतपेढी मर्यादित मार्फत लोकमान्य हायस्कूल, दापोली येथे जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेमध्ये वराडकर-बेलोसे महाविद्यालयातील कु. सलोनी विनायक शिगवण हिने द्वितीय क्रमांक प्राप्त केला.

विद्यार्थी प्रतिनिधी
कु. सलोनी विनायक शिगवण

वादविवाद विभाग
श्री. दिनेश होडबे
श्री. युवराज आग्रे

महिला विकास कक्ष अहवाल २०२५-२६

1) **चॉकलेट बनविणे कार्यशाळा –**
दि. ६ व ७ ऑगस्ट २०२५ रोजी दोन दिवसांची चॉकलेट बनविणे कार्यशाळा आयोजित करण्यात आली. ही कार्यशाळा सौ. श्रद्धा सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आली.

2) **महिला आरोग्य जनजागृती –**
दि. ३० सप्टेंबर २०२५ रोजी महिला आरोग्य जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमात माहिती व मार्गदर्शन श्री. राहुल कदम यांनी दिले.

प्राध्यापक प्रतिनिधी
प्रा. नगमा जिलानी

राष्ट्रीय सेवा योजना कनिष्ठ विभाग नियमित कार्यक्रम रुपरेषा
सन २०२५-२६

* **२१ जून आंतरराष्ट्रीय योग दिन –**
दि. २१ जून २०२५ रोजी महाविद्यालयामध्ये आंतरराष्ट्रीय योगदिनाचे औचित्य साधून आंतरराष्ट्रीय योग दिन कार्यक्रम उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमासाठी योग प्रशिक्षिका सौ. हर्षदा डोंगरे या प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होत्या.

* **२६ जून २०२५ छत्रपती राजर्षी शाहू महाराज जयंती/सामाजिक न्याय दिन व अंमली पदार्थ विरोधी दिन–**
दि. २६ जून २०२५ रोजी राजर्षी छत्रपती शाहू महाराज जयंती आणि सामाजिक न्याय दिन व अंमली पदार्थ विरोधी दिनानिमित्त सामाजिक समतेचे महत्व अधोरेखित करणारे, अंमली पदार्थापासून दूर राहण्याचे संदेश देणारे प्रभावी व्याख्यान कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे श्री. बाळकृष्ण पाठक यांनी दिले.

* **दि. १ जुलै वृक्षारोपण कार्यक्रम –**
दि. १ जुलै २०२५ रोजी महाविद्यालयामध्ये वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

* **दि. १० जुलै गुरुपौर्णिमा दिन –**
दि. १० जुलै २०२५ रोजी गुरुपौर्णिमा या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश गुरु शिष्य परंपरेचे महत्व अधोरेखित करणे हा होता. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे प्रा. उत्तम पाटील होते.

* **दि. ११ जुलै २०२५ जागतिक लोकसंख्या दिन –**
दि. ११ जुलै २०२५ हा दिवस जागतिक लोकसंख्या दिन म्हणून साजरा करण्यात आला.

* **दि. १ ऑगस्ट २०२५ लोकमान्य टिळक पुण्यतिथी व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती –**
दि. १ ऑगस्ट २०२५ रोजी लोकमान्य टिळक पुण्यतिथी व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंतीनिमित्त महाविद्यालयामध्ये कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

* **दि. १ ऑगस्ट २०२५ रक्षाबंधनानिमित्त सीमेवरील जवानांना राख्या पाठविण्यात आल्या –**
दि. १ ऑगस्ट २०२५ रोजी रक्षाबंधनानिमित्त सीमेवरील जवानांना राख्या पाठवण्याचा स्तुत्य उपक्रम राबवण्यात आला.

* **दि. १३ ऑगस्ट २०२५ रोजी अंमली पदार्थ सेवन विरोधी प्रतिज्ञा –**
दि. १३ ऑगस्ट २०२५ रोजी राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे महाविद्यालयात अंमली पदार्थ सेवन विरोधी शिक्षक, व विद्यार्थी समवेत प्रतिज्ञा घेण्यात आली. तसेच अंमली पदार्थांच्या सेवनाने आपल्या शरीरावर कोणते विपरीत दुष्परिणाम होतात याची माहिती देण्यात आली.

* **दि. १४ ऑगस्ट २०२५ रोजी महाविद्यालय परिसर स्वच्छता –**
दि. १४ ऑगस्ट २०२५ रोजी राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे महाविद्यालयाच्या परिसरामध्ये साफसफाई करण्यात आली.

* **२२ ऑगस्ट २०२५ रोजी एच. आय. व्ही./एड्स जनजागृती कार्यक्रम –**
दि. २२ ऑगस्ट २०२५ रोजी एच. आय. व्ही./एड्स जनजागृतीसाठी विशेष व्याख्यान आयोजित करण्यातआले होते.

* **दि. २२ सप्टेंबर २०२५ भारतरत्न डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन जयंती –**
दि. २२ सप्टेंबर २०२५ रोजी भारतरत्न डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांची जयंती साजरी करण्यात आली.

* **दि. २३ सप्टेंबर भारतरत्न सरदार वल्लभमाई पटेल १५० वी जयंती –**
दि. २३ सप्टेंबर २०२५ रेजी भारतरत्न सरदार वल्लभभाई पटेल यांची १५० वी जयंतीनिमित्त महाविद्यालयामध्ये कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

* **दि. २४ सप्टेंबर २०२५ राष्ट्रीय सेवा योजना दिन –**
दि. २४ सप्टेंबर २०२५ रोजी राष्ट्रीय सेवा योजना दिनानिमित्त महाविद्यालयाच्या परिसरामध्ये वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

* **दि. २५ सप्टेंबर २०२५ पंडित दीनदयाळ उपाध्याय जयंती –**
दि. २५ सप्टेंबर २०२५ रेजी पंडित दीनदयाळ उपाध्याय जयंती निमित्त **''एक दिन, एक घंटा, एक साथ राष्ट्रीय स्वच्छता''** हा उपक्रम व **''स्वच्छता ही सेवा''** शपथ घेण्यात आली.

* **दि. २६ सप्टेंबर २०२५ जागतिक पर्यावरण आरोग्य दिन –**
दि. २६ सप्टेंबर २०२५ गाजतिक पर्यावरण आरोग्य दिन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

* **दि. २७ सप्टेंबर २०२५ जागतिक/विश्व पर्यटन दिन –**
दि. २७ सप्टेंबर २०२५ रोजी जागतिक पर्यटन दिनानिमित्त महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेहोते. या दिनाचे औचित्य साधून ''छत्रपती शिवाजी महाराजांज्या गड किल्ल्यांचा प्रेरणादायी इतिहास'' या विषयावर व्याख्यान आयोजित केले होते.

* **दि. २८ सप्टेंबर २०२५ शहीद भगतसिंग जयंती –**
दि. २८ सप्टेंबर २०२५ रोजी शहीद भगतसिंग जयंती निमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

* **दि. २९ सप्टेंबर २०२५ जागतिक/विश्व हृदय दिवस**
दि. २९ सप्टेंबर २०२५ रोजी जागतिक विश्व हृदय दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. या दिनानिमित्त आरोग्य

तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

* **दि. २ ऑक्टोबर २०२५ रोजी राष्ट्रपिता महात्मा गांधी व माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री जयंती –**
दि. २ ऑक्टोबर २०२५ रोजी राष्ट्रपिता महात्मा गांधी व माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांची जयंती साजरी करण्यात आली.

* **दि. १५ ऑक्टोबर २०२५ भारताचे माजी राष्ट्रपती भारतरत्न डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांची जयंती –**
दि. १५ ऑक्टोबर २०२५ भारताचे माजी राष्ट्रपती मिसाईल मॅन आणि भारतरत्न डॉक्टर एपीजे अब्दुल कलाम यांची जयंती साजरी केली.

* **नशा मुक्त भारत अभियान राष्ट्रीय कार्यक्रम –**
दिनांक १८ नोव्हेंबर २०२५ रोजी नशा मुक्त भारत अभियान ५ वर्षे पूर्ण झाल्याच्या उत्सवाचा भाग म्हणून राष्ट्रीय कार्यक्रम आयोजित करण्यात आला. नशा मुक्त भारत अभियान अंतर्गत जनजागृती पर विशेष कार्यक्रमाच्या निमित्ताने नशा मुक्त भारत अभियान शपथ घेण्यात आली.

* **दिनांक २६ नोव्हेंबर २०२५ रोजी संविधान दिन –**
राष्ट्रीय सेवा योजना विभाग आयोजित दिनांक २६ नोव्हेंबर २०२५ रोजी संविधान दिनाचे औचित्य साधून संविधान दिन कार्यक्रम साजरा करण्यात आला. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून श्री. एस. एच. पठाण उपस्थित होते.

* **१ डिसेंबर जागतिक एडस दिन –**
दि. १ डिसेंबर हा जागतिक एड्स दिन म्हणून जगभरात साजरा केला जातो. या दिवसाचे औचित्य साधून दिनांक १ डिसेंबर रोजी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमानिमित्त पोस्टर्स स्पर्धा, प्रश्नमंजुषा स्पर्धा घेण्यात आल्या.

* **दि. ६ फेब्रुवारी २०२६ रोजी मा. पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांचा परीक्षा पे चर्चा २०२६ विशेष कार्यक्रम–**
दि. ६ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी दहा वाजता नरेंद्र मोदी परीक्षा पे चर्चा २०१६ या विशेष कार्यक्रमाच्या माध्यमातून देशभरातील विद्यार्थी, पालक आणि शिक्षकांची संवाद साधला बोर्ड परीक्षांच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढवण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी आज परीक्षा पे चर्चा या विशेष कार्यक्रमांमध्ये देशभरातील विद्यार्थी पालक आणि शिक्षकांशी संवाद साधला. या कार्यक्रमात महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी ऑनलाईन सहभाग दर्शवला.

* **दिनांक १८ फेब्रुवारी २०२६ रोजी छत्रपती शिवाजी महाराज जयंती –**
राष्ट्रीय सेवा योजना विभाग आयोजित दिनांक १८ फेब्रुवारी २०२६ रोजी छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त वराडकर-बेलोसे महाविद्यालयात छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवन चरित्रावर आधारित व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून मा. श्री. सुरेश खरात, इतिहास विभाग प्रमुख उपस्थित होते.

दिनांक १९ फेब्रुवारी २०२६ रोजी राष्ट्रीय सेवा योजना विभाग आयोजित छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंती निमित्त दिनांक १९ फेब्रुवारी २०२६ रेजी पदयात्रेचे आयोजन करण्यात आले.

* **दिनांक ८ मार्च २०२६ रोजी जागतिक महिला दिन कार्यक्रम –**
दिनांक ९ मार्च २०२६ रोजी जागतिक महिला दिनानिमित्त कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी

उद्योजिका सौ. निशा सावंत उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. भारत कऱ्हाड उपस्थित होते. विशेष उपस्थिती कनिष्ठ महाविद्यालयाचे पर्यवेक्षक श्री. एल. पी. पाटील उपस्थित होते. कार्यक्रमासाठी सर्व विद्यार्थी व प्राध्यापक उपस्थित होते.

शिक्षक प्रतिनिधी
१) श्री. बिभीषण ढवळे
राष्ट्रीय सेवा योजना प्रकल्प अधिकारी
२) सौ. मानसी कोवळे
३) श्री. युवराज आग्रे

विद्यार्थी प्रतिनिधी
१) कु. आर्यन संतोष मळेकर
२) कु. प्राजक्ता विनोद कदम

राष्ट्रीय सेवा योजना (*कनिष्ठ विभाग*)
विशेष श्रमसंस्कार निवासी शिबीर अहवाल २०२५

न. का. वराडकर कला व रा. वि. बेलोसे वाणिज्य कनिष्ठ/वरिष्ठ महाविद्यालय, कै. शांतीलाल जैन विज्ञान कनिष्ठ आणि इंदुमती यादव माहित तंत्रज्ञान महाविद्यालयाचा राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे दत्तक खेडे कर्दे-विश्वदीप वाडी, ता. दापोली, जि. रत्नागिरी येथे मंगळवार दि. ०२/१२/२०२५ ते सोमवार दि. ०८/१२/२०२५ या कालावधीत सात दिवसांचे विशेष श्रमसंस्कार निवासी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. कर्दे गावच्या सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक व पर्यावरणीय चळवळीत या शिबिरार्थीने भरीव योगदान दिले. या सात दिवसांच्या विशेष श्रमसंस्कार निवासी शिबिरात विद्यार्थ्यांनी खालील प्रकल्प राबविले.

१) मंगळवार दिनांक ०२ डिसेंबर २०२५ रोजी विशेष श्रमसंस्कार निवासी शिबिराचे उद्घाटन कर्दे गावचे सरपंच माननीय श्री. सचिन तोडणकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी संस्थेचे सभापती माननीय श्री. धनंजय यादव अध्यक्ष म्हणून उपस्थित होते. त्यांच्या समवेत सहकार्यवाह मा. श्री. अनंत सणस, विश्वस्त मा. श्रीमती मीनाकुमार रेडीज मॅडम उपस्थित होत्या. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. भारत कऱ्हाड, पर्यवेक्षक व NSS जिल्हा समन्वयक श्री. एल. पी. पाटील, कर्दे गावचे उपसरपंच श्री. दत्ताराम भुवड, पोलीस पाटील मा. अश्विनी शेवडे, शाळा व्यवस्थापक समिती अध्यक्ष मा. श्री. दिनेश रुके, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

२) बुधवार दि. ०३ डिसेंबर २०२५ रोजी कर्दे गावातील मुख्य रस्त्याची साफसफाई करण्यात आली. आसपासच्या परिसराची स्वच्छता करण्यात आली. मा. सौ. निशा सावंत (उद्योजिका) यांचे 'तरुणांपुढील व्यवसायाच्या संधी आणि आव्हाने' या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. त्यांनी आपल्या व्याख्यानात तरुणांनी कौशल्य विकास, योग्य नियोजन आणि बदलत्या परिस्थितीशी जुळवून घेण्याची तयारी ठेवणे आवश्यक आहे असे सांगितले. तर सौ. रेणुका वारे यांनी 'ट्रेस मॅनेजमेंट' या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. दिनेश रुके (तंटामुक्ती समिती अध्यक्ष) होते.

३) गुरुवार दि. ०४ डिसेंबर २०२५ रोजी कर्दे गावात वनराई बंधारा बांधण्यात आला व परिसराची स्वच्छता करण्यात

आली. मा. श्री. पांडुरंग हुबाळे (समुपदेशक उपजिल्हा रुग्णालय, दापोली) यांनी 'तरुणांपुढील आरोग्याच्या समस्या' या विषयावर व्याख्यान दिले. यावेळी एच. आय. व्ही., बीपी, शुगर, हृदयविकार, कर्करोग इ. विविध आजार तरुणांमधील वाढत्या व्यसनाधीनतेमुळे निर्माण होतात असे म्हटले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. श्री. सचिन राहटवळ होते. विशेष उपस्थिती श्री. सागर बुरटे (प्रयोग शाळा तंत्रज्ञ) हे या कार्यक्रमासाठी उपस्थित होते.

४) शुक्रवार दि. ०५ डिसेंबर २०२५ रोजी कर्दे गावातील प्राचीन सोमेश्वर मंदिर, ग्रामदैवत खेम मंदिर व आजूबाजूच्या संपूर्ण परिसरातची स्वच्छता करण्यात आली. कार्यक्रमावेळी प्रमुख अतिथी सौ. मानसी कोवळे यांनी 'पर्यावरणाचे महत्व व आपली जबाबदारी' या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले तर अध्यक्ष म्हणून प्रकल्पाधिकारी श्री. बिभीषण ढवळे होते.

५) शनिवार दि. ६ डिसेंबर २०२५ रोजी कर्दे येथील संपूर्ण समुद्र किनाऱ्याची स्वच्छता करण्यात आली. सायंकाळी कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी व वक्ते मा. श्री. पांडुरंग जाधव (कवी लेखक) यांचे 'वाचन आणि सोशल मीडिया' या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांना वाचनाचे महत्व काय आहे यावर सविस्तर माहिती दिली. तसेच आपल्या स्वलिखित कवितांचे सादरीकरण केले. तसेच मा. दिगंबर पावसे वक्ते यांनी 'बालपण हरवलेली मुले' या विषयावर मार्गदर्शन केले. यावेळी व्याख्यानात बालपणीच्या आठवणी जाग्या करुन आठवणींना उजाळा दिला. विनोदी भाषेमध्ये काही किस्से सांगून विद्यार्थ्यांचे मनोरंजन केले. या कार्यक्रमावेळी श्री. बिभीषण ढवळे हे अध्यक्ष होते.

६) रविवार दि. ०७ डिसेंबर २०२५ रोजी संपूर्ण समुद्र किनाऱ्याची स्वच्छता करण्यात आली. कर्दे गावातील कासव संवर्धनाविषयी माहिती श्री. बिभीषण ढवळे व मा. श्री. अजय पालकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. दुपारच्या सत्रात ''तुमचं व्यक्तिमत्व तुमचं भविष्य'' या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून मा. सुनील गौड (माजी मुख्याध्यापक, करजगाव हायस्कूल) होते. यावेळी तुमचे व्यक्तिमत्व तुमच्या विचारांवर सवयींवर आणि कृतींवर आधारित असते आणि तेच तुमचं भविष्य घडवते असे सांगितले.

७) सोमवार दि. ०८ डिसेंबर २०२५ रोजी विशेष श्रमसंस्कार निवासी शिबिराच्या समारोप समारंभाचे आयोजन करण्यात आले. प्रमुख अतिथी कर्दे गावचे सरपंच मा. श्री. सचिन तोडणकर उपस्थित होते. तर कार्यक्रमाच्या अध्यक्षा व संस्थेच्या संचालिका मा. श्रीमती जानकीताई बेलोसे उपस्थित होत्या. यावेळी कर्दे गावचे उपसरपंच मा. दत्ताराम भुवड, पोलीस पाटील मा. सौ. सोनल खामकर, तंटामुक्ती समिती अध्यक्ष मा. श्री. दिनेश रुके, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. भारत कऱ्हाड, पर्यवेक्षक मा. श्री. एल. पी. पाटील उपस्थित होते. यावेळी उत्कृष्ट शिबिरार्थी म्हणून कुमारी प्राजक्ता कदम व आर्यन मळेकर यांची निवड करण्यात आली तर उत्कृष्ट शिबिरार्थी संघ ''आई एकविरा'' या संघाची निवड करण्यात आली. शिबिरासाठी संस्थेचे विविध पदाधिकारी व मान्यवर, प्राचार्य डॉ. बी. डी. कऱ्हाड, पर्यवेक्षक श्री. एल. पी. पाटील यांचे सहकार्य लाभले. प्रकल्प अधिकारी मा. श्री. बिभीषण ढवळे, सहाय्यक प्रकल्प अधिकारी म्हणून सौ. मानसी कोवळे व युवराज आग्रे यांन शिबिराचे आयोजन केले.

या विशेष निवासी शिबिराच्या यशस्वीतेसाठी आर. व्ही. बेलोसे एज्युकेशन फाउंडेशन संस्थेचे सभापती मा. श्री. धनंजयराव यादव, उपसभापती मा. श्री. प्रियदर्शन बेलोसे, कार्यवाह मा. श्री. डॉ. दशरथ भोसले, सहकार्यवाहक मा. श्री. अनंत सनस, विश्वस्त श्रीमती मीना कुमार रेडीज, संचालिका मा. श्रीमतीजानकीताई बेलोसे, श्रीमती सुनीता बेलोसे, सर्व

संस्था पदाधिकारी, प्राचार्य मा. श्री. डॉ. भारत कऱ्हाड, पर्यवेक्षक श्री. एल. पी. पाटील, सरपंच मा. श्री. सचिन तोडणकर, व सर्व ग्रामपंचायत सदस्य, सर्व वाडी अध्यक्ष यांचे मार्गदर्शन लाभले. क्रीडा शिक्षक मा. श्री. दीपक पवार, श्री. किशोर नागरगोजे, श्री. बिपीन मोहिते, डॉ. अनिल काकडे व श्री. रुपेश रसाळ, माजी विद्यार्थी कौशिक चुनेकर, राकेश हांडे, अजय पालकर, सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांनी सहकार्य केले. या सर्वांना मनापासून धन्यवाद ! पुढील वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा.

शिक्षक प्रतिनिधी
श्री. बिभीषण ढवळे (कार्यक्रमाधिकारी)
सौ. मानसी कोवळे (सह कार्यक्रमाधिकारी)
श्री. युवराज आग्रे (सह कार्यक्रमाधिकारी)

स्वयंसेवक प्रतिनिधी
कु. आर्यन मळेकर
कु. प्राजक्ता कदम

सांस्कृतिक विभाग (कनिष्ठ महाविद्यालय)

शैक्षणिक वर्ष 2025-26 मध्ये कनिष्ठ महाविद्यालयातील सांस्कृतिक विभागांतर्गत विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. भारतीय संस्कृतीही विविधतेने नटलेली आहे. या संस्कृतीचा वारसा जपणेसाठी आमच्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांमधील सुप्त गुण जागृत करण्यासाठी प्रयत्न करण्यात आले.

दि. 23 ऑगस्ट 2025 रोजी 'श्रावणधारा' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यामध्ये गीत गायन, नृत्य, कोळीगीत, लावणी, पावाडा, एकपात्री, जाखडी नृत्य, मंगळागौर इ. कार्यक्रम सादर करण्यात आले.

दि. 23 डिसेंबर 2025 शिशिर युवा महोत्सव कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यामध्ये सर्व विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. चालू वर्षी ''Euphori'' या थिमचे अवलोकन करण्यात आले. यामध्ये विविध 'डेज' साजरे करण्यात आले. केशरचना व मेहंदी डिझाईन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. यामध्ये देशभक्तीपर गीत गायन, नृत्य, एकपात्री, नाटक, कोळीनृत्य, लावणी इ. कला अविष्कार सादर करण्यात आले.

दि. २३ फेब्रुवारी २०२६ रोजी ''हिंद-दी चादर'' श्री गुरु तेग बहादूर साहिषाजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम शताब्दी वर्षानिमित्त समुहगीत गायन व प्रश्नमंजूषा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

सदर विभागाचे कामकाज श्री. एफ. के. मगदूम व सौ. एम. वाय, कोवळे हे पाहतात.

सांस्कृतिक विभागाचे उपक्रम सादर करताना संस्थेचे मा. चेअरमन, मा. सचिव, सर्व संस्थेचे पदाधिकारी, महाविद्यालयाचे प्राचार्य आणि पर्यवेक्षक, सहकारी प्राध्यापक, शिक्षक आणि कार्यालयीन कर्मचारी यांचे मौलिक सहकार्य लाभले.

विद्यार्थी प्रतिनिधी
कु. सलोनी शिगवण
कु. दैवत वाघे

सांस्कृतिक विभाग
श्री. एफ. के. मगदूम
सौ. एम. वाय. कोवळे

समाजशास्त्र विभाग अहवाल
(कनिष्ठ महाविद्यालय)

शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ मध्ये कनिष्ठ महाविद्यालयीन समाजशास्त्र विभागाच्या वतीने विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव निर्माण करण्यासाठी विविध उपक्रम उत्साहात राबविण्यात आले. या उपक्रमांचा संक्षिप्त आढावा खालीलप्रमाणे –

दिनांक २६ जून २०२५ रोजी छत्रपती राजर्षी शाहू महाराज जयंतीनिमित्त समाजशास्त्र विभागाचा पहिला उपक्रम म्हणून राजर्षी शाहू महाराज याची जयंती 'सामाजिक न्याय दिन' आणि 'अंमली पदार्थ विरोधी दिन' म्हणून साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यलयाचे प्राचार्य डॉ. भारत कऱ्हाड होते. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे महाविद्यालयाचे माजी ग्रंथपाल मा. बाळकृष्ण पाठक होते. प्रा. बिभीषण ढवळे यांनी प्रास्ताविकातून शाहू महाराजांच्या कार्याची व अंमली पदार्थांपासून दूर राहण्याच्या महत्वावर प्रकाश टाकला. आभार प्रा. व्ही. एम. वळवी यांनी मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. मानसी कोवळे यांनी केले.

दिनांक १० जुलै २०२५ भारतीय संस्कृतीतील गुरु-शिष्य परंपरेचे जतन करण्यासाठी समाजशास्त्र विभागातर्फे ''गुरुपौर्णिमा'' कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. भारत कऱ्हाड होते. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे मराठी विभाग प्रमुख प्रा. उत्तम पाटील होते. या कार्यक्रमास पर्यवेक्षक श्री. एल. पी. पाटील यांची विशेष उपस्थिती लाभली. पाहुण्यांचे स्वागत व प्रास्ताविक प्रा. बिभीषण ढवळे यांनी केले. आभार प्रदर्शन प्रा. युवराज आग्रे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. मानसी कोवळे यांनी केले.

दिनांक ११ जुलै २०२५ रोजी ''जागतिक लोकसंख्या दिन'' कार्यक्रम साजरा करण्यात आला. वाढत्या लोकसंख्येची आव्हाने आणि सामाजिक परिणाम या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी हा कार्यक्रम घेण्यात आला.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. भारत कऱ्हाड होते. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे प्रा. गणेश मांगडे (अर्थशास्त्र विभाग, वरिष्ठ महाविद्यालय) होते.

प्रा. गणेश मांगडे यांनी लोकसंख्या वाढीचा अर्थव्यवस्थेवर होणारा परिणाम अतिशय सोप्या भाषेत मांडला. प्रा. बिभीषण ढवळे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. प्रा. युवराज आग्रे यांनी सर्वांचे आभार मानले. सूत्रसंचालन सौ. मानसी कोवळे यांनी केले.

समाजशास्त्र विभागाचे हे सर्व उपक्रम प्राचार्य डॉ. भारत कऱ्हाड यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीरित्या संपन्न झाले. या कार्यक्रमांच्या नियोजनाची व अंमलबजावणीची संपूर्ण जबाबदारी प्रा. बिभीषण ढवळे व प्रा. युवराज आग्रे यांनी यशस्वीपणे पार पाडली. या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक प्रश्नांविषयी जाणीव निर्माण होण्यास मदत झाली.

प्रा. बिभीषण ढवळे
प्रा. युवराज आग्रे
(समाजशास्त्र विभाग)

वाणिज्य विभाग (कनिष्ठ महाविद्यालय)

व्यावसायिक कृतीचा 'वाणिज्य' हा असा घटक आहे की जो उद्योगांनी निर्माण केलेल्या वस्तू व सेवांचे वितरण करतो. उत्पादक व ग्राहक यांच्यामधील सेतू म्हणून वाणिज्य विभाग कामकरते. या विभागांतर्गत विद्यार्थ्यांमध्ये व्यावसायिक दृष्टीने जोपासण्यास मदत केली जाते. महाविद्यालयातील अनेक विद्यार्थी सद्या समाजात उत्कृष्ठ व्यावसायिक म्हणून कार्यरत आहेत. या विभागामार्फत विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.

दि. 22 जुलै 2025 रोजी 'करिअर मार्गदर्शन' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. पुणे विद्यापीठाचे माजी वित्तअधिकारी श्री. एम. एस. जाधव यांनी मुलांना करिअर विषयी मोलाचे मार्गदर्शन केले.

दि. 1 ऑगस्ट 2025 रोजी ''CMA'' या कोर्सविषयी मार्गदर्शनपर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमासाठी CA श्री. आशिष कोठारी, CA श्री. जुगल माहेश्वरी, CA श्रीम. प्रणाली आरेकर. डॉ. भारत कऱ्हाड यांनी मार्गदर्शन केले.

दि. 22 नोव्हेंबर 2025 रोजी ''गीता सेलेब्रेशन'' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यामध्ये विद्यार्थ्यांना गीतेमधील विविध अध्यायांचे अवलोकन करुन देण्यात आले. या कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून श्री. राहूल अडेकर, श्री. रमाकांत पावसे, श्री. निरज बेंदरकर, श्री. युवराज पावसे इ. उपस्थित होते.

दि. 11 डिसेंबर 2025 रोजी ''व्यवसाय मार्गदर्शन'' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यामध्ये व्यवसायाची निवड कशी करावी व व्यवसायाचे नियमन कसे करावे याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. यामध्ये श्री. केतन पाथरे व श्री. प्रसाद शेवडे यांनी मार्गदर्शन केले.

वरील विभागाच्या यशस्वीतेसाठी सर्व संस्था पदाधिकारी, प्राचार्य, पर्यवेक्षक, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांचे सहकार्य लाभले.

वाणिज्य विभाग
श्री. एफ. के. मगदूम
श्री. डी. व्ही. होडबे
श्री. एस. एस. खताते

सखी सावित्री समिती अहवाल वर्ष 2025-2026

महाविद्यालयातील विद्यार्थिनींच्या सुरक्षिततेच्या अनुषंगाने सखी सावित्री समितीची स्थापना करण्यात आली. विद्यार्थिनींच्या सुरक्षिततेविषयी व सर्वांगिण विषयासाठी शक्य तितके विविध उपक्रम उदा. समुपदेशन, तायक्कांदो प्रशिक्षण विविध सर्वांगिण विकासपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

* दिनांक 21 जून 2025 रोजी आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यात आला. सौ. हर्षदा डोंगरे मॅडम यांनी मेडिटेशन योगासनांचे विविध प्रकार सादर केले व विद्यार्थ्यांना आरोग्यविषयी मार्गदर्शन केले.

* दिनांक 23 जुलै 2025 रोजी व्यक्तिमत्व विकास कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. प्रा. एम. एस. जाधव सर उपस्थित होते.
* दिनांक 1 ऑगस्ट 2025 रोजी CMA कोर्स मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. भारत कऱ्हाड सर उपस्थित होते. प्रमुख अतिथी मा. श्री. आशिष कोठारी (सी.ए.), मा. श्री. जुगल माहेश्वरी उपस्थित होते.
* दिनांक 22/08/2025 रोजी "AIDS" जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आला. प्रमुख पाहुणे म्हणून मा. श्री. हुबाळे सर समूपदेशक जिल्हा उपरुग्णालय, दापोली यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले.
* दिनांक 15/10/2025 ते दिनांक 18/10/2025 रोजी उपजिल्हा रुग्णालय, दापोली यांचे आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले.
* दिनांक 28/11/2025 रोजी 'करिअर गाईडंस' या विषयावर व्याख्यान व प्रात्यक्षिक आयोजित करण्यात आले. या कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुणे सौ. रेश्मा मोरे उपस्थित होत्या.

या समितीचे काम सौ. समृद्धी सुरेंद्र खताते व सौ. किरण डेरवणकर पाहतात.

महिला तक्रार निवारण समिती अहवाल

विद्यार्थिनींच्या सुरक्षेच्या अनुशंगाने महिला तक्रार निवारण समिती स्थापन करण्यात आली आहे. कामाच्या ठिकाणी महिलांच्या होणाऱ्या लैंगिक छळवणुकीस प्रतिबंध करण्यासंदर्भात केलेल्या शिफारीच्या अनुषंगाने महिलांच्या तक्रारी दाखल करण्यासाठी महिला तक्रार निवारण समिती स्थापन करण्यात आली आहे. या समितीमध्ये सौ. मानसी कोवळे या समितीच्या अध्यक्षा आहेत. तर सौ. समृद्धी खताते या समितीच्या सचिव आहेत. तसेच सौ. श्रृतिका कांगणे व डॉ. सौ. सावसाकरे या सदस्या आहेत. समितीच्या मासिक बैठकीच्या विषयाची नोंद करण्यात येते. कामाच्या ठिकाणी सुरक्षित वातावरण सुनिश्चित करणे व महिलांना तक्रार करण्यासाठी एक गोपनीय विश्वासार्ह मंच उपलब्ध करुन देणे हा समितीचा उद्देश आहे. या समितीचे कामकाज सौ समृद्धी खताते व सौ. मानसी कोवळे पाहतात.

तक्रार पेटी अहवाल

विद्यार्थिनींच्या सुरक्षेच्या अनुशंगाने महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी आणि त्यांच्या समस्या जाणून घेण्यासाठी महाविद्यालयामध्ये तक्रार पेटी बसवणे महाराष्ट्र राज्य सरकारद्वारे अनिवार्य करण्यात आले आहे. दर आठवड्याच्या शेवटी शनिवारी तक्रारपेटी उघडून तक्रारीची नोंद घेतली जाते. तक्रारीच्या स्वरुपावरुन योग्य ती कारवाई केली जाते. तक्रार पेटीचे कामकाज श्री. एफ. के. मगदूम व सौ. एम. वाय. कोवळे पाहतात.

भाषा मंडळ (कनिष्ठ विभाग) अहवाल

दिनांक 18 सप्टेंबर 2025 रोजी महाविद्यालयात शिष्यवृत्तीसाठी लागणारे कागदपत्रे, दाखले काढण्यासाठी मार्गदर्शन कार्यक्रम संपन्न. या कार्यक्रमात नायब तहसिलदार, दापोली मा. निखिल देशमुख साहेब तसेच दापोली पंचायत समिती मा. श्री. वैभव बापट यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या वेळी प्राचार्य मा. डॉ. भारत डी. कऱ्हाड, पर्यवेक्षक मा. एल. पी. पाटील, सर्व शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

दिनांक 10 ऑक्टोबर 2025 रोजी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या अडचणी लक्षात घेऊन आधारकार्ड सेवा केंद्र, हर्णै मा. नाईम सर व त्याचे सहकारी यांनी आधारकार्ड अपडेट करण्यासाठी कॅम्प घेतला. यावेळी प्राचार्य मा. भारत डी. कऱ्हाड, पर्यवेक्षक मा. श्री. एल. पी. पाटील, सर्व शिक्षक व विद्यार्थी सहभाग नोदवला.

या विभागाचे कामकाज श्री. व्ही. एम. वळवी व श्री. बी. बी. ढवळे हे पाहतात.

सतर्क ग्राहक गट (कनिष्ठ विभाग) अहवाल

दिनांक 13 डिसेंबर 2025 रोजी महाविद्यालयात व्यवसाय मार्गदर्शनाचा कार्यक्रम संपन्न. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी भविष्यात व्यवसाय कसा करावा याबद्दल व्यावसायिक शिक्षण कोणकोणते आहेत. या संदर्भात मार्गदर्शन करण्यात आले. या वेळी रिगल कॉलेजच्या प्राध्यापिका मा. रेश्मा मोरे व त्याचे सहकारी यांनी प्रात्यक्षिक करुन मार्गदर्शन करण्यात आले. या वेळी महाविद्यालयाचे प्राचार्य मा. भारत डी. कऱ्हाड, पर्यवक्षक मा. श्री. एल. पी. पाटील, सर्व शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

या विभागाचे काम श्री. व्ही. एम. वळवी व एस. एस. खताते हे पाहतात.



|| अस्सल कोकणी चव... थेट फॅक्टरीतून तुमच्या घरी! ||

कोकण फळप्रक्रिया (काजू फॅक्टरी) घेऊन आले आहेत
निसर्गरम्य दापोलीतील शुद्ध आणि दर्जेदार काजूगर!



आमची खास वैशिष्ट्ये :

थेट फॅक्टरी दरात विक्री : होलसेल आणि रिटेल दरात काजू उपलब्ध.
विविध फ्लेवर्सची मेजवानी : पुदिना, खारा, शेजवान, पेरी-पेरी, मंचुरियन, कॅरेमल आणि साल्सा अशा नवनवीन चवींमध्ये काजू उपलब्ध.
उत्कृष्ट दर्जा : स्वच्छता आणि गुणवत्तेची पूर्ण खात्री.
काजू बी फोडून मिळेल : ग्राहकांच्या सोयीनुसार काजू बी फोडण्याची सुविधा.
विशेष आकर्षण (Free Offers !) :Free Factory Tour : काजूवर प्रक्रिया कशी केली जाते? हे जवळून पाहण्यासाठी सर्वांना फॅक्टरी टूर मोफत !
विद्यार्थ्यांसाठी सुवर्णसंधी : शाळा-महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी काजू प्रक्रियेचे मोफत ट्रेनिंग उपलब्ध.

गुणवत्ता आणि विश्वास... म्हणजेच कोकण फळप्रक्रिया!
आजच भेट द्या आणि कोकणच्या काजूचा आनंद घ्या.

प्रोप्रा. : संदीप धोपट **मोबा. ७६६६७०४६९७**

कोकण फळप्रक्रिया

(काजू फॅक्टरी)

आमच्या येथे होलसेल व रिटेल दराने काजू विक्री उपलब्ध आहे.
पेरी पेरी, मंचुरीयन, कॅरेमल हे फ्लेवर्ड काजू उपलब्ध आहेत.





(फॅक्टरी दरात काजू विक्री)

श्री. धनंजय लक्ष्मणराव यादव **श्री. शाईन दामोदरन**
मोबा. ७७९८२७०३६५

पत्ता : कोकण फळप्रक्रिया (काजू फॅक्टरी) प्लॉट नं. ए-१,
एम.आय.डी.सी. वळणे, ता. दापोली, जि. रत्नागिरी - ४१५७१२.

ESTD.: 1960

दापोली अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि., दापोली

मुख्य कार्यालय : दापोली, जि. रत्नागिरी (महाराष्ट्र)
फोन : ८९५६४६७५२०, ८७९९९०९६६० E-mail : info@dapoliurbanbank.com, Website : www.dapoliurbanbank.com

बँकेची सांपत्तिक स्थिती (३१ मार्च २०२६ अखेर)

तपशील	एकत्रित
सभासद संख्या	४९९८४
वसुल भागभांडवल	१५ कोटी ७६ लाख
रिझर्व्ह व इतर फंडस्	४० कोटी ८ लाख
ठेवी	५२६ कोटी ९९ लाख
कर्जे	३४३ कोटी ६२ लाख
गुंतवणूक	२०३ कोटी ९४ लाख
नेट एन.पी.ए. प्रमाण	०%
ढोबळ नफा	८ कोटी ७४ लाख

बँकेची ठळक वैशिष्ट्ये

☞ कार्यक्षेत्र : महाराष्ट्र राज्य ☞ ऑडीट वर्ग "अ" (स्थापनेपासून)

- अत्याधुनिक संगणकीय बँकिंग सुविधा
- ज्येष्ठ नागरिक व सैनिकांच्या ठेवीवर ०.२५ टक्के जादा व्याज
- ठेवीवर जास्तीत जास्त ८.०० टक्के व्याजदर
- पाच लाखापर्यंतच्या ठेवींना विम्याचे संरक्षण

१,०००/- व त्यापेक्षा जास्त रकमेचे शेअर्स धारण करणाऱ्या सभासदांना दोन लाखाचे अपघाती विमा संरक्षण
५०,०००/- व त्यापेक्षा जास्त रकमेची ठेव ठेवणाऱ्या ठेवीदारांना पाच लाखाचे अपघाती विमा संरक्षण.

ATM / Debit Card / SMS / RTGS / NEFT / G-Pay / PhonePe / QR Code







श्री. संभाजीराव म. थोरात
मुख्य कार्यकारी अधिकारी

श्री. दत्तात्रय ल. बिवलकर
उपाध्यक्ष
व सर्व संचालक सदस्य

डॉ. जयवंत शं. जालगांवकर
अध्यक्ष

* आपली बँक - दापोली अर्बन बँक *